ISSN-0971-8397

विकास समर्पित मासिक

# योजना

वर्ष ४२ अंक १३ पाने ५६ ऑगस्ट २०१५ मूल्य १०

## आंतर्रभूत वृद्धी आणि सामाजिक बदल




विशेष लेख

सर्वसमावेशक वृध्दी आणि भारतीय अर्थव्यवस्था

-संजय महाजन

फोकस

आर्थिक समावेश आणि सामाजिक बदल

- चरणसिंह, सी.एल.दधीच आणि एस. आनथ

मराठी मासिक

# योजना

## योजना घरी आणा.
## आजच वर्गणी भरा.




विकासाचे सर्व पैलू, सर्व सामाजिक प्रश्न आणि चालू घडामोडी प्रसिध्द करणारे योजना हे एकमेव मासिक आहे. या मासिकात सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांनी लिहिलेले अभ्यासपूर्ण व अचूक माहिती देणारे लेख असतात. त्यामुळे आपल्याला प्रत्येक क्षेत्रातील बिनचुक माहिती मिळते.

हे मासिक विद्यार्थीवर्ग व विद्वत्जनांचे आवडते आहे .स्पर्धात्मक परीक्षांना बसणाऱ्यांनी योजना वाचणे आवश्यक आहे. यातील माहिती साधारणत: इतरत्र प्रकाशित होण्याआधीच आपल्यापर्यंत येते.

### वर्गणीचे दर

| | |
|---|---|
| नियमित अंक मूल्य | १०.०० रुपये |
| विशेषांक | २०.०० रुपये |
| वार्षिक वर्गणी | १००.०० रुपये |
| द्विवार्षिक वर्गणी | १८०.०० रुपये |
| त्रिवार्षिक वर्गणी | २५०.०० रुपये |

वर्गणी, मनीऑर्डर
किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे संपादक,योजना (मराठी)यांचे नावाने
७०१, ''बी'' विंग (७ वा मजला) केन्द्रीय सदन,
बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
या पत्त्यावर पाठवावी.

**वर्गणी मनीऑर्डरने पाठविताना आपले नाव व पत्ता कूपनमध्ये सुवाच्य अक्षरात लिहा.**

विक्रीचे ठिकाण : ७०१ सी, ७०१बी, केंद्रीय सदन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४

योजना मासिक भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिध्द केले जाते.

# योजना

## विकास समर्पित मासिक

❖ वर्ष ४२ ❖ ❖ अंक १३ ❖ ❖ ऑगस्ट २०१५ ❖ ❖ मूल्य १० रु. ❖

मुख्य संपादक
**दिपीका कांचल**

संपादक
**भावना गोखले**

मुखपृष्ठ
**जी.पी. धोपे**

**'योजना' हे निती आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तेलुगू, पंजाबी, उर्दू, बंगाली, तमिळ, मल्याळम, उडिया व आसामी भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. 'योजना'त प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील मते त्या त्या लेखकांची असतात.**

**योजना वर्गणीचे नवे दर**

| | |
|---|---|
| **वार्षिक** | : रू. १०० |
| **किरकोळ किंमत** | : रू. १० |
| **शेजारी राष्ट्रे (एअरमेल) वार्षिक** | : रू. ५३० |
| **युरोप व अन्य राष्ट्रे (एअरमेल) वार्षिक** | : रू. ७३० |

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| **भारताच्या सक्षमीकरणासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर** | - विजय कुमार कौल | ५ |
| **आर्थिक समावेश आणि सामाजिक बदल** | - चरणसिंह, सी.एल.दधीच आणि एस. आनथ | १४ |
| **समावेशक वाढीच्या मसुद्यातील "एमएसएमई" चे स्थान :** | - डॉ. पी.एम. मॅथ्यू | २० |
| **भारतातील विविध क्रांत्यांमधिल आंतराष्ट्रीय सहभाग आणि सामाजिक बदल** | - भावना गोखले | २९ |
| **वस्तु व सेवा कर प्रणाली - एका नवीन प्रारूपात** | - डॉ. विजय काकडे | ३४ |
| **सर्वसमावेशक वृध्दी आणि भारतीय अर्थव्यवस्था (विशेष लेख)** | - संजय महाजन | ३७ |
| **सहकार चळवळ-जागतिकीकरण आणि आर्थिक सबलीकरण** | - विश्वास ठाकुर | ४८ |


योजनेसाठी लेख, वर्गणी, जाहिरात इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
**योजना मासिक कार्यालय**
७०१, 'बी' विंग (७वा मजला), केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. दुरध्वनी - योजना -२७५६६५८२
email - myojanadpd@gmail.com

# संपादकीय

## आर्थिक विकासाची दरी दूर करताना

भारताच्या आर्थिक वाढीची कथा स्वातंत्र्यानंतरच्या साडेसहा दशकात लक्षणीयरित्या बहरली. आपला देश कमी विकसित असतानाही आपण एका मोठ्या अर्थव्यवस्थेच्या दिशेने मार्गक्रमण केले आहे. जागतिक अर्थव्यवस्थेत अनेक चढउतार येऊनही भारताने आपल्या अर्थव्यवस्थेचा किल्ला अभेद्य राखला व गेल्या तिमाहीत साडेसात टक्के विकास दर गाठला. अलिकडच्या अहवालानुसार, जागतिक बँकेने भारत ही वेगाने वाढत असलेली अर्थव्यवस्था असल्याचे भाकित केले आहे, त्या अहवालातील माहितीनुसार २०१५-१६ मध्ये भारताचा आर्थिक विकास दर साडेसात टक्के असेल तर २०१६-१७ मध्ये तो ७.९ टक्के आणि २०१७-१८ मध्ये ८ टक्के असेल. आर्थिक निर्देशकांत गेल्या वर्षभरात वाढीच्या आकड्यात मोठी सुधारणा झाली आहे.

राष्ट्रपती प्रणब मुखर्जी यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात संसदेच्या दोन्ही सभागृहांना उद्देशून केलेल्या भाषणात सर्वसमावेशक वाढीचा उल्लेख करतानाच या वाढीमुळे गरिबांची आर्थिक स्थिती सुधारेल असा आशावाद व्यक्त केला होता. गरीब व श्रीमंत यांच्यातील आर्थिक प्रगतीची दरी दूर करण्यास सरकारचे प्राधान्य असल्याचे त्यांनी सांगितले होते. देशाची विविध आघाड्यांवरील प्रगती ही गती व रचनेच्या दृष्टिकोनातून समाजातील गरीब तसेच वंचितांचे जीवनमान सुधारण्यात यशस्वी होत नव्हती व अजूनही त्यात काही फरक पडलेला नाही. संयुक्त राष्ट्रांच्या विकास कार्यक्रमात भारताचे मनुष्यबळ विकास निर्देशांकावर आधारित स्थान १३५ वे होते त्यावरून अजून आर्थिक प्रगतीची फळे गरिबांपर्यंत पोहोचलेली नाहीत हेच स्पष्ट होते. 'सर्वसमावेशक विकास' ही संकल्पना प्रथम अकराव्या पंचवार्षिक योजनेत मांडली गेली त्यात सर्वांना संधी व जीवनमान सुधारण्यासाठी प्रयत्न हा विकास प्रक्रियेचा मूळ उद्देश होता. बाराव्या पंचवार्षिक योजनेत हा विषय अधिक विस्ताराने मांडण्यात आला त्यात दारिद्र्य निर्मूलन व आरोग्य, शिक्षण तसेच जीवनमान संधीत सुधारणा या मुद्द्यांवर भर देण्यात आला.

सर्वसमावेशक वाढ म्हणजे अशी आर्थिक वाढ ज्याच्या मदतीने रोजगार संधी निर्माण करणे व दारिद्र्य निर्मूलन करणे यावर भर देणे होय. त्यात लोकांना समान संधी व लोकांना शिक्षण व कौशल्य विकासात सक्षम करणे यालाही महत्व आहे. सरकारने त्यासाठी अनेक योजना सुरू केल्या असून त्यात समाजाच्या मुख्य प्रवाहातून बाहेर असलेल्या वंचित गटांना स्थान दिले आहे, आर्थिक वाढीचे फायदे त्यांनाही मिळावेत हा त्यामागचा उद्देश आहे. सरकारने आर्थिक सर्वसमावेशकतेसाठी प्रधानमंत्री जनधन योजना (पीएमजेडीवाय) सुरू केली त्याचा चांगला परिणाम होऊन दहा महिन्यात ९८ टक्के कुटुंबांचे मुद्रा बँकेत खाते सुरू झाले. सेतू, कौशल्यपूर्ण भारत या उपायांमुळे कौशल्यक्षम मनुष्यबळ निर्माण होतानाच लोकांना रोजीरोटीची संधी मिळणार आहे. प्रधानमंत्री जीवन ज्योती बिमा योजना, प्रधानमंत्री जीवन सुरक्षा योजना व अटल पेन्शन योजना सुरू करण्यात आल्या त्यात देशातील सामाजिक सुरक्षा जाळे शाश्वत व विस्तारित करण्याचा हेतू आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कायदा म्हणजे मनरेगामुळे लोकांचे जीवनमान सुधारले व स्थलांतरालाही प्रतिबंध निर्माण झाला. किसान कार्ड, प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना (पीएमकेएसवाय), राष्ट्रीय कृषी बाजारपेठ (नॅम) यांचा उद्देश शेतकरी समुदायाला फायदा व्हावा हा आहे. त्यामुळे देशाची सामाजिक आर्थिक सबलता वाढेल अशी अपेक्षा आहे..

असे असले तरी आपली लोकसंख्या १.२ अब्ज असून त्यात विविधता आहे. आर्थिक विकास सर्व पातळीवरच्या लोकांपर्यंत व देशाच्या सर्व भागात पोहोचवणे हे खरे आव्हान आहे. त्यात मग तंत्रज्ञानाची भूमिकाही सामोरी येते. डिजिटल भारत कार्यक्रमाची सुरूवात याच महिन्यात करण्यात आली आहे. त्याचा उपयोग आर्थिक विकास समाजाच्या विविध स्तरात पोहोचवणे व राज्यकारभार पारदर्शी करून सरकारी सेवा शेवटच्या माणसांपर्यंत पोहोचवणे हा उद्देश आहे. डिजिटल तंत्रज्ञानाच्या मदतीने शिक्षण, आरोग्य, कृषी, उत्पादन या क्षेत्रात मूलभूत सुधारणा करून जीवनमान उंचावणे हा हेतू यात आहे. भारतीय अर्थव्यवस्था आता नव्या दिशेने व्यापक उद्देश घेऊन वाटचाल करीत आहे. हा व्यापक उद्देश सर्वसमावेशक आर्थिक विकासाचा असून त्यामुळे प्रत्येक नागरिकाला सुरक्षिततेची भावना अनुभवायला मिळेल. त्यांना समान दर्जा गाठण्याची खऱ्या अर्थाने संधी मिळेल.

# भारताच्या सक्षमीकरणासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर

**- विजय कुमार कौल**



**१९८० पासून डिजिटल क्षेत्राने आपले पाय भारतात रोवण्यास सुरूवात केली असून, वर्ष २००० हे डिजिटल क्षेत्राच्या क्रांतीचे वर्ष ठरले आहे. ॲनालॉग कंम्पूटर पासून, यंत्रज्ञान ते आजचे ॲण्डरॉईड फोन, ३ - G सेवांद्वारे डिजीटल क्षेत्राची व्याप्ती वाढतच आहे. वर्ष २०१० मध्ये सेलफोन वगर्णीदार ४० कोटी तर इंटरनेट वापर कर्ते १.८ दश लक्ष कोटी होते. वर्ष २०२० पर्यंत भारताचे डिजीटल क्षेत्रात मानाचे स्थान प्राप्त होईल. हा टप्पा आधिरीत विकास आत्मसात करतानां सायबर गुन्ह्यांच्या प्रमाणाकडे आणि नवीन डिजीटल तंत्रज्ञानाच्या होणाऱ्या गैरवापराकडे लक्ष देणे गरजेचे आहे. डिजीटल क्षेत्रामुळे सर्व स्तरावर नवीन शैक्षणिक संधींची उपलब्धता, सामाजिक बदलाचा एक नवा पैलु सर्व स्तरावर अनुभवयाला मिळणार आहे.**

### १. परिचय


१ जुलै २०१५ रोजी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डिजिटल भारतीय सप्ताहाचे उद्घाटन केले. डिजिटल तंत्रज्ञान वा डिजिटलायझेन ही परिवर्तनाची नवीन लाट लोकांना, उत्पादनांना आणि सेवांना जोडत आहे जी माहिती तंत्रज्ञान, दूरसंचार, इंटरनेट आणि इतर संबंधित तंत्रज्ञाने एकवटण्याची परिणती आहे. सध्या चालू असलेल्या तंत्रज्ञानाच्या क्रांतीचा हा भाग आहे. अशा पाच तंत्रज्ञानात्मक क्रांत्यांची नोंद झालेली आहे आणि सहावी क्रांती चालू आहे. या डिजिटलायझेशनच्या लाटे मुळे विविध देशांमध्ये सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिवर्तन होणार आहे. गेल्या २५० वर्षात झालेल्या पाच तंत्रज्ञानात्मक क्रांत्यांमध्ये भारत सहभागी झालेला नाही. या सगळ्या तंत्रज्ञानात्मक क्रांत्या एका विशिष्ट पश्चिमेकडील देशात सुरवात होऊन पाश्चात्य देशांमध्ये पसरल्या ज्याचा फायदा अशा बहुतेक देशांना झाला. स्वातंत्र्याला सहादशके लोटली तरी भारत अजूनही गरिबी, कुपोषण, बेरोजगारी, निरक्षरता, आरोग्य सेवा अशा सामाजिक-आर्थिक समस्यांशी झुंजत आहे ज्यात आता पर्यावरणाच्या ऱ्हासाची भर पडली आहे. याला वसाहत वादाचा मोठा काळ आणि कमकुवत प्रशासन व्यवस्था कारणीभूत आहेत. या पार्श्वभूमीवर आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानात अशा समस्या सोडवण्याची क्षमता आहे. सदर लेखात आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाची सामाजिक-आर्थिक समस्या सोडवण्यातील भूमिकेची समिक्षा करण्याचा प्रयत्न केला आहे ज्यात भारतीय जनतेला सर्व समावेशक विकास मिळवून देण्यात त्याची होणारी मदत आणि त्यामुळे काय सामाजिक बदल होऊ शकतो यावर भर दिला आहे.

### २. सामाजिक-आर्थिक समस्या, सर्वसमावेशक विकास आणि नवीन तंत्रज्ञान आत्मसात करणे

भारता समोर अनेक सामाजिक-आर्थिक आणि पर्यावरणात्मक समस्या आहेत. भारतात सर्वाधिक गरीब माणसे आहेत. मुले भारतात मोठ्या प्रमाणावर कुपोषणाचा बळी ठरत आहेत. क्षय, कर्करोग आणि मधुमेह या रोगांच्या प्रकरणांचा विचार केल्यास भारत सर्व देशांमध्ये आघाडीवर आहे. जरी भारताने साक्षरतेचा दर वाढवला असला तरी अजूनही देशात निरक्षरांचे प्रमाण खूप आहे. तरुण मोठ्या प्रमाणावर बेरोजगार आहेत आणि यात अजून वाढ होणार आहे. जागतिक अर्थव्यवस्थेला जोडले गेल्याने वंचित समाजाच्या समस्यां मध्ये भर पडली आहे. आकृती क्र.१ मध्ये भारताला भेडसावणाऱ्या सामाजिक-आर्थिक समस्या दर्शवल्या आहेत.

या सगळ्या वरील उपाय हे सरळ सोपे नाहीत याची आपण कल्पना करू शकतो. या समस्या एकमेकांना जोडलेल्या आहेत.

उदाहरण द्यायचे झाल्यास गरिबीशी संबंधित समस्या, सर्व समावेशक विकास, अन्नसुरक्षा आणि रोजगार निर्मिती या आपल्या कृषी आणि कृषि विषयक पर्यावरणाशी जोडलेल्या आहेत. यावरील उपाय हा संपूर्ण कृषिक्षेत्रात आणि संबंधित पर्यावरणात सुधारणा करणे हा आहे. यात एकमेकांशी जोडलेल्या समस्यांचे निराकरण करू शकेल अशा व्यापक धोरणात्मक आराखड्याची आवश्यकता आहे. उत्कृष्ट असे उपाय शोधणे आवश्यक आहे ज्यात स्थानिक स्त्रोत, लोकांची तयारी, सहभाग आणि क्षमता, कायदेशीर संस्था वा प्रशासन यंत्रणांची तयारी यांचा विचार केला जाऊ शकतो (तक्ता १ पहा).




आकृती क्र. १ भारतातील प्रशासन, तंत्रज्ञान आणि सर्व समावेशक वाढ

त्याच वेळी डिजिटलायझेशनच्या रुपात गेल्या काही दशकात आलेली नवीन तंत्रज्ञाने विकसनशील देशात अशा काही समस्या सोडवण्यात प्रभावी ठरू शकतात. शिक्षणप्रसार, प्रशासनातील पारदर्शकता, लोकांचा संपर्क वाढविण्यात, उत्पादकता वाढविण्यात, उद्योगांची कामगिरी सुधारण्यात, नवीन उद्योगांच्या वाढीत आणि नवीन संशोधनाच्या वाढीत डिजिटल तंत्रज्ञानाच्या अवलंबाचा प्रभाव दिसून आला आहे. पुढील भागांमध्ये या तंत्रज्ञानाचा अवलंब ग्रामीण भाग, शिक्षण, उत्पादन, आरोग्य सेवा आणि इ-प्रशासन मध्ये करण्याबाबत चर्चा केली आहे.

आकृती क्र. १ मध्ये भारतातील सामाजिक आर्थिक समस्या, त्यावरील उपाय आणि त्याची परिणिती दाखवली आहे. खरतर भूतकाळात भारत हा संपन्न देश राहीला आहे पण वसाहतवादाच्या काळातही संपन्नता तो गमावून बसला. भारत कोणत्याही तंत्रज्ञानाच्या क्रांतीत सहभागी झालेला नाही. स्वातंत्र्य मिळाले त्या वेळी भारत मोठ्या प्रमाणावर गरिबी, निरक्षरता आणि सुमार सामाजिक-आर्थिक निर्देशकांसहित गरीब देश होता. गेल्या सहा दशकांमधील आपल्याच लोकांच्या स्वराज्यात या समस्यांवर मात करता येऊ शकलेली नाही. त्यामुळे तक्ता १ हे दर्शवतो की, अकार्यक्षम प्रशासन यंत्रणा अर्थव्यवस्थेची सुमार कामगिरी आणि कार्यासाठी कारणीभूत आहे. त्यामुळे उत्तम दर्जाचे प्रशासन अशा समस्या सोडवू शकेल. दर्शविले आहे की सुशासनाची परिणती चांगली सामाजिक आणि आर्थिक धोरणे, चांगले कार्यक्रम आणि योजना यांच्यात होऊ शकते आणि यांच्या योग्य अंमलबजावणीची परिणती सर्वसमावेशक विकासात होऊ शकते. येथे आधुनिक तंत्रज्ञानाची भूमिका ही लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. डिजिटल तंत्रज्ञानाने चित्रपट, उद्योग, शहरे आणि अर्थव्यवस्था यामध्ये मोठ्या प्रमाणावर बदल आणला आहे. या तंत्रज्ञानामुळे सरकारी योजना आणि कार्यक्रमांची अंमलबजावणी सुकर झाली आहे. याचा सारांश घ्यायचा झाल्यास योग्य सार्वजनिक धोरणे, कार्यक्रम आणि योजना आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर यावर भर असलेल्या सुशासनाद्वारे अशा योजना आणि कार्यक्रम राबवून देशा पुढील सामाजिक-आर्थिक समस्या सोडवता येऊ शकतील. या सगळ्याचा परिणाम सर्व समावेशक विकासात होईल.

## ३. आधुनिक तंत्रज्ञान आणि भारतातील सर्वसमावेशक विकास

गेल्या २५० वर्षात जगाने अद्भूत तंत्रज्ञानात्मक बदल अनुभवला आहे. हे व्यापक तंत्रज्ञानात्मक बदल आणि प्रगती यांना तंत्रज्ञानाची क्रांती असे म्हटले आहे. अशा पाच तंत्रज्ञानात्मक क्रांत्या तक्ता क्र.१मध्ये दाखवलेल्या आहेत. सहावी क्रांती प्रगती पथावर आहे. या तंत्र ज्ञानात्मक बदलांना क्रांती अशा करता म्हटले आहे कारण त्यांचा देशाच्या संपूर्ण अर्थव्यवस्थेवर कायापालट करणारा परिणाम होतो.

प्रत्येक तंत्रज्ञानात्मक क्रांती मुळे विकासाला चालना मिळते ज्यात वाढ, उत्पादनात संपूर्ण वाढ, उत्पादनांची विविधता, भौगोलिक विस्तार आणि विशेष फायदे याबत पूर्ण क्षमता दिसण्यासाठी अर्धे शतक लागते.

भांडवल वादात विकास हा वेगवेगळ्या सलग यशस्वी टप्प्यां मध्ये होतो ज्या लायशस्वी तंत्रज्ञानात्मक क्रांत्यांचा हातभार असतो.

**तक्ता क्रं १ तंत्रज्ञानात्मक क्रांती**

| वर्ष /मुख्य देश | तंत्रज्ञानात्मक क्रांती आणि उद्योगाचे गुणधर्म |
|---|---|
| १९७१ इंग्लंड | औद्योगिक क्रांती(यंत्र, कारखाने आणि कालवे) |
| १८२९ युके | वाफ, कोळसा, लोखंड आणि रेल्वेचे युग |
| १८७५ युके, युएसए आणि जर्मनी | स्टिल आणि हेवी इंजिनिअरींग (इलेक्ट्रिकल, रासायनीक आणि सिव्हिलनेव्हल) चेयुग |
| १९०८ युएसए | ऑटोमोबाईल, तेल, पेट्रोकेमिकल्स आणि जन उत्पादनाचे युग |
| १९७१ युएसए | महिती तंत्रज्ञानाचे युग आणि दुरसंचाराचे युग |
| २००० | डिजिटलायझेशन, बायोटेक, बायोमॅट्रीक, नॅनोटेक आणि नविन पदार्थांचे युग |

भारताची सामाजिक-आर्थिक वैशिष्ठ्ये लक्षात घेतल्यास, देशाला विशिष्ट प्रकारची तंत्रज्ञाने सर्व समावेशक वाढ साध्य करण्यासाठी आवश्यक आहेत. मेकेंझीग्लोबल इन्स्टीट्युटने भारतासाठी१२बदल घडवणारी तंत्रज्ञाने ओळखली आहेत जी ठराविक काळात भारताला आत्मसात करता येऊ शकतात. या तंत्रज्ञानांचे फायदे आणि परिणाम व्यापक प्रमाणावर जाणवू शकतात ज्याने अनेक लोक, संस्था, उत्पादने आणि बाजार पेठा प्रभावित होतील. त्यांच्या दृष्टीने या तंत्रज्ञानाचे महत्वपुर्ण आर्थिक परिणाम होऊ शकतात.

अशी १२तंत्रज्ञाने पुढील प्रमाणे तीन प्रकारे विभागलेली आहेत : १) आयुष्य आणि कार्य डिजिटलाईझ करणारी तंत्रज्ञाने २) अद्यावत भौतिक यंत्रणा३) उर्जेचा पुनर्वापर करणारी तंत्रज्ञाने (तक्ता२) यात चार तंत्रज्ञाने भारतासाठी उपयुक्त आहेत ती म्हणजे डिजिटल देयके, पडताळता येणारी डिजिटल ओळख, अद्यावत परिवहन आणि वितरण आणि आधुनिक “जिएआयएस”. येणाऱ्या दशकात ही चार तंत्रज्ञाने मोठ्या प्रमाणावर आत्मसात करावी लागणार आहेत. आधुनिक रोबॉटिक्स, ऑटोनॉमस व्हेईकल्स, थ्रिडी प्रिंटीग आणि आधुनिक मटेरिअल्स ही इतर तंत्रज्ञाने सुद्धा भारतासाठी महत्वाची आहेत.

ह्या१२सक्षमता देणाऱ्या तंत्रज्ञानांमध्ये भारतासाठी आर्थिक आणि सामाजिक अशी दोन्ही मुल्ये निर्माण करण्याची क्षमता आहे, ज्यामुळे २०२५ पर्यंत वेगवान आर्थिक वाढ, व्यापक सामाजिक समावेशकता आणि सुशासन ही ध्येये साध्य करण्यास भारताला मदत होऊ शकेल. प्रथम आपण डिजिटल इंडिया कार्यक्रमाने याची सुरूवात करणार आहोत. त्यानंतर डिजिटलायझेशनाचा भारतीय अर्थव्यवस्थेच्या पाचक्षेत्रांवर होणाऱ्या परिणामांवर लक्ष देणार आहोत.

**✧ सांगा पाहू ✧**

१. पिपालाव गोदी कोणत्या राज्यात आहे ?
२. युनेस्कोने ‘संगीताची शहरे’ योजनेत भारतातील कोणत्या शहराचा समावेश केला आहे ?
३. आयपीएल क्रिकेट स्पर्धांबाबत कोणत्या समितीने दोन संघ निलंबित करण्याचा निर्णय घेतला ?
४. एअरोपोनिक्स हे तंत्र कशाशी संबंधित आहे ?
५. आठवी आशियायी एअरगन शूटिंग चॅम्पियनशिप स्पर्धा ऑक्टोबरमध्ये कोठे होणार आहे ?
६. फिफा महिला वर्ल्ड कपमध्ये हॅटट्रिक नोंदवणारी पहिली महिला खेळाडू कोण ?
७. जगभरातील आघाडीच्या तंत्रसमृद्ध शहरांमध्ये स्थान पटकावलेले भारतातील एकमेव शहर कोणते ?
८. भारतातून सर्वाधिक निर्यात केला जाणारा मसाल्याचा पदार्थ कोणता ?
९. अवकाशात सर्वांधिक काळ व्यतीत करण्याचा विक्रम असलेला गेनेडी पदालका हा कोणत्या देशाचा अंतराळवीर आहे ?
१०. नाबार्डचे पूर्ण रूप काय ?

**उत्तरे** : १, गुजरात, २. वाराणसी, ३. न्या. लोढा, ४. मातीशिवाय रोपांची लागवड, ५. नवी दिल्ली ६.कार्ली लॉइड, ७. बेंगळुरू, ८. मिरची, ९. रशिया, १०. नॅशनल बँक फॉर अॅग्रीकल्चर अँड रूरल डेव्हलपमेंट

**तक्ता क्र. २ भारताला सक्षम करणारी १२ तंत्रज्ञाने**

| | | |
|---|---|---|
| आयुष्य आणि कार्य डिजिटलाईज करणे | मोबाईल इंटरनेट | कोणत्याही व्यक्ती वा संस्थे पर्यंत कोठेही पोहचण्यासाठी स्वस्त आणि तेवढीच सक्षम मोबाईल उपकरणे आणि इंटरनेटची जोडणी |
| | क्लाऊड तंत्रज्ञान | इंटरनेट वा नेटवर्कवर उपलब्ध संगणकीय क्षमता, साठवण आणि ॲप्लिकेशन जे बहुतेक स्वस्त असते |
| | ज्ञान कार्याचे स्वयंचलन | रचना नसलेले विश्लेषण, भाषांचा अर्थ लावु शकणारे आणि सूज्ञतेवर आधारित कार्ये सक्षम सॉफ्टवेअर्स जेणेकरून निर्णय क्षमता सुधारू शकेल |
| | डिजिटल पेमेंट्स | सर्वत्र स्वीकारली जाणारी आणि भरवशाची इलेक्ट्रॉनिक्स पेमंट्स ज्यामुळे रोकड अर्थव्यवस्थेखाली असलेले भारतीय बँकीग खाली येऊ शकतील |
| | पडताळण्याजोगी डिजिटल ओळख | डिजिटल ओळख काही सोप्या पद्धतींनी पडताळता येऊ शकते ज्यामुळे सुरक्षित देयके शक्य होतील आणि सरकारी सेवा उपलब्ध होऊ शकतील |
| अद्यावत भौतिक यंत्रणा | गोष्टींचे जाळे | सततच्या माहिती आणि विश्लेषणाच्या सहाय्याने कमी खर्चीक सेंसर्स आणि ॲक्ट्युटर्स यंत्रे आणि गोष्टींचे व्यवस्थापन करणे |
| | अद्यावत परिवहन आणि वितरण | डिजिटल सेवा गोष्टींच्या जाळ्या बरोबर वापरून कार्यक्षमता, परिवहनाची सुरक्षितता आणि वितरण वाढवणे |
| | अद्यावत भौगोलीक माहिती यंत्रणा (जीआयएस) | स्त्रोत आणि भौगोलीक कार्याचे भौगोलीक क्षेत्रात स्थानाच्या माहितीच्या आणि इतर माहिती बरोबर संलग्नपणे चालणाऱ्या यंत्रणांच्या मदतीने व्यवस्थापन करणे |
| | जेनॉमिक्सची पुढची पिढी | कृषी उत्पादनात वेगवान, कमी किमतीचे जेन सिक्वेनिंग आणि आधुनिक जनुकीय तंत्रज्ञानाच्या सहाय्याने वाढ करून भारताची ऊर्जा सुरक्षा वाढवणे |
| रिथिंकींग एनर्जी | आधुनिक तेल व गॅस उत्खनन आणि पुनर्प्राप्ती | अपारंपारिक तेल आणि गॅस चे उत्खनन किफायतशीर करणारी आणि भारताची ऊर्जा सुरक्षा वाढवणारी तंत्रे |
| | नविकरणक्षम ऊर्जा स्त्रोत | नविकरणक्षम ऊर्जा स्त्रोतांपासुन वीज निर्मिती करतांना वातावरणावर होणारा विपरीत परिणाम कमी करणे आणि वीज उपलब्ध नसलेल्या दुर्गम भागात वीजेचा पुरवठा करणे |
| | आधुनिक ऊर्जेची कमतरता | वीजेचा खोळंबा, कमी-जास्त होणे आणि वितरण हानी कमी करणारी ऊर्जा साठवण उपकरणे वा व्यवस्था |
| स्त्रोत: नोशिरकाका, भारतातील तंत्रज्ञानातील सुवर्णसधी, हस्तांतरणीय कार्य, मॅककिन्ससे जागतिक संस्था, डिसेंबर २०१४ | | |

**४. डिजिटल इंडिया - तंत्रज्ञान वापरण्याचा एक प्रयत्न**

भारत सरकारने सुरु केलेला “डिजिटल इंडिया कार्यक्रम” हा लोकहितासाठी तंत्रज्ञान वापरून देशाला भेडसावत असलेल्या समस्यांवर मात करण्याचा प्रयत्न आहे. सदर कार्यक्रम डिजिटल भारतासाठी मार्ग आखत आहे ज्या द्वारे साक्षर लोकसंख्या कधी ही न संपणाऱ्या संधींचा लाभ घेण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करु शकेल. राजकीय पुढाऱ्यांनी हे स्पष्ट केले आहे की, ब्रॉड बँड महामार्ग हे राष्ट्रीय महामार्गा इतकेच महत्वाचे आहेत. राजकीय पुढाऱ्यांच्या बाबत एक गोष्ट स्पष्ट आहे की, चांगली सेवा देणे, नव्या गोष्टींना चालना देणे, नवीन रोजगार निर्मिती करणे ही अंतिम ध्येय साध्य करण्यासाठी तंत्रज्ञान ही चावी आहे आणि राष्ट्रव्यापी जाळे निर्माण करणे हे डिजिटल राष्ट्रासाठीची पायाभरणी आहे.

डिजिटल इंडिया कार्यक्रम हा प्रत्येक व्यक्तीला डिजिटल पायाभूत सुविधा ह्या एका संधी सारख्या उपलब्ध करुन प्रशासन आणि सेवा गरजेनुसार पोहचवतो आणि नागरीकांना डिजिटल दृष्ट्या सक्षम करतो. सदर कार्यक्रमाने विकासाचे ९ स्तंभ ओळखले आहेत. २५०,००० ग्रामपंचायतींना अवाक्यात आणणारे ब्राड बॅंड महामार्ग डिसेंबर२०१६ पर्यंत विकसित करणे या पैलूंवर विशेष भर देण्यात आला आहे. शहरी भागात ब्रॉड बॅंड केंद्रीकरण करण्यावर ही भर देण्यात येणार असून त्यासाठी नवीन इमारतीं मध्ये संभाषणाच्या आवश्यक त्या सुविधा असणे बंधनात्मक करण्यात आले आहे. ब्रॉंड बॅंड केंद्रीकरणामुळे तंत्रज्ञान सुलभ सेवा देशाच्या दुर्गम भागात देणे शक्य होऊ शकेल. सरकार मोबाईल जोडण्या सर्वत्र उपलब्ध करण्यासाठी ही कटी बद्ध आहे .२०१८ पर्यंत ४०,००० पेक्षा ही जास्त गावे मोबाईल तंत्रज्ञानाने जोडलेली असतील.

थोडक्यात डिजिटलायझेशन ही अनोख्या शोधांची नवीन लहर असून त्याची तुलना १९ व्या शतकातील यांत्रिकी करण आणि विद्युतिकरण या अनोख्या शोधांशी करता येईल. तंत्रज्ञानात्मक विकास हा क्रांतीकारी असतो आणि त्याचा समाजावर होणारा परिणाम ही क्रांतीकारी असतो.

**५. कृषी आणि ग्राम विकास**

आता आपण डिजिटल तंत्रज्ञानाचा भारतीय अर्थव्यवस्थेच्या विशिष्ट क्षेत्रासाठीच्या अवलंबावर चर्चा करु. भारताच्या गरिबी, सर्व समावेशक वाढ आणि अन्नसुरक्षा विषयक समस्या समजण्यासाठी भारतीय कृषी आणि कृषी-अर्थव्यवस्था समजणे अत्यंत आवश्यक आहे. या समस्यांवर खरा उपाय हा फक्त एकच मॉडेल तयार करणे हा नाही. त्या ऐवजी एखाद्या प्रांतात उपलब्ध होणाऱ्या स्त्रोतां नुसार विविध अनोख्या मॉडेल्सचा विचार दारिद्र्य निर्मूलन, चांगली उपजिविका आणि सदर प्रांतातील लोकांना अन्न सुरक्षा देण्यासाठी करता येऊ शकेल. १९५० पासूनची भारतीय शेतीची कथा ही प्रभावित करणारी आहे. भारताने लोकसंख्या वाढी पेक्षा जास्त वेगाने अन्न निर्मिती केली आहे. हरितक्रांती, शुभ्रक्रांती आणि नीलक्रांती यांमुळे भारतीय कृषी अर्थव्यवस्थेच्या यशाला हातभार लागला. भारत अन्न-धान्याचे उत्पादन पाचपटीने तर दुधाचे उत्पादन सातपट वाढवण्यात यशस्वी ठरला. त्याचवेळी आपण शेतकऱ्याच्या आत्महत्या आणि त्यांच्या आर्थिक शोषणा बाबतही ऐकत आहोत. तंज्ञांनी धोरणातील उणिवांवर बोट ठेवले आहे. मागे वळून पाहिले तर भारतीय कृषी धोरण मुख्यत्वे अन्न सुरक्षेसाठीच्या अन्नधान्यावर केंद्रीत राहिली आहे . उच्च मुल्य कृषीउत्पादनांच्या जास्त किमतीं त्यात दुर्लक्षित झाल्या. जनतेला उच्च पोषणता असलेले अन्न ही मिळू शकलेले नाही. धान्याच्या तुलनेत उच्च मूल्य असलेल्या उत्पादनांचे आयुष्य हे कमी असते आणि त्यांना जलद पुरवठा यंत्रणा लागते. शेतकऱ्यांपासुन सुरवात होणारी कृषीमूल्य साखळी ज्यात दलाल, अन्न प्रक्रिया उद्योगांची गोदामे, विक्रेते आणि सर्वात शेवटी ग्राहकांचा समावेश होतो तिला समग्रपणे समजून घेणे आवश्यक आहे ज्यामुळे योग्य धोरण आखता येऊ शकेल. सरकार, इतर वित्तपुरवठादार आणि विक्रेते यांची भागधारक म्हणून समाविष्ट झाल्यावर ही मूल्य साखळी अर्थव्यवस्थेत बदलते. प्रत्येक भाग धारकाची भूमिका आणि योगदान ही अर्थव्यवस्था टिकवण्यासाठी महत्त्वाची आहे. आधुनिक तंत्रज्ञान कृषी-मुल्य साखळी अधिक सक्षम आणि स्पर्धात्मक होण्यासाठी मदत करू शकेल.

मेकेंझीग्लोबल इन्स्टीट्युटने असे गणन केले आहे की, हायब्रिड जनुकीय दृष्ट्या बदल केलेली पिके, अचुक शेती (सेंसर्स आणि जी आय एस आधारीत माती, वातावरण आणि पाण्याच्या माहितीच्या सहाय्याने केलेली शेती) आणि मोबाईल इंटरनेटवर आधारीत शेती विस्तार आणि बाजार महिती सेवा यांच्या मदतीने प्रत्येक सेक्टर मागे ४५अब्ज ते ८० अब्ज अमेरीकन डॉलर अतिरिक्त मुल्य २०२५ पर्यंत निर्माण होण्यास मदत होऊ शकेल. बाकी गोष्टी साठवण आणि वितरण यांच्यातील सुधारणांद्वारे होऊ शकेल ज्यामुळे कापणी नंतरचे नुकसान कमी होऊन सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील गळती कमी करुन २०२५ मध्ये ३२ दश लक्ष अमेरीकन डॉलर वाचवायला मदत करेल. या सुधारणांमुळे १०० दशलक्ष शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढू शकेल आणि ३०० ते ४०० दशलक्ष कोटी ग्राहकांना सकस आहार मिळू शकेल.

शेतकऱ्यांना पिकाचा विमा देण्यातही तंत्रज्ञानाचा वापर प्रभावी ठरु शकतो. सर्व हवामान केंद्रांद्वारे पिकांच्या नुकसानीचा अंदाज, उपग्रह-ड्रोन यांच्या कडून मिळालेले कल्पना चित्र आणि मोबाईलवर

अधारीत निधीवितरण, पिक छाटणी प्रयोग यांद्वारे सक्षम वैज्ञानिक पार्श्वभूमी मिळवतानाच भ्रष्टाचारावर नियंत्रण मिळवता येईल.

डिजिटल इंडिया कार्यक्रम ग्रामीण नागरींकांनाही सक्षम करण्याचे लक्ष्य विविध सेवांद्वारे करतो. सुधारित प्रशासन, भू आलेख, रोजगार, आरोग्य, शिक्षण आणि शेती आणि वैयक्तिक आणि सार्वजनिक नोंदणीचे डिजिटलायझेशन द्वारे सुरक्षा करुन सरकार लोकसंख्येच्या मोठ्या भागापर्यंत पोहचण्यास सरकार उत्सुक आहे. नवीन उद्योगधंदे आणि असलेल्या उद्योगधंद्यांना ग्रामिण बाजारात सेवा देण्याची संधी मिळणार आहे.

**६. उत्पादनांची अर्थव्यवस्था**

विविध अर्थतज्ञ आणि संस्था यांनी असा अंदाज व्यक्त केला आहे की येत्या ५वर्षात तरूण मुले आणि मुलीं सहित तरुण वर्ग मोठ्या प्रमाणावर क्रयशक्तीशी जोडली जातील. या मुळे भारताला उत्पादन आणि संबंधित पर्यावरणाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. जागतिक उत्पादन यंत्रणा एक कंपनी आणि त्याचे विविध पुरवठादार, वित्त पुरवठादर आणि ग्राहक या तंत्रा पासून दूर जात असून त्याचा कल उत्पादन संबंधित पर्यावरणावर आहे. डिजिटलायझेशनने या संक्रमणाला मदत केली आहे. भारतीय कंपन्या आणि धोरणकर्त्यांना बाजार पेठेत स्पर्धात्मक होणे शिकावे लागणार आहे आणि तरुणांसाठी रोजगार निर्मितीवरही लक्ष द्यावे लागणार आहे. आधुनिक तंत्रज्ञान येथे मदत करू शकते आणि असे दिसून आले आहे की, भारतीय कंपन्या वेगाने तंत्रज्ञानाला अवगत करत आहेत.

सध्याच्या डिजिटलायझेशन असलेल्या व्यावसायिक वातावरणात कंपन्यांच्या कार्यप्रणालीत बदल आवश्यक आहे. मूल्य साखळी ही मोडली जात आहे, पुन्हा तयार होऊन त्यात नवीन बदल होत आहेत. मूल्य निर्मितीचे नवीन स्त्रोत जे अस्तित्वात असलेल्या मूल्य साखळ्या तोडून, नवीन मूल्य साखळ्या स्त्रोत वापरून आणि इतर उद्योगातील मूल्य साखळ्या वापरून निर्माण करणे आवश्यक झाले आहे.

याबाबत उत्पादन इकोसिस्टमला प्रोत्साहनात्मक असे धोरण सरकारने आखणे आवश्यक आहे ज्यामुळे मोठ्याप्रमाणावर रोजगारनिर्मिती होऊ शकेल आणि आपले उद्योग जागतिक स्तरावर स्पर्धा करू शकतील. लघु आणि मध्यम उद्योगधंद्यांकडे विशेष लक्ष देणे आवश्यक असून त्यांच्या मोठ्या उद्योगधंद्याच्या जोडणी वरही लक्ष देणे आवश्यक आहे.उत्पादन इकोसिस्टम संकल्पनेचा प्रसार केल्यास जोडणी मधील जोडण्याकडे लक्ष देणे आणि सुधारणा करण्याकडे आवश्यक लक्ष देणे शक्य होईल. वित्तपुरवठा, कच्चामाल, जमीन आणि समस्या आणि जोडणी यांच्यातील समस्या दूर करणे शक्य होईल.

वस्तु आणि सेवाकराची (जीएसटी) भारतातील अंमजबजावणी खूप महत्त्वाची ठरणार आहे आणि भारतातील उद्योग, कॉर्पोरेट विश्वाला वृद्धी साधण्यासाठी, स्पर्धात्मक होण्यासाठी मदत होणार आहे. हे ही आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराने शक्य होणार आहे. त्यातच डिजिटलइंडिया कार्यक्रमाद्वारे सरकारच्या इलेक्ट्रॉबक उत्पादनाला आवश्यक ते महत्व आणि भर देऊन शून्य आयातीच्या सरकारच्या लक्ष्याला साध्य करण्यावर ही भर दिला आहे. या मुळे भारताच्या उत्पादन क्षमते मध्ये वाढ होणार आहे आणि देशाचे उत्पादन केंद्र म्हणून रुपांतरण होणे ही शक्य होणार आहे. या कार्यक्रमाचा भाग म्हणून छोट्या शहरातील आणि गावातील जनतेला प्रशिक्षण देऊन माहिती तंत्रज्ञान सक्षमक्रयशक्ती रुजविण्याचा सरकारचा प्रयत्न पुढील पाच वर्षात असणार आहे.

**७. शिक्षण आणि कौशल्य निर्मिती**

आपल्या शिक्षण व्यवस्थेत अध्ययनाचे संकट आणि दर्जाचा अभाव जाणवत आहे. शालेय शिक्षणाचे कमजोर परिणाम, उच्चशिक्षण असलेल्या कामगारांसाठी रोजगाराची कमतरता, व्यावसायिक प्रशिक्षणातील कमतरता इ. गोष्टी दिसून येतात. भारतीय शिक्षण व्यवस्थेत अमुलाग्र बदल करण्याची मोठी संधी डिजिटलायझेशनामुळे उपलब्ध झाली आहे. अनोख्या डिजिटल तंत्रज्ञानामुळे आत्मसात आणि एकत्र शिकता येणाऱ्या संधींची निर्मिती झाली आहे आणि प्रशिक्षक, सल्लागारांशी संपर्क ही सुकर झाला आहे ज्यामुळे प्रत्यक्ष वेळे ची उपयुक्त माहिती देणे शक्य होणार आहे. भारत सरकारच्या डिजिटल इंडिया कार्यक्रमाद्वारे भारतीय शिक्षण व्यवस्थेत अमुलाग्र बदल घडून योग्य असे वातावरण देशभर निर्माण करणे शक्य होणार आहे . योग्य विचार करून आणि अंमलबजावणी करून नवीन तंत्रज्ञान विद्यार्थी अध्ययन, शिक्षकांची घडण आणि सल्लागारांची क्षमता सुधारणे आणि सुशासन देणे शक्य होणार आहे. आपल्या विशाल शालेय यंत्रणेत आणि उच्च शिक्षण संस्थात्मक जाळ्यात तंत्रज्ञान

एकत्रित करण्यासाठी समन्वित आणि केंद्रीत दृष्टीकोन आवश्यक आहे. असा तीन स्तंभावर आधारीत दृष्टीकोन निर्माण करणे शक्य होणार आहे.

पहिला महत्त्वाचा पैलू हा विद्यार्थ्यासाठी वैयक्तिक अशा संस्थात्मक शिकण्याच्या साधनांची निर्मिती करणे हा आहे. यात डिजिटलाईझ्ड पाठ्यपुस्तके, ऍनिमेशन आणि व्हिडिओअशाइ-सामग्रीच्या निर्मितीचा समावेश होतो. नवीन तंत्रज्ञान विद्यार्थ्यांसाठी वैयक्तिक शिक्षणाच्या वाटांची गेम्सच्या रुपात निर्मिती करुन शिक्षण संभाषणात्मक आणि मजेशीर करण्यात उपयुक्त ठरले आहे. यातुनी त्यांना सरावाच्या अनेक संधी मिळतात. खान अकादमी आणि माईंड स्पिक प्लॅटफॉर्म हे भारतातील अशा प्राधान्यांची उत्तम उदाहरणे आहेत. भारतात भाषांच्या आणि राज्य अभ्यासक्रमात असलेल्या विविधतेला उत्तर म्हणूनही आपण शिक्षणाच्या साधनांची निर्मिती करू शकतो.

एकात्मिक दृष्टीकोनाचा दुसरा पैलू हा शिक्षक प्रशिक्षणासाठी पूरकतेवर आधारीत अशा तंत्रज्ञान मिश्रित कार्यक्रमांचा विकास करणे हा आहे. तंत्रज्ञानामुळे पूरकतेवर आधारीत शिक्षकांच्या प्रशिक्षणाच्या नमुन्यांना पुन्हा उजाळा देणे शक्य होणार आहे. यामुळे शिक्षकांना त्याच्या सहकार्यांशी जोडणे शक्य होताना तज्ञांकडून प्रशिक्षण मिळणे ही शक्य होणार आहे. गुजरात, महाराष्ट्र आणि उत्तराखंड अशा विशिष्ट राज्यांमध्ये ज्ञान आणि संकल्पनांची देवाण घेवाण करण्यासाठी व्हॉट्सऍप ग्रुप्सच्या निर्मितीद्वारे नवीन तंत्रज्ञान वापरले गेल्याची उदाहरणे आहेत. कर्नाटक ओपन एज्युकेशनल रिसोर्स प्लॅटफॉर्म शिक्षकांना डिजिटल साधनांच्या निर्मितीत मदत करत आहे. सुचनात्मक व्हिडिओ, ऑनलाईन प्रशिक्षण आणि सहकार्य अशा विवीध आशयां मध्ये तंत्रज्ञान वापरल्याची उदाहरणे आहेत. एमओओडिसी (मॅस्सिव्ह ओपन ऑनलाईन कोर्सेस) सहित अध्ययनाद्वारा विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे अभ्यासक्रम उपलब्ध होणार आहेत आणि शिक्षणाच्या सिम्युलेशन द्वारे नर्सिंग आणि इतर क्षेत्रातील प्रत्यक्ष प्रशिक्षणाला मजबुती मिळणार आहे.

तंत्रज्ञान स्वीकाराचा पैलू वापर हा मजबूत प्रशासनासाठी माहिती संकलन


## Subscription Coupon

**[For New Membership / Renewal / Change of Address]**

I want to subscribe to :
**Yojana** : 1 Yr. **Rs. 100/-;** 2 Yrs. **Rs. 180/-;** 3 Yrs. **Rs. 250/-**
(Circle the period of subscription)

DD / MO No. ______________________ date ____________

Name (in block letters) : ______________________

Subscriber profile : Student / Academician / Institution / Others

Address : ______________________

PIN : □□□□□□

Please allow us 4 to 6 weeks to the despatch of the first issue.

P.S. : For Renewal / change in address, please quote your subscription number.

**सभासद शुल्क केवळ मनी ऑर्डरद्वारे पाठवावे.**
Subscription Fee should be send only through MO

आणि विश्लेषणा साठी आहे. सक्षम व्यवस्थापन माहिती यंत्रणेच्या मदतीने, सर्व शैक्षणिक संस्था विद्यार्थ्यांच्या पातळी वरील कामगिरीची साठवण, त्यावर देखरेख आणि विश्लेषण करू शकतील आणि संस्थात्मक पातळीवर आणि शिक्षक-वर्ग बाबतच्या ध्येयासाठी वापर करता येईल. केरळ, महाराष्ट्र, गुजरात आणि ओरिसा यांनी हे उपाय राबवण्यासाठी पावले टाकली आहेत.

**८. आरोग्य सेवांची उपलब्धता**

आंतरराष्ट्रीय मानांकना नुसार भारतात लोकसंख्येच्या तुलनेत केवळ अर्ध्याच प्रमाणात डॉक्टर्स, परिचारिका आणि आरोग्य केंद्रे आहेत. त्यात अस्तित्वात असलेल्या सुविधा आरोग्या बाबतचे योग्य निकाल देण्यासाठी सक्षम नाहीत. दुर्लभ आरोग्य सेवांचा विस्तार (मोबाईल इंटरनेट द्वारे तज्ञांचे मार्गदर्शन), मूलभूत प्रोटोकॉल साध्य करण्यासाठी साधारण कौशल्य असलेल्या आरोग्य सेवा कार्यकर्त्यांना डिजिटल साधने देऊन शक्य करणे आणि स्मार्टफोनद्वारे कमी किमंतीची आजार शोधणारी साधने देणे शक्य आहे. उदाहरण द्यायचे झाल्यास डोळ्यांच्या परिक्षणासाठी स्मार्टफोनचे रुपांतरण परवडणारे असे उपकरण म्हणून शक्य आहे. नेत्रा-जी नावाच्या डोळ्यांसाठीचे उपकरण स्मार्टफोन मध्ये लावून आणि सॉफ्टवेअरच्या सहाय्याने आणि मुलभुत डोळ्यांच्या तंत्रज्ञाना द्वारे डोळ्याच्या परावर्तनातील चूक शोधू शकते व ते ही केवळ ३०० रुपये एवढ्या कमी किमतीत. चष्म्या पेक्षा जास्त गरजा असलेल्या रुग्णांसाठी दूरच्या डॉक्टरां बरोबर थेट माहितीची देवाणघेवाण करता येउ शकते. पण हे तेंव्हाच साध्य होऊ शकेल जेंव्हा आपण जोडलेला समाज निर्माण करू शकू. डिजिटलायझेशनचे लक्ष हे आरोग्य सेवांचा दर्जाची पोहोच, दर्जा आणि सुरक्षा सुधारणे आणि दर्जा व सुरक्षित एककांची मोजणी शक्य करणे हे आहे.

**९. इ-गव्हर्नन्स**

डिजिटल इंडियाचे जाहीर झालेले ध्येय हे भारताला ''डिजिटली सक्षम समाज बनवणे आहे ज्या द्वारे 'क्नॉ लेजफ्यूचर" ची निर्मिती करता येऊ शकेल. डिजिटल इंडिया हे सर्वइ-गव्हर्नन्स आणि केंद्र सरकारच्या जोडणीच्या योजना आणि प्रकल्प यांचे एकत्रीकरण वाटते.


Yojana : Published in Hindi, English, Urdu, Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Punjabi, Bengali, Assamese & Oriya

Send your subscription by DD / MO in the name of Director, Publications Division, addresses to :

**Advertisement & Criculation Manager, Publications Division, Ministry of Information & Broadcasting Room No. 48 to 53, Soochna Bhavan, CGO Complex, Lodhi Road, New Delhi - 110003.**

**Subscriptions will arise also be accepted at our sales emporia:**

● Hall No.196, Old Secretariat, **Delhi-110054,** Ph.011-2389 0205 ● A-wing, Rajaji Bhavan, Besant Nagar, **Chennai-600090,** Ph.: 044-2491 7673 ● 8, Esplande East, **Kolkata - 700069,** Ph: 033-2248 8030 ● Bihar State Co-operative Bank Building, Ashoka Rajpath, Patna-800004. Ph.: 0612-268 3407 ● Press Road, Near Govt., Press **Thiruvananthapuram-695001,** Ph.: 0471-2330 650 ● Hall No. 1, 2nd floor, Kendriya Bhawan, Sector - H, Aliganj, **Lucknow-226024,** Ph.: 0522-232 5455 ● 701, C-Wing, 7th Floor, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, **Navi Mumbai-400614,** Ph.: 022 2757 0686 ● Block 4, 1st Floor, Gruhakalpa Complex, M.G. Road, Nampally, **Hyderabad - 500001.** Ph.: 040-2460 5383 ● 1st Floor, F-Wing, Kendriya Sadan, Koramangala **Bangalore-560034.** Ph.: 080-2553 7244 ● KKB Road, New Colony, House No.7, Chenikuthi, Guwahati-781003, Ph.: 0361-2665 090 ● Ambica Complex, 1st Floor, Paldi, **Ahmedabad - 380007.** Ph.: 079-2658 8669.

**For Yojana Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Bengali, Assamese, Oriya, Urdu and English, Hindi - please enrol yourself with Editors of the respective at the addressess given Below;**

Editor, Yojana (Marathi), B-701, Kendriaya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai-400614. Ph.: 022-2756 6582
Editor, Yojana (Gujarati), Ambika Complex, 1st Floor, Paldi, Ahemdabad-380007. Ph.: 079-2658 8669
Editor, Yojana (Assamese), KKB Road, New Colony, House No. 7, Chenikuthi, Guwahati-781003. Ph.: 0361-266 5090
Editor, Yojana (Bengali), 8, Esplanade East, Ground Floor, Kolkata-700069. Ph.: 033-2248 2576
Editor, Yojana (Tamil), 'A' Wing, Rajaji Bhawan, Basant Nagar, Chennai-600090. Ph: 044-2491 7673
Editor, Yoajna (Telugu), Block No. 4, 1st Flr., Gruhakalpa Complex, M.G.Rd, Nampally, Hyderabad-500001. Ph.:040-2460 5383
Editor, Yojana (Malayalam), Press Road, Near Govt. Press, Thiruvananthapuram-695001, Ph: 0471-233 0650
Editor, Yojana (Kannada), 1st Floor, 'F' Wing, Kendriya Sadan, Koramangala, Bangalore-560034, Ph: 080-2553 7244.

उदाहरण द्यायचे झाल्यास बीएसएनएचा २५०००० ग्रामपंचायतींना ऑप्टिकल फायबरने जोडणारा ग्रामीण ब्रॉड बँड कार्यक्रम ही डिजिटल इंडिया कार्यक्रमात आणण्यात आला आहे आणि त्याचे नाव भारत-नेट असे करण्यात आले आहे. इ-गव्हर्नन्स वा नागरीकांना डिजिटली सक्षम करण्या मागे मुख्य विचार हा नागरीक आणि सरकार यांना लालफितीचा कारभार, मध्यस्थ आणि भ्रष्टाचार संपवून जवळ आणणे आहे.

भारतात इ-गवर्नन्सची सुरवात औपचारिक पणे १९८६ साली नवी दिल्लीत पहिल्या संगणकीकृत प्रवासी आरक्षणकेंद्रा द्वारे झाली. ही भारतीय बनावटीची रचना, विकसित आणि राबवलेला प्रकल्प संगणक तंत्रज्ञानाची जनसेवेत विलंब, भ्रष्टाचार आणि कमतरता दूर करण्याची क्षमता सिद्ध करणारा होता. कर्नाटकातील भूमी प्रकल्प ज्याअंतर्गत जमिनीच्या नोंदींचे संगणकीकरण करण्यात आले तो ही इ-गव्हर्नन्स कार्यक्रमाचे उदाहरण होता. हे प्रकल्प इंटरनेट, ब्रॉडबँड आणि मोबाइल तंत्रज्ञानाच्या आगमनाने अजून सुधारले आहेत आणि इतर राज्ये व उपक्रमांसाठी इ-गव्हर्नन्सचा हा उत्तम नमुना ठरला आहे.

इतर देशां प्रमाणेच भारतातही नागरीकांसाठी सरकार प्रभावी आणि प्रतिसादात्मक बनवण्याचे आव्हान आहे. आपल्या अंदाजा नुसार सरकारचा मूलभूत सेवांवर होणारा ५०% खर्च हा लोकांच्या खऱ्या हितासाठी रूपांतरित होतोच असे नाही आणि किचकट सरकारी प्रक्रिया हा गुंतवणूक आणि वाढ यातील अडथळा आहे. इ-गव्हर्मेंट सेवांच्या आर्थिक प्रभावाने स्पर्धात्मकता वाढेल आणि उद्योगांसाठी सकारात्मक वातावरण निर्माण होऊ शकेल.

## १०. निष्कर्ष

डिजीटल इंडियाचे ध्येय भारताच्या सर्वसमावेशक विकासात आधुनिक तंत्रज्ञानाची भूमिका तपासणे हे आहे. पंतप्रधानांच्या मते, म्हणतात डिजिटल तंत्रज्ञानाची भूमिका तपासली आहे आणि 'डिजिटलइंडिया' कार्यक्रम तुमच्या पर्यंत आणला आहे. शेती, उत्पादन, शिक्षण, आरोग्यसेवा आणि सरकारी सेवा या पाच क्षेत्रांकडे पहिल्यास नवीन डिजिटल तंत्रज्ञान या क्षेत्रांचा कायापालट होणार आहे. या क्षेत्रातील कमतरता आणि उणिवा तंत्रज्ञानाच्या वापराने कमी करता येतील. यात भारतीय कृषी क्षेत्राचा कायापलट होऊ शकेल आणि ग्रामीण भागातील उपजीविकेचे साधन आणि रहाणीमान यांच्यात सुधारणा होऊ शकेल. उत्पादन क्षेत्र जास्त स्पर्धात्मक होईल आणि त्यामुळे त्याचा आवाका वाढून जास्त रोजगार निर्मिती होऊ शकेल. शिक्षणातील दर्जा आणि अध्ययनाच्या समस्या डिजिटल तंत्रज्ञानाने सोडवता येऊ शकतात. सरकारी सेवांची तरतूद ही बऱ्यापैकी सुधारता येऊ शकते. थोडक्यात तंत्रज्ञानाने बऱ्यापैकी आर्थिक विकास सर्व समावेशक वाढीस हित साध्य करता येऊ शकेल ज्यात स्थिर प्रशासन, समावेश आणि उपलब्ध आरोग्यसेवा, शिक्षण आणि नागरी सेवा यांचा समावेश असेल.


नवीन आधुनिक तंत्रज्ञानाचा पूर्ण फायदा होण्यासाठी भौतिक पायाभूत सुविधा डिजिटल अर्थव्यवस्थेसाठी उभी करण्या बरोबरच तंत्रज्ञान आत्मसात करण्यातील अडथळे दूर करणे आणि तंत्रज्ञानाचे विपरीत परिणाम नियंत्रित आणि त्यावर लक्ष ठेवण्यासाठी प्रभावी धोरणे, नियम आणि मानांकने विकसित करणे आवश्यक आहे. चांगली नविन शोधांची इकोसिस्टीमही निर्माण करण्याची गरज आहे. भारत हा बहुभाषिक देश आहे त्यामुळे माहिती, ज्ञान आणि संधी यांच्या प्रसारा साठी बहुभाषिक क्षमता पसरण्याची गरज आहे. पारंपारिक व्यवस्था आधुनिक व्यवस्थांमध्ये एकत्रित करण्याची गरज आहे ज्या मुळे प्रशासनाचे विविध पैलू सोपे होणार आहेत मग ते प्रभावी सार्वजनिक वितरण व्यवस्था, स्वयंचलित कार्य वा शहरी-ग्रामीण वातावरणात बदल करणे वा चांगली आरोग्य सेवा देणे असेल. येथे उल्लेख करणे आवश्यक आहे की, पाश्चात्य देशात डिजिटल तंत्रज्ञानाच्या अवलंबाने सुधारणा आणि उत्पादकता वाढवली आहे तर रोजगार कमी झाले आहेत. भारतात मध्यम कालखंडात या मुळे रोजगार वाढणार आहेत. या महत्त्वाच्या पैलूवर खास लक्ष देणे आणि जबाबदारी बाळगणे आवश्यक आहे

*(लेखक **विजय कुमार कौल** हे दिल्ली विश्वविद्यालयात प्राध्यपक आहेत. गेली ३६ वर्षे ते अध्यापन, संशोधन कार्य आणि नवसंशोधन, व्यापार उद्यमशिलता, लघुउद्योग, औद्योगीक क्लस्टर्स, आंतरराष्ट्रीय व्यापार आणि स्ट्रॅटजिक व्यवस्थापन या क्षेत्रात सल्लगार म्हणून काम केले आहे.)*

***संपर्कासाठी ई - मेल***
kaulvijay@yahoo.com

# आर्थिक समावेश आणि सामाजिक बदल

**चरणसिंह, सी.एल.दधीच आणि एस. आनथ**




**"अंतर्गत वृध्दी आणि सामाजिक बदला"मध्ये आर्थिक समावेशकता हा एकत्रित मुद्दा असून सर्वांगिण विकासात महत्त्वाची भूमिका हा मुद्दा बजावतो. आर्थिक समावेशकतेमुळे जशी शहरीकरणाची प्रक्रिया वाढून पायाभूत सुविधांसह आर्थिक गुंतवणूक साधने निर्माण झाली तशीचं ग्रामीण विकास प्रक्रियेत उपरोक्त साधनांचे प्रसारण, विस्तार झाल्याने रोजगारभिमुख, तंत्रज्ञान हस्तांतरण, ग्राहकाभिमुख विचार प्रक्रियांनी जोर धरला आहे. त्यामुळे उपलब्ध आर्थिक साधनांबरोबरचं नवनिर्मित साधनांची अंमलबजावणी (जसे विविध प्रकारच्या ठेवी, समभाग सुवर्ण रोखी इत्यादी) उपरोक्त संस्था करतील, त्यामुळे अर्थव्यवस्थेतील रचनात्मक क्षमता बंधनातुन मुक्त होईल आणि बाजाराच्या दृष्टीने कल्पनांचे रूपांतर उत्पादीत वस्तुंमध्ये करण्यासाठी सुलभ अर्थपुरवठा उपलब्ध होईल.**

देशातील गुंतवणूक सुलभ व्हावी आणि देशाची आर्थिक वाढ व्हावी यासाठी समाजातील संवेदनशील आणि दुर्बल घटकांना अर्थपुरवठा सहज उपलब्ध करून देणे हा आर्थिक समावेशाच्या पाठीमागील मुख्य हेतू आहे. आर्थिक समावेशामुळे देशभरात समानतेने अधिक चांगल्या प्रकारे आणि अधिक चांगला सामाजिक विकास करणे शक्य होते. महिलांबरोबरच समाजातील दुर्लक्षित आणि गरीब घटकांना स्वयंपूर्ण बनवून त्यांना अधिक चांगले आर्थिक निर्णय घेता यावेत यासाठी आवश्यक माहिती देऊन सक्षम करणे शक्य होते. बचत आणि वितरण खाते, कर्ज विमा आणि निवृत्ती वेतन यासारख्या विस्तृत प्रमाणात उपलब्ध असलेल्या आर्थिक सेवा सर्वांना उपलब्ध होतील याची निश्चिती करणे हा आर्थिक समावेशाचा हेतू आहे. याशिवाय, व्यावसायिक संधी, शिक्षण, निवृत्तीनंतरच्या काळासाठी बचत आणि तातडीच्या कर्जासह जोखिम विमा यासाठी सेवा पुरवण्याचा हेतूदेखील आर्थिक समावेशामागे आहे. अशाप्रकारे, देशातील बहुसंख्य रहिवांशाचे उत्पन्न आणि जीवनाचा स्तर अधिक चांगला व्हावा हा आर्थिक समावेशाचा प्रमुख उद्देश आहे.

आर्थिक समावेश हा एक भाग असलेल्या औपचारिक आर्थिक क्षेत्रातील सहभाग वाढवणे ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासूनच सरकार आणि त्याचबरोबर भारतीय रिझर्व्ह बँक आर्थिक समावेशाची व्याप्ती वाढवण्यासाठी विचारविनिमय करून उपाययोजना करत आहे. यापूर्वी केलेल्या उपयायोजनांना अपेक्षेप्रमाणे यश आलेले नाही. मात्र, गेल्या काही महिन्यात भारत सरकारने या धोरणावर पुनर्विचार करून बँकेत खाते उघडण्यापुरत्या मर्यादित दृष्टिकोनातून केलेल्या आर्थिक समावेशाला यश मिळाले आहे. प्रधानमंत्री जनधन योजनेला (PMJDY) यश मिळाले असून भारतातील सुमारे ९८ टक्के कुटुंबांचे आज बँक खाते आहे. एकूण विचार केला तर या कार्यक्रमांमुळे भारतात परिवर्तन घडून येत आहे आणि त्यांचे परिणाम जरी वेगवेगळे असले तरी सामाजिक-आर्थिक परिस्थितीत बदल होत आहे.

**आर्थिक समावेशाची ऐतिहासिक उत्क्रांती**

अनौपचारिक क्षेत्राची व्याप्ती कमी करण्याच्या मुद्द्यावर धोरणकर्ते वसाहतकाळापासून अगदी ठाम होते. कर्जपुरवठादारांचे वर्चस्व दूर करण्यासाठी भूविकास बँक (`Land banks') स्थापन करण्याची गरज सन १८९५ मधील निकोलसन अहवालात पहिल्यांदा प्रकर्षाने व्यक्त करण्यात आली. परिणामी, सहकारी पतपुरवठा सोसायट्यांना अन्य बाबींबरोबरच कायदेशीर आधार देण्यासाठी सहकारी पतपुरवठा सोसायटी

कायदा, १९०४ संमत करण्यात आला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या काही वर्षात आणि १९५१-५४ या कालावधीसाठी अखिल भारतीय पतपुरवठा सर्वेक्षण झाल्यानंतर लगेचच पतपुरवठ्याची उपलब्धता वाढविण्याच्या संकल्पनेचे महत्त्व वाढू लागले. १९५०-५१ या काळात शेतकऱ्यांना करण्यात आलेल्या एकूण पतपुरवठ्यापैकी केवळ ०.९ टक्के पतपुरवठा व्यापारी बँकांनी केला होता तर २४.९ टक्के पतपुरवठा कृषीतज्ञ असलेल्या पतपुरवठादारांनी आणि ४४.८ टक्के पतपुरवठा व्यापारी पतपुरवठादारांनी केला होता. (आरबीआय २००८,२०११). आर्थिक समावेशाच्या सुरवातीच्या प्रयत्नांमध्ये, १९५५ साली करण्यात आलेल्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या राष्ट्रीयकरणाचा समावेश होता, त्यानंतर १९६९ आणि १९८० मध्ये इतर अनेक बँकांचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. औपचारिक आर्थिक संस्थांकडे जाणे अधिक सोपे व्हावे या उद्देशाने राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँकेची (NABARD) स्थापना आणि शेतीसह विशिष्ट क्षेत्रांच्या पतपुरवठ्यात वाढ करण्यासाठी प्राधान्य क्षेत्रांना पतपुरवठा करण्याची संकल्पना अस्तित्त्वात आणणे या अन्य उपाय योजण्यात आले. भारतीय रिझर्व्ह बँकेने २००५ मध्ये सर्व घटकांसाठी विविध प्रकारच्या आर्थिक सेवांच्या समावेशासह अनेक उपाययोजना जाहीर केल्या. सुरवातीला, किमान रक्कम ठेवण्याचा आग्रह न धरता खाते उघडून घेण्याचा सल्ला बँकांना देण्यात आला. (ऑगस्ट २०१२ मध्ये त्याचे नव्याने नामकरण मूलभूत बचत बँक ठेव खाते असे आणि आता जन धन खाते असे करण्यात आले.) रंगराजन समितीने (भारत सरकार, २००८) गरीबांसाठी ठेवी, कर्जपुरवठा, सूक्ष्म विमा आणि पूर्तता यांच्याशी संबंधित गरजा पूर्ण करतील अशा सेवा देण्यासाठी बँकांचा सेवाविस्तार करण्याच्या आवश्यकतेसह विविध उपाययोजना सुचविल्यामुळे आर्थिक समावेशाला अधिक प्रेरणा मिळाली. त्याचवेळेला, मार्गदर्शक तत्त्वावर शंभर टक्के आर्थिक समावेश साधण्यासाठी किमान एका जिल्ह्याची निवड करण्याचा सल्ला बँकांना देण्यात आला. बँकांना असाही सल्ला देण्यात आला की - (i) दूरवरच्या गांवामध्ये घराच्या दारात कमी खर्चात बँकेच्या सेवा पुरवण्यासाठी आयसीटीवर आधारित बिझनेस करस्पाँन्डस मॉडेल (बीसी मॉडेल) वापरण्यास सुरवात करावी, (ii) मंडळाने मान्यता दिलेली २०१० पासून सुरू होणारी तीन वर्षासाठीची आर्थिक समावेश योजना राबवावी, (iii) दोन हजारपेक्षा जास्त लोकसंख्या असलेली सर्व गावे २०१२ पर्यंत आणि एक ते दोन हजारच्या दरम्यान लोकसंख्या असलेली सर्व गावे २०१३ पर्यंत समाविष्ट करण्यासाठी पथदर्शी आराखडा तयार करावा, (iv) किमान चार बँकींग उत्पादने उपलब्ध करून द्यावीत आणि (v) नव्या शाखांपैकी किमान २५ टक्के शाखा ग्रामीण भागात बँक नसलेल्या भागात सुरू कराव्यात.

अन्य महत्त्वाच्या उपायांमध्ये किसान/सर्वसाधारण क्रेडीट कार्ड देण्याचा समावेश आहे. अलिकडचा पुढाकार म्हणजे, ज्यांना दहा लाख रूपयांपेक्षा जास्त अर्थपुरवठ्याची गरज नसते अशा लहान उद्योजकांना पतपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी सूक्ष्म उद्योग विकास पुर्नवित्तपुरवठा संस्था बँक (Micro Units Development Refinance Agency - MUDRA). वीस हजार कोटी रूपयांचे भांडवल आणि तीन हजार कोटी रूपयांची कर्जहमी निधी देऊन स्थापन करण्यात आलेली मुद्रा बँक भारतातील सूक्ष्म उद्योगांना अर्थपुरवठा करणाऱ्या आर्थिक संस्थांना पुर्नवित्तपुरवठा करेल आणि सहाय्य देईल. मात्र, अशा अनेक प्रयत्नांनंतर विशेषत: ग्रामीण भागातील पतपुरवठ्याच्या औपचारिक स्रोताचा विस्तार मंदगतीचाच राहिला आहे. अखिल भारतीय कर्ज आणि गुंतवणूक सर्वेक्षणातून (AIDIS २०१३) असे दिसून येते की, संस्थात्मक प्रतिनिधी कार्यालयाकडून कर्ज घेतलेल्या कुटुंबांचे प्रमाण १७.२ टक्के तर गैर-संस्थात्मक प्रतिनिधी कार्यालयाकडून कर्ज घेतलेल्या कुटुंबांचे प्रमाण १९ टक्के आहे. अशाप्रकारे, पतपुरवठ्याचा प्रभावी स्रोत म्हणून सावकारांची जागा घेण्यात, ग्रामीण भागात औपचारिक क्षेत्राचा विस्तार आणि विविध कार्यक्रम यांना यश आलेले नाही. अनंत आणि ऑनकू (२०१३) यांनी गरीबांमध्ये औपचारिक बँकींग सेवेचा विस्तार होण्यात येणारे अडथळे ठरतात अशी अनेक कारणे सांगितली आहेत. सिंह आणि नाईक (२०१५) यांनी, २०१४ च्या सुरवातीला करण्यात आलेल्या सर्वेक्षणाचे निष्कर्ष सांगून आर्थिक समावेशाच्या प्रारूपातील मागणी आणि पुरवठ्याच्या बाजूंमधील त्रुटींचा अनुभव आणि प्रयोगावर आधारित अभ्यास केला.

या संदर्भात, प्रधानमंत्री जनधन योजना जुन्या योजनांपेक्षा वेगळी आहे

कारण ती केवळ एखाद्या मोहिमेच्या धर्तीवरील मार्गाने आर्थिक समावेशाचा कार्यक्रम राबवते असे नाही तर ती रूपे डेबिट कार्ड, सूक्ष्म विमा देऊ करते आणि तिचा भर गावांना समाविष्ट करून घेण्याऐवजी कुटुंबाचा समावेश करून घेण्यावर आधारीत आहे. प्रधानमंत्री जनधन योजना सुरू करतानाच, २६ जानेवारी २०१५ पर्यंत साडेसात कोटी बँक खाती उघडण्याचे ध्येय निश्चित करण्यात आले होते पण त्याला विक्रम मोडीत काढणारे यश मिळाले.

**तक्ता १ : प्रधानमंत्री जनधन योजना**

(आकडे कोटींमध्ये)

| अ.क्र. | | उघडल्या गेलेल्या खात्यांची संख्या | | | रूपे डेबिट कार्डांची संख्या | खात्यांमधील शिल्लक रक्कम | शून्य शिल्लक असलेल्या खात्यांचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ग्रामीण | शहरी | एकूण | | | |
| १. | सार्वजनिक क्षेत्रातील बँका | ६.९ | ५.८ | १२.७ | ११.९ | १४३५७.५ | ५२.३ |
| २. | खासगी बँका | २.५ | ०.४ | २.९ | २.१ | ३२५८.५ | ५२.१ |
| ३. | प्रादेशिक ग्रामीण बँका | ०.४ | ०.३ | ०.७ | ०.६ | १०६८.६ | ४९.३ |
| | एकूण | ९.७९ | ६.५ | १६.३ | १४.५ | १८६८४.६ | ५२.२ |

स्रोत : भारत सरकार (२०१५ ए)

**आर्थिक समावेशाचा सामजिक-आर्थिक प्रभाव**

आर्थिक समावेशासाठीच्या चालनेचा प्रभाव केवळ बँकींगच्या पलिकडे पडला आहे. आर्थिक वाढीसाठी प्रभावी बँकींग क्षेत्राच्या निर्मितीची आणि विस्ताराची आवश्यकता आहे हे गेल्या दोन दशकांमध्ये स्पष्ट झाले आहे. ऐतिहासिकदृष्ट्या आर्थिक बदलांमुळे सामाजिक बदल होतात यात कोणतीच शंका नाही. आर्थिक समावेशाच्या विस्ताराला दिलेल्या चालनेमुळे मोठ्या आर्थिक आणि सामाजिक बदलांना बळ मिळत आहे. ग्रामीण भारतात फार खोलवर बदल बघायला मिळत आहेत. त्यामध्ये शेतीचे फार वेगाने यांत्रिकीकरण, वाहतूक आणि संपर्क यामध्ये सुधारणा आणि अन्य तंत्रज्ञानात्मक बदल. बँकींग व्यवहारामध्ये एकदम झालेल्या मोठ्या वाढीतून सामाजिक-आर्थिक बदल दिसून येत आहेत. (तक्ता २).

**तक्ता २ : आर्थिक समावेशाची प्रगती : बँका आणि आरआरबीएस**

| तपशील | २०१० वर्षअखेर | २०११ वर्षअखेर | २०१२ वर्षअखेर | २०१३ वर्षअखेर | २०१५ वर्षअखेर |
|---|---|---|---|---|---|
| बँकेची सेवा असलेली गावे | | | | | |
| शाखा | ३३,३७८ | ३४,८११ | ३७,४७१ | ४०,८३७ | ४६, १२६ |
| शाखेविना उपस्थिती | ३४,३१६ | ८१,३९७ | १४४२८२ | २,२७,६१७ | ३,३७,६७८ |
| एकूण | ६७,६९४ | १,१६,२०८ | १,८१,७५३ | २, ६८. ४५४ | ३, ८३, ८०४ |
| बँक बीसींद्वारे शहरातील स्थान | ४४७ | ३,७७१ | ५,८९१ | २७,१४३ | ६०,७३० |
| **प्राथमिक बचत बँक ठेवी खाते - शाखा** | | | | | |
| आकडे दशलक्षात | ६०.१९ | ७३.१३ | ८१.२० | १००.८० | १२६.०० |
| रक्कम कोटी रूपयांमध्ये | ४४.३३ | ५७.८९ | १०९.८७ | १६४.६९ | २७३.३० |
| प्राथमिक बचत बँक ठेवी खाते - बीसी | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| आकडे दशलक्षात<br>रक्कम कोटी रूपयांमध्ये | १३.२७<br>१०.६९ | ३१.६३<br>१८.२३ | ५७.३०<br>१०.५४ | ८१.२७<br>१८.२२ | ११६.९०<br>३९.०० |
| ओव्हरड्राफ्टची सुविधा बीएसबीडीए खात्यांमध्ये उपयुक्त | | | | | |
| आकडे दशलक्षात<br>रक्कम कोटी रूपयांमध्ये | ०.१८<br>०.१० | ०.६१<br>०.२६ | २.७१<br>१.०८ | ३.९२<br>१.५५ | ५.९०<br>१६.०० |
| केसीसी | | | | | |
| आकडे दशलक्षात<br>रक्कम कोटी रूपयांमध्ये | २४.३१<br>१२४०.१० | २७.११<br>१६००.०५ | ३०.२४<br>२०६८.३९ | ३३.७९<br>२६२३.०० | ३९.९०<br>३६८४.५० |
| **जीसीसी** | | | | | |
| आकडे दशलक्षात<br>रक्कम कोटी रूपयांमध्ये | १.४०<br>३५.१० | १.७०<br>३५.०७ | २.११<br>४१.८४ | ३.६०<br>७६.३० | ७.४०<br>१०९६.९० |

स्रोत : भारत सरकार (२०१४सी), आरबीआय (२०१३,२०१४,२०१५).

प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना आणि अटल पेन्शन योजना या तीन परवडणाऱ्या सामाजिक सुरक्षा योजनांसह बहुव्यापी सामाजिक सुरक्षा जाळे निर्माण करण्याची क्षमता हा जनधनचा संभाव्य सामाजिक प्रभाव आहे. या तीन योजनांद्वारे जवळपास १० कोटी ४० लाख जणांना सुरक्षा मिळाली आहे. (भारत सरकार, २०१५बी). प्रधानमंत्री जनधन योजनेचे खाते केंद्रवर्ती ठेवून गरीब आणि असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी सामाजिक सुरक्षेचे जाळे सामायिकरित्या निर्माण करत असताना या योजनांचे फायदे नागरिकांपर्यंत पोहोचवता येतील अशाप्रकारे त्यामध्ये बदल करता येऊ शकतील.

आर्थिक समावेशात, विशेषत: २०१० नंतर तंत्रज्ञान आघाडीवर आहे. तंत्रज्ञानातील प्रगती आणि सातत्याने कमी होत असलेली तंत्रज्ञानातील गुंतवणूक / उपलब्ध होणारे उपाय हे प्रधानमंत्री जनधन योजनेसाठी खूपच आशादायक आहे. जनधन, आधार आणि मोबाईल (JAM) यांच्या जोडीला मिळणारा क्रेडिट आणि डेबिट कार्डचा वापर करण्याचा प्रस्तावित अधिकार यामुळे एक विशेष संधी मिळणार आहे, त्यामुळे आपल्या अर्थव्यवस्थेत आणि समाजात फार मोठा लक्षणीय बदल घडून येणे सहज शक्य होईल. बँकींग क्षेत्राच्या विस्ताराबरोबरच सरकारी सेवा नागरिकांपर्यंत पोहोचवण्यात सुधारणा करण्यासाठी विविध राज्य सरकारांनी माहिती आणि दूरसंचार तंत्रज्ञानामध्ये गुंतवणूक केल्यास, आधार योजना लागू करण्यात आल्याने जशी डिजीटल कार्यव्यवस्था निर्माण करता येईल अशी कार्यपद्धती तयार करण्याची वैशिष्ट्यपूर्ण, आत्तापर्यंत अज्ञात असलेली संधी उपलब्ध झाली होती, तशी संधी उपलब्ध होऊ शकेल. आम्ही प्रत्यक्षात जागेवर जाऊन केलेल्या अभ्यासात एक लहानशी बाब समोर आली ती म्हणजे, जनधन योजनेचा विस्तार लक्षात घेता हे अवघड असे वाटत नाही आणि ग्रामीण भागातील बहुतेक कुटूंब २५ चौरस किलोमीटरच्या परिसरातच आपले पैसे खर्च करतात हे वास्तव आहे. भारताचा आर्थिक-भूगोल असा आहे की, गावापासून ५ ते २५ किलोमीटरच्या परिघातच फार मोठ्या संख्येने खेडी आहेत.

जनधन खात्यांच्या विस्तारामुळे या खात्यांना, ज्यापैकी अनेक खाती अगोदरच औपचारिक बँकींग यंत्रणेशी जोडलेली असतील, खातेधारकांना लहान उद्योगांशी जोडणाऱ्या अधिक मोठ्या नेटवर्कचा पाया बनवण्याची संधी उपलब्ध झाली आहे. आधारशी संलग्न असलेल्या सूक्ष्म एटीएमने (बीसी आऊटलेट), खरेदी केल्यानंतर रोख रक्कम देण्याऐवजी वस्तूची किंमत देण्यासाठी बायोमेट्रिक्समुळे खात्रीशीर ठरलेल्या रूपे कार्डांचा वापर करण्याची संधी देऊ केली आहे. तरीदेखील त्यासाठी काही पूर्वअटींची पूर्तता करणे आवश्यक असते. महत्त्वाचे म्हणजे, रक्कम तत्क्षणी हस्तांतरित केली जाईल अशी यंत्रणा बँकांनी निर्माण केली पाहिजे - जर तत्काळ देय सेवा (इमिजीएट पेमेंट सर्व्हिस - IMPS) नोंदणी आणि स्थाननिकटता संपर्क (निअर फील्ड कम्युनिकेशन्स - NFC) i@ ime अंतर्भूत असलेली रूपे कार्ड दिलेली असतील तर यात कोणतीही अडचण येणार नाही. रोख व्यवहारांची जागा इलेक्ट्रॉनिक हस्तांतरण घेऊ शकेल अशी सोय समाजाला उपलब्ध करून देण्याची क्षमता अशा कार्यव्यवस्थेत आहे.

तंत्रज्ञानाची प्रगती आणि मोबाईल फोनचा वाढता वापर यामुळे लोकसंख्येमध्ये फार मोठ्या संख्येने अशिक्षित नागरिक असलेल्या भारतासारख्या देशासाठी आशादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. अशीच एक तंत्रज्ञानात्मक प्रगती म्हणजे अमेरिकेने अलिकडेच सॅमसंगला एक विशेष अधिकार दिला आहे. ज्यामुळे, प्रत्यक्ष स्पर्श न करता बोटांच्या ठशाची पडताळणी फोनच्या मेमरीमध्ये जतन केलेल्या बोटांच्या ठशाच्या अधिकृत प्रतिमेशी करता येऊ शकते.

समाजगटांनी बीसी प्रारूप, विशेषत: जेव्हा ते प्रभावीपणे काम करते, फार मोठ्या प्रमाणावर स्वीकारले असल्याचे दिसून येत आहे, फार मोठ्या प्रमाणावर औपचारिक आर्थिक सेवांची मागणी पूर्ण झाली नसल्याचे त्यातून स्पष्ट होते. बँकांची उपस्थिती कमी प्रमाणात असलेल्या भागांमध्ये थोडे बारकाईने बघितले असता अधिक स्पष्टपणे दिसून येणारे तीन लगेचचे फायदे म्हणजे - सोय, व्यवहारासाठी करावा लागणारा कमी खर्च आणि कर्जवसुलीच्या फार मोठ्या प्रमाणातून दिसून येणारे बँक व ग्राहक यांच्यातील सुधारलेले संबंध. बँक व्यवसायाच्या विस्ताराचा थेट परिणाम, ज्याची मोठ्या प्रमाणावर मोजदाद करता येणार नाही, तो हा की, अनौपचारिक सेवा देणाऱ्यांकडून भूतकाळात देण्यात येणाऱ्या विविध सेवांच्या किंमती कमी झाल्या. तेलंगणामधील मेहबूबनगर जिल्ह्यात प्रामुख्याने एटीएम आणि बीसी यांच्या विस्तारामुळे पैसे हस्तांतरित करणारे अनौपचारिक मध्यस्थ आता दिसत नाहीत. याचप्रमाणे, बँका आता रक्कम, बहुत करून तत्काळ, हस्तांतरित करण्यासाठी मध्यवर्ती बँकींग सुविधेत (Core Banking Solutions - CBS) आपली गुंतवणूक करत असल्याने गेल्या चार वर्षांपासून रक्कम पाठवण्यासाठी येणाऱ्या खर्चात एकदम घट झाली आहे. अनेक खेड्यांमध्ये मुदत ठेवी गोळा करण्यासाठी बीसी नेहमीच बँकांना मदत करतात - अन्यथा त्यापैकी बहुतेक ठेवी अधिक जोखीम असलेल्या अनौपचारिक गुंतवणुकीत आणि पिरॅमिड योजनांकडे गेल्या असत्या. या आघाडीवर अधिक मोठे यश मिळाले तर भारतात पहिल्यांदाच औपचारिक क्षेत्राच्या माध्यमातून बचत गोळा करण्यासाठी भागीदाराच्या मदतीने काम करण्याची संधी उपलब्ध होईल आणि आपली बचत गमावण्याचा धोका निर्माण न राहता कुटुंबांना त्यांची बचत वापरता येण्याचे मौल्यवान साधन त्यातून निर्माण करता येईल. सामाजिकदृष्ट्या, त्यामुळे कुटुंबांना आपली बचत बँकींग व्यवस्थेच्या मदतीने शिक्षण, आरोग्य आणि घरबांधणी यासारख्या क्षेत्रांकडे वळवण्याची संधी उपलब्ध होईल. **जनधन आणि त्याच्या पलीकडे**

जनधनला यश मिळेलच याची खात्री नाही. उलटपक्षी, जेव्हा औपचारिक बँकींग व्यवस्थेमुळे खासगी, अनौपचारिक कर्जपुरवठादार संपुष्टात येतील तेव्हाच या योजनेला अंतिम यश मिळाल्याचे म्हणता येईल. प्रधानमंत्री जनधन योजनेचे फायदे त्याच्या संभाव्य लाभार्थींना तातडीने मिळण्यात सध्या अडथळा निर्माण करणारे दोन मोठे मुद्दे म्हणजे संपर्काची ठिकाणे आणि बीसींच्या माध्यमातून उघडण्यात आलेल्या खात्यांद्वारे व्यवहार करण्यावरील बंधने. (अनंत आणि ओनकू २०१४, दधीच २०१४). संपर्क ठिकाणांचा अभाव म्हणजे परिणामी भारतातील निम्म्याहून अधिक खेड्यांमध्ये बँकेची सेवा मिळण्यातील अभाव (तक्ता २). प्रधानमंत्री जनधन योजनेतील खात्यांद्वारे करण्यात येणाऱ्या व्यवहारांवरील बंधने दूर केली तर ती खाती अधिक प्रमाणात वापरण्याचे आकर्षण आणखीन वाढेल. उघडण्यात आलेल्या खात्यांद्वारे व्यवहार करण्यातील मर्यादित लवचिकता आणि बीसीच्या माध्यमातून उघडण्यात आलेल्या खात्यांवरील बंधने ही जनधनचे यश आणि अधिक महत्त्वाचे म्हणजे बँकींग सेवा वापरण्याची प्रवृत्ती अधिक वाढीला लागण्यातील अडथळे आहेत. बहुतेक बँकांमध्ये दैनंदिन व्यवहारांवर मर्यादा आहेत, त्यात फरक आहे. एका खात्यात एका दिवशी १५०० ते १०,००० रूपयांच्या दरम्यान रक्कम जमा करता येते किंवा खात्यातून काढता येते. एकाचवेळी जास्तीत जास्त ५० हजार रूपये रकमेचा व्यवहार करण्याची परवानगी आहे. या मर्यादेपेक्षा जास्त रकमेचा व्यवहार करण्यासाठी बीसीने खातेधारकाला बरोबर घेऊन बँकेच्या शाखेत जाण्याची आणि त्या व्यवहारासाठी मान्यता मिळवण्याची आवश्यकता असते. एका दिवशी १० हजार रूपयांपेक्षा जास्त रकमेचा व्यवहार करण्याची परवानगी नाही. सरकार लाभार्थींना हस्तांतरित करत असलेली त्यांच्या हक्काची रक्कम जमा व्हावी यासाठी किंवा विविध सरकारी मध्यस्थ संस्था, थेट लाभ हस्तांतरणाच्या (DBT) माध्यमातून करत असलेल्या व्यवहारांसाठी किंवा जीवन विम्याच्या हप्त्यासाठी अनेक खातेदारांनी आपला जनधन खात्याचा क्रमांक दिलेला असल्याने बँकेने खात्यांमधील दैनंदिन व्यवहारांवर घातलेली मर्यादा कायमच ओलांडली जाते आणि त्यामुळे अडचणी अधिकच गंभीर झाल्या आहेत.

सिंह (२०१४) यांच्या मते, बँकींग सेवेचा विस्तार करण्यासाठी टपाल कार्यालयांचा जर उपयोग करून

घेतला तर आर्थिक समावेशाचा हेतू साध्य करण्यासाठी मदत होईल. टपाल कार्यालयांमध्ये १३ कोटींपेक्षा जास्त बचत खात्यांसह जवळपास २८ कोटी खाती आणि ११ कोटींपेक्षा जास्त अनुवर्ती बचत खाती आहेत. समाजातील सर्व वर्गांना आर्थिकदृष्ट्या समाविष्ट करून घेण्याच्या उद्देशाने नव्याने विविध पुढाकार घेण्यात आले असले तरी, अशा उपायांना मिळालेले यश मर्यादितच राहिले आहे. अशाचप्रकारे, रेशनचे वितरण करणारी रास्त दर दुकाने हा प्रधानमंत्री जनधन योजनेच्या खात्यांचा संपर्क वाढवण्यासाठी अन्य एक उपयोगी मार्ग असू शकतो, ज्यामुळे डिजीटल कार्यव्यवस्था निर्माण करण्यात सहाय्यकारी होत असतानाच ती खेड्यांमधील सामाजिक-आर्थिक संरचनेमध्ये मोठे बदल देखील घडवून आणतील. एका उदाहरणाद्वारे हे चांगल्याप्रकारे समजेल : आंध्र प्रदेश सरकारने अनेक नवीन उपयोगी कल्पना मांडल्या आहेत (सध्या त्या अमंलबजावणीच्या विविध पातळ्यांवर आहेत) - ''कोठेही रेशन'', ज्यामुळे एखाद्या व्यक्तीला कोणत्याही दुकानातून आपले रेशनच्या वस्तू घेता येतात. अलिकडेच पूर्णत्वास गेलेल्या यशस्वी मार्गदर्शक प्रकल्पात शहरांमध्ये नागरिकांना नागरी पुरवठा विभागाच्या कोणत्याही "रास्त दर दुकाना"तून आपले रेशन घेण्याची परवानगी देण्यात आली होती. नागरी पुरवठा विभागाकडील माहिती आधार कार्डशी जोडण्यात आल्यामुळे विभागाला रेशनच्या वस्तूंच्या प्रवासाचा प्रत्यक्ष वेळेत मागोवा घेता येतो. रेशनच्या सर्व दुकानांना (२७,१७६) विक्रीच्या वेळीच नोंद करणारी (पॉईंट ऑफ सेल) यंत्रे पुरवण्यात आली असून ती मधवर्ती ठिकाणाहून निरीक्षण केल्या जाणाऱ्या २६७ तालुका पातळीवरील साठा केंद्रांना जोडण्यात आली आहेत. आर्थिक सेवांच्या मालिकेसह विविध सेवा पुरवणाऱ्या बहुउद्देशीय दुकानांमध्ये रेशनची दुकाने रूपांतरित केल्याने बँकींग क्षेत्राचा विस्तार व्यापक होण्यात मदत होऊ शकेल.

**निष्कर्ष**

आर्थिक समावेशामुळे अर्थव्यवस्थेत, विशेषत: ग्रामीण अर्थव्यवस्थेत, प्रामुख्याने प्रधानमंत्री जनधन योजना, सोने तारण कर्ज योजना आणि मुद्रा बँक यामुळे आर्थिक साधने उपलब्ध होण्यात क्रांती घडून येण्याची अपेक्षा असून, लक्षणीय बदल होतील अशी अपेक्षा आहे. बँकींग व्यवस्थेच्या माध्यमातून कार्यान्वित होणार असलेल्या थेट लाभ हस्तांतरणामुळे पैशाचा कुटुंबांकडे नियमित ओघ आणि त्यामुळे गुंतवणुकीच्या संधीची देखील निश्चिती होईल. बँका, सूक्ष्म वित्तपुरवठा संस्था, स्वयंसहायता गट, टपाल कार्यालये आणि मुद्रा बँक हे बाजारातील महत्त्वाचे कारभारी असू शकतील. आर्थिक साधनसंपत्तीचा ओघ प्रामुख्याने बँकींग व्यवस्थेद्वारेच नियंत्रित केला जाईल आणि हा निधी व्यवस्थेत टिकून रहावा आणि ठेवला जावा यासाठी आर्थिक साधने ती देऊ करेल अशी आशा करता येईल. याचप्रकारे, विशेषत: ग्रामीण भागातील १ लाख ४० हजार कार्यालयांच्या माध्यमातून टपाल खातेदेखील ही संपत्ती आपल्याकडे वळवण्यासाठी नव्या योजना आणतील अशी अपेक्षा करता येईल. बाजारात पूर्वानुमान करता येईल अशी साधने म्हणजे बँकेतील विविध प्रकारच्या ठेवी, टपाल खात्याच्या माध्यमातून अल्पबचतीची साधने, सुवर्ण रोखे आणि वरती उल्लेख केलेल्या संस्था लागू करतील अशी नवीन साधने.

या घडामोडींमुळे अर्थव्यवस्थेतील रचनात्मक क्षमता बंधनातून मुक्त होईल आणि बाजाराच्यादृष्टीने कल्पनांचे रूपांतर उत्पादित वस्तूंमध्ये करण्यासाठी सुलभ अर्थपुरवठा उपलब्ध होईल अशी अपेक्षा आहे. आर्थिक समावेशामुळे रोजगारात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने आणि अर्थव्यवस्थेतील उत्पादकता वाढल्याने ''उत्पादन भारतात""च्या ("Make in India") उद्दिष्टाला मजबूती मिळेल अशी आशा आहे.

*(लेखक **चरणसिंह** हे बंगळूरू येथील आयआयएममध्ये भारतीय रिझर्व्ह बँकेच्या अर्थशास्त्रविषयक विभागाचे प्रमुख प्राध्यापक, भारतीय रिझर्व्ह बँकेमधील बँकींग संशोधन विभागाचे माजी संचालक आहेत.)*

**संपर्कासाठी ई- मेल**

charanshingh@iimb.ernet.in
charanshingh60@gmail.com

*(लेखक **सी.एल.दधीच** हे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ॲग्रीकल्चरल इकॉनॉमिक्सचे मानद सचिव, भारतीय रिझर्व्ह बँकेमधील ग्रामीण अर्थव्यवस्था विभागाचे माजी संचालक आणि पुण्यातील कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चरल बँकींगमधील माजी शिक्षक आहेत.)*

**संपर्कासाठी ई- मेल**

cldadhich@hotmail.com


*(लेखक **एस. आनथ** हे आयडीआरबीटी मध्ये सहयोगी प्राध्यापक (अनुषंगिक शिक्षक) आणि आंध्र प्रदेशातील विजयवाडास्थित स्वतंत्र संशोधक आहेत.)*

**संपर्कासाठी ई- मेल**

sanath99@gmail.com

# समावेशक वाढीच्या मसुद्यातील "एमएसएमई"चे स्थान :

- डॉ. पी.एम. मॅथ्यू




**प्रत्येक देशातर्फे आर्थिक वृद्धीसाठी अवलंबविण्यात येणारी आर्थिक साधने थोड्याफार फरकाने जरी सारखी असली तरी त्या साधनांची परिणामकारकता आर्थिक विकासाचा वेग निश्चित करण्यास उपयुक्त ठरते. मग यामध्ये सामाजिक, राजकीय, भौगोलिक स्थितीनुसार या आर्थिक साधनांचा समावेश करण्यात येतो. भारतात लघु उद्योग क्षेत्राचा विचार "वाढीला चालना देणारे क्षेत्र" म्हणून करण्यात आले आहे. याद्वारे स्थानिक उत्पादनावर भर, कौशल्य विकास, एमएसएमई द्वारे उत्पादन वाढ, दुर्लक्षित गटांच्या क्षमतांचा विकास यावर विचार करण्यात येत आहे. "समावेश" ही संकल्पना राजकीय घोषणेतुन गंभीर, कृत प्रविण संकल्पनेत रुपांतरीत करण्याचे आव्हान आज धोरण कर्त्यांसमोर आहे. या सदंर्भात लहान व मध्यम उद्योग एक मतदारसंघ म्हणुन महत्त्वाची भूमिका बजावु शकतात.**

**"एमएसएमई" : समावेशकतेच्या कायमस्वरूपी प्रतिनिधी**

जागतिक पातळीवरील "वाढ विरूद्ध वितरण" या चर्चेत 'सर्वसमावेशक वाढी"च्या संकल्पनेची भर पडली आहे. २० व्या शतकाच्या अखेरीला आणि २१ व्या शतकाच्या सुरवातीला, 'वाढ' आणि 'वितरण' यांचा वेगवेगळा विचार करण्यापेक्षा हे दोन दृष्टिकोन एकत्र यावेत अशा मार्गाची गरज असल्याबद्दल, एकमत तयार झाले आहे. त्यामुळे तथाकथित 'सर्वसमावेशक वाढ' या विषयावर चर्चा होत आहे. जागतिक पातळीवरील एकमत आणि वादविवादा वरील विधानांवर सहमत झालेला असताना देशा-देशांमधील व्यवहार वेगळी कहाणी सांगतो. विविध देशांमधील विशिष्ट परिस्थितीनुसार सिद्धांत, प्रत्यक्ष कृती आणि 'सर्वसमावेशक वाढी बाबतची जाण यात तफावत आहे.

भारतातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) यांच्या भूमिकेबाबतच्या संबंधांना गडद अशा राजकीय आणि सामाजिक छटा आहेत. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यापासून त्याची सुरवात होते, जेव्हा, स्थानिक पातळीवरील स्रोत, व्यवसायाच्या संधी आणि बाजारपेठा यांच्यावर आधारित प्रशासनाची स्वयंपूर्ण राजकीय व्यवस्था आणि विकेंद्रीत अर्थव्यवस्था यांची भूमिका सुस्पष्ट होती. अर्थतज्ञ महालानोबीस यांनी विकसित केलेल्या प्रारूपांमध्ये भारतातील लघुउद्योग क्षेत्राचा विचार "वाढीला चालना देणारे क्षेत्र" म्हणून करण्यात आला आहे. प्रत्यक्षात मात्र हे क्षेत्र अर्थव्यवस्थेतील मूलभूत क्षेत्रांसाठी दुय्यम पातळीवरील भूमिका बजावत आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळापासून 'समावेशक वाढी'बाबत जरी विचार करण्यात आला होता तरी या शद्बाची निर्मिती खूप नंतरच्या काळात झाली आहे.

'समावेशक वाढी' बाबत सध्याचे विचार जरी सर्वमान्य असले तरी त्यासमोर शाश्वततेच्या दृष्टीने अनेक आव्हाने आहेत. या आव्हानांना तोंड देण्यासाठी आपले सामाजिक-राजकीय आकलन अतिशय महत्त्वाचे ठरते. अतिशय महत्त्वाचा आणि सर्वसाधारणपणे सर्वांना स्वीकारार्ह असणारा घटक म्हणजे शाश्वतता. भारताच्या वाढीचे आयाम आणि अनुभव यावरील चर्चांचा एक भाग म्हणून शाश्वततेची चर्चा करण्यात येते.

गेल्या अनेक दशकांमध्ये वाढ आणि विस्तार यांनी दराचा विचार न करता भारतीय अर्थव्यवस्थेत अतिशय लक्षणीय स्थान पटकावले आहे. अर्थतज्ञांच्या दृष्टीने वाढ हा जेव्हा मूलभूत चिंतेचा विषय असतो तेव्हा बहुसंख्य लोकांपर्यंत वाढीचा फायदा पोहोचेल याची खातरजमा करणे हे धोरणात्मक आव्हान असते. या संदर्भातून सामाजिक सुरक्षेची आवश्यकता असते. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या

संदर्भात परंपरागतदृष्टीने या अनिवार्य सामाजिक भूमिकेकडे बघितले जाते.

परंपरागतदृष्टीने मानले जात असे की, ही सामाजिक भूमिका स्वाभाविकपणे पार पाडली जाईल. अलिकडच्या काळात मात्र परिस्थितीत जमीन-अस्मानाचा फरक पडला आहे. अर्थव्यवस्थेची रचनाच बदलून गेली असून अशा बदलांमध्ये वेग आणि सुस्ती येत राहण्याची शक्यता आहे. सुस्ती दूर करण्याची शक्यता असते. मुख्य प्रवाहात तिला सामावून कसे घ्यायचे ? हा एक आव्हानात्मक प्रश्न आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या परिघावर लघु आणि मध्यम उद्योग आपली कळीची भूमिका बजावतात.

**समावेशकता : समजुतीमधील भिन्नता**

समावेशकतेवरील चर्चेमध्ये धोरणाला सर्वाधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. भारताच्या "एमएसएमई" च्या विकासाबाबतचे धोरण ढोबळमानाने धोरणांच्या तीन टप्प्यातून गेले आहेत. पहिला, संरक्षण आणि आरक्षणाचे परंपरागत धोरण. त्यानंतरचा टप्पा होता, अधिकारावर आधारित दृष्टिकोनाच्या जवळ जाणारा. आणि तिसरा टप्पा हा भारताने अलिकडेच अवलंबिलेल्या "क्षमतेवर आधारित दृष्टीकोन धोरण" होय. या दृष्टिकोनानुसार असे मानले जाते की, आवश्यक असलेल्या योग्य क्षमता असतील तर आपण आपल्या देशातील "एमएसएमई" क्षेत्राला विकासाच्या धोरणाचा मुख्य प्रवाह बनवू शकतो.

भारत सरकारने अगदी अलिकडेच जाहीर केलेल्या धोरणात त्याकडे अंगुलीनिर्देश करण्यात आले आहे. एका बाजूला, राष्ट्रीय धोरणातील ध्येय साध्य करण्यासाठी महत्त्वाकांक्षी कार्यक्रम आहेत तर दुसऱ्या बाजूला, ओघानेच कौशल्य आणि उद्योजकता विकासावर भर देण्यात आला आहे. आपल्या देशातील लोकांची सृजनशक्ती आणि ऊर्जा यांचा वापर निर्मितीक्षम आणि सामाजिक हिताच्या उपक्रमासाठी होईल याची खातरजमा करण्यात या दोन दृष्टिकोनातील समन्वय सक्षम आहे. अलिकडेच सरकारने या दिशेने पावले उचलली आहेत. मात्र, त्याचा गाभा योग्यरित्या समजून घेण्याची आवश्यकता आहे.

**नव्या धोरणातील आग्रहांचे महत्त्व**

सरकार आणि प्रशासन यांच्यात फरक करणाऱ्या भारतातील नव्या सार्वजनिक धोरणातील दृष्टिकोनाला देशातील धोरणांच्या प्रक्रियांवरील चर्चांच्या विरोधात अतिशय महत्त्व आहे. भारतातील सार्वजनिक धोरणे ठरवतांना अगोदरच लक्षात घेता येण्यासारख्या गरजा, परिणाम किंवा प्रतिक्रिया यांचे पूर्वानुमान करण्यात वारंवार अपयश आल्याचे अभ्यासांमधून दिसून आले आहे, त्यामुळे आर्थिक विकासाला खीळ बसली आहे. बाह्य परिस्थितीत झालेले बदल किंवा नव्या माहितीमुळे आवश्यकता निर्माण होण्याअगोदरच धोरणे मागे घेतली जातात किंवा बदलली जातात. "योग्य" धोरण तयार करणे आणि त्यानंतर त्यावर ठाम राहणे यातील अडचणींमुळे भारताच्या धोरण निश्चितीच्या रचना अतिशय अकार्यक्षम आणि अक्षम असल्याचे दिसून येते. (अगरवाल आणि सोमनाथन, २००५).

अगरवाल आणि सोमनाथन, (२००५) यांच्यानुसार, ''एक चांगली धोरण निश्चितीची प्रक्रिया" खालील निकष पूर्ण करते :-

१) एखाद्या क्षेत्राला भेडसावणाऱ्या समस्या आणि मुद्दे हे तज्ज्ञांच्या विश्लेषणाशी निगडीत असतात;

२) एक क्षेत्र अन्य क्षेत्राने व्यापून टाकणे आणि दुविधा निर्माण होणे याबाबतची माहिती सुव्यवस्थितरित्या जमा केली जाते आणि धोरण निश्चितकर्त्यांना उपलब्ध करून दिली जाते;

३) क्षेत्राच्या अंतर्गत आणि क्षेत्रा-क्षेत्रांमधील विरोधी दृष्टिकोन योग्यप्रकारे सुस्पष्टपणे मांडला जातो, त्याचे विश्लेषण केले जाते आणि त्यावर विचार केला जातो व त्यापासून होऊ शकणारा फायदा किंवा नुकसान लक्षात घेतले जाते आणि त्याच्या परिणामांचे पुर्वानुमान केले जाते;

४) प्रभावित होण्याची शक्यता असलेल्यांशी सल्लामसलत केल्यानंतर, योग्य कायदेशीर प्राधिकरणाच्या सहकार्याने आणि संबंधित क्षेत्रातील किंवा क्षेत्रांमधील तज्ञ व्यक्तिंना सहभागी करून घेऊन निर्णय घेतले जातात;

५) अंमलबजावणीची जबाबदारी असलेल्यांना सुव्यवस्थितपणे प्रक्रियेमध्ये समविष्ट करून घेतले जाते मात्र, त्यांना त्यावर नियंत्रण मिळवू दिले जात नाही;

६) अनेकविध दृष्टिकोन योग्यरितीने विचारात घेण्याची आणि त्यांचा समन्वय साधण्याची व योग्य वेळेत धोरणांचे सर्वोत्कृष्ठ पर्याय उपलब्ध करून देण्याकरता सहकार्य करण्यासाठी धोरणकर्ते किंवा त्यांचे सल्लागार यांच्याकडे प्रामाणिकपणा, स्वातंत्र्य, व्यापक बौद्धिक क्षमता असते.

देशात "एमएसएमई" च्या

विकासासाठी घेण्यात आलेल्या पुढाकाराच्या गेल्या सहा वर्षातील दस्तावेजातून विविध प्रकारचे कार्यक्रम, ध्येयलक्ष्यी कार्यकक्षा, उपक्षेत्रे आणि सामाजिक गट यांची उपस्थिती दिसून येते. असे असले तरी, या कार्यक्रमांचे फायदे प्रत्यक्षात अपेक्षित लाभार्थीपर्यंत अपेक्षित पद्धतीने आणि अपेक्षित वेळेत पोहोचलेच नाहीत अशी एक सर्वसाधारण धारणा आहे. या संदर्भात दोन अनिवार्यता आहेत: एक म्हणजे, कार्यक्रमांचा एकात्मिक दृष्टिकोन असणे गरजेचे आहे. त्याशिवाय, कोणतीही त्रुटी न राहता हे कार्यक्रम प्रत्यक्षात पोहोचतील यावर लक्ष केंद्रीत करण्याची गरज आहे.

आर्थिक सर्वेक्षण आणि यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प यांच्यात सुचविण्यात आल्याप्रमाणे असे काही महत्त्वाचे टप्पे आहेत की ज्यांची सखोल तपासणी करण्याची आणि चिकित्सकपणे आढावा घेण्याची गरज आहे :

**प्रारंभावर लक्ष केंद्रीत करणे**

जगभर आज प्रारंभीच्या काळात प्रोत्साहन देण्याची पद्धत स्वीकारण्यात आलेली असताना भारताने आपल्या लोकसंख्येच्या लक्षणीय वैशिष्ट्याचा विचार करून तरूणांना केवळ रोजगार कमावण्यासाठी तयार न करता या तरूण वर्गाकडे असलेली प्रोत्साहक कौशल्ये वापरात आणण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्याची गरज आहे. केंद्रीय अर्थसंकल्प आणि आर्थिक सर्वेक्षण यामध्ये सुचविण्यात आल्याप्रमाणे, प्रारंभासाठी एकात्मिक दृष्टिकोन समोर ठेवून त्या दिशेने पाऊल उचलले पाहिजे.

**स्थानिक उत्पादनावर भर**

भारताच्या गेल्या दोन दशकांच्या कालखंडात उत्पादन क्षेत्राच्या आघाडीवर झालेल्या वाताहतीने धोरणात्मक दृष्टीने लक्ष वेधून घेतले आहे. राष्ट्रीय उत्पादक स्पर्धात्मकता कार्यक्रम आणि राष्ट्रीय उत्पादकता धोरण हे त्यावरील प्रतिक्रियात्मक आहेत. मात्र, जगाचे उत्पादनक्षेत्र म्हणून देशाचे स्थान निर्माण करण्यासाठी, मैलाचा दगड ठरावा असा अतिशय स्पष्टपणे घेतलेला पुढाकार ही विशेष दखलपात्र घटना आहे.

उत्पादनाबाबतचा देशाचा नवा दृष्टिकोन मे २०१४ मध्ये संरक्षण साधनांच्या बाबतीतील नव्या धोरणातून पहिल्यांदा समोर आला. त्यानंतर पंतप्रधानांनी १५ ऑगस्ट २०१४ या दिवशी स्थानिक उत्पादनाबाबतचे धोरण जाहीर केले. "एमएसएमई"ला केंद्रस्थानी ठेवून भारतातील उत्पादकतेला एकत्र आणणे हा "एमएसएमई" क्षेत्राचे नीतिधैर्य आणि स्वाभिमान उंचावण्यासाठी केलेला स्वतंत्र भारतातील पहिलाच प्रयत्न होता.

**कौशल्य विकसनाबाबतची एक नवीन जाण**

तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणासाठी मोठा पुढाकार घेऊन देखील भारतीय अर्थव्यवस्थेला कुशल मनुष्यबळाच्या कमतरतेची गंभीर समस्या भेडसावत आहे. मात्र, या समस्येची सर्व अंगे एकात्मिक दृष्टीने समजून घेण्यात आलेली नाहीत आणि धोरणात्मक उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. अलिकडच्या काळापर्यंत धोरणात्मक दृष्टिकोन हा केवळ व्यावसायिक शिक्षणासाठीच्या पायाभूत सुविधा मजबूत करण्यापर्यंत आणि त्यात सुधारणा करण्यापुरताच मर्यादित होता.

२०१४ सालच्या केंद्रीय अर्थसंकल्पात पहिल्यांदाच वरती उल्लेख केलेल्या दृष्टिकोनापासून मोठ्या प्रमाणात फारकत घेण्यात आली. या अर्थसंकल्पात कौशल्य विकासाबाबत एकात्मिक दृष्टिकोन आहे. त्यात मूलभूत कौशल्यांच्या पलिकडे जाऊन मूलभूत आणि प्रोत्साहक कौशल्ये यांची एकाचवेळी जोपासना होऊ शकेल अशाप्रकारे एकात्मिक दृष्टिकोनातून उकल करण्यात आली आहे. 'कुशल भारत" हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम जर सुनियोजित पद्धतीने आयोजित केला गेला तर तो देशात नव्या आरंभाच्या शक्तिशाली अशा चळवळीला दीर्घकाळ चालना देणारा ठरू शकेल.

**उत्पादन आणि "एमएसएमई" च्या महात्म्याबाबत एकात्मिक दृष्टिकोन**

यापूर्वीच उल्लेख केल्याप्रमाणे, राष्ट्रीय उत्पादकता स्पर्धात्मकता कार्यक्रम आणि राष्ट्रीय उत्पादकता धोरण यामध्ये देशात उत्पादन करण्यासाठी चालना देण्याचे महत्त्व नि:संशयपणे अधोरेखित करण्यात आले आहे. कार्यक्रमांचे योजनांमध्ये रूपांतर करण्याचा आजपर्यंतचा अनुभव स्तुत्य आहे. अगदी अलिकडे, तीन ध्येयलक्ष्यी क्षेत्रांची करण्यात आलेली निवड आणि त्यांना देण्यात आलेली चालना हे अतिशय विचारपूर्वक केलेल्या प्रयत्नांचे सूचक आहे, ज्यामध्ये संरक्षण उत्पादन; इलेक्ट्रॉनिक्स; वस्त्रोद्योग या उपक्षेत्रांचा समावेश होऊ शकतो.

**सामाजिकदृष्ट्या दुर्लक्षित गटांच्या क्षमतांचा विकास**

"एमएसएमई" च्या परिघात सांस्कृतिक विविधतेची जोपासना करणे हे खरे म्हणजे फार मोठे आव्हानात्मक आणि संधी उपलब्ध करून देणारे काम आहे. भारत हा एक देश म्हणून आणि

विशेषत: ग्रामीण रचनेत, जात आणि भाषा यांची सांगड व्यावसायिक समूह आणि नोकरभरतीची व्यूहरचना यांच्यात प्रतिबींबित होते. भारतात वैविध्यपूर्ण सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेले विविध जातीसमूह सक्षम होत असून शैक्षणिक ध्येय गाठत आहेत, सामाजिकदृष्ट्या दुर्लक्षित गटांना "एमएसएमई" द्वारे मोठ्या प्रमाणात सामावून घेतले जाण्याची शक्यता आहे. मात्र, ही विविधता हाताळण्यासाठी "एमएसएमई" कितपत सक्षम आहेत? हा एकाच वेळी सामाजिक अभिसरणाचा आणि सार्वजनिक धोरणाचा प्रश्न आहे.

समाजाच्या मुख्य प्रवाहातील समाजगटांपेक्षा दुर्लक्षित समाजगटांनी आर्थिक विकासात लक्षणीय भर घातली आहे असे तथाकथित 'सामाजिक दुर्लक्षितता प्रबंधा"त नमूद करण्यात आले आहे. जागतिक पातळीवर दिसून येणाऱ्या या वर्तनशैलीचा भारताच्या विकास धोरणांशी फार मोठा संबंध आहे. भारतात राज्यघटनेने सामाजिकदृष्ट्या दुर्लक्षित गटांना काही विशेष संरक्षण आणि विशेष हक्क दिले आहेत. अल्पसंख्य व्यवहार मंत्रालयाची व्यवस्था मोठ्या प्रमाणावर अशाप्रकारच्या उपक्रमांचा समन्वय साधण्याचे काम करत आली आहे. आर्थिक विकासाच्या कार्यक्रमपत्रिकेत या समाजगटांची आर्थिक क्षमता आणि विशेष सामर्थ्य यांची सांगड कशी काय घालायची? या कळीच्या प्रश्नाचे आजपर्यंत तरी पूर्णपणे उत्तर मिळालेले नाही.

एका बाजूला, समाजातील अल्पसंख्य गटांना मुख्य प्रवाहाशी एकरूप होऊन जाण्यात कायमच अडचणी येतात आणि त्यामुळे ते नेहमीच विशिष्ट आर्थिक कालखंडांशी स्वत:ला जोडण्याचा प्रयत्न करत असतात. दुसरीकडे, अनेक देशांमध्ये अल्पसंख्यक सार्वजनिक कार्यक्रमांद्वारे मुख्य प्रवाहातील आर्थिक क्षेत्राशी योग्यप्रकारे एकरूप झालेले नाहीत. त्याचा परिणाम म्हणून बहुतेक देशांमध्ये वांशिक आणि प्रादेशिक अल्पसंख्यक आपल्या एका विशिष्ट आर्थिक उपक्रमांशीच सहजता अनुभवतात. उदाहरणार्थ, व्हिएतनाम आणि इंडोनेशिया या देशांमधील बटीक हस्तकौशल्य, व्हिएतनाममधील कुंभारकाम, चीनमधील यूगर अल्पसंख्य समाजाकडे असलेले हस्तकौशल्य आणि विणकाम, चीनच्या कझाल अल्पसंख्याकांचे वंशपरंपरागत अन्नपदार्थ हे त्याचे नमुने आहेत. भारताच्या संदर्भात, मुरादाबादमधील पितळ्याची भांडी, नर्झापूरमधील कशिदाकारी, छन्नापट्टणममधील लाकडाची खेळणी बनवण्याचा उद्योग, कर्नाटकमधील उडुपी हॉटेल ही वांशिक ओळख आणि परंपरेची काही उदाहरणे आहेत.

अल्पसंख्यकांच्या विकासासाठी वंशपरंपरागत कलेतील प्रशिक्षण आणि कौशल्य विकास यासाठीचा कार्यक्रम २०१४ च्या केंद्रीय अर्थसंकल्पाद्वारे मांडण्यात आला आहे. 'पारंपरिक कलाकौशल्य, साधनसंपत्ती आणि वस्तूंचा विकास" असे अर्थसंकल्पाच्या माध्यमातून जाहीर करण्यात आलेल्या कार्यक्रमाचे नांव असून संपन्न वारसा असलेल्या पारंपरिक कला आणि हस्तकौशल्य यांची जोपासना व्हावी यासाठी त्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. सांस्कृतिक विविधता आणि अल्पसंख्याकांची लक्षणीय आर्थिक भूमिका यांचा मोठ्या प्रमाणावर योग्य संबंध असूनदेखील या समाजगटांची भूमिका निश्चित करण्यासाठी आणि एकात्मता निर्माण करण्यासाठी देशातील धोरणे ठरवण्यासाठी सहाय्यभूत ठरणाऱ्या सध्या अस्तित्त्वात असलेल्या ज्ञान व्यवस्थेद्वारे आजपर्यंत कोणताही प्रयत्न करण्यात आलेला नाही.

**संबंधित चिंताजनक विभाग**

उपरोक्त उल्लेख केलेल्या सर्व बदलांपश्चात विकासाठी ज्ञानाचा, महत्त्वाचा स्त्रोत म्हणुन उद्योजकता, एकात्मिक पद्धतीने व्यापक प्रमाणावर क्षमता निर्मिती, व्यावसायिक दृष्ट्या सामाजिक जाणिवेचे एकात्मिकरण या चिंताजनक विभागाकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

**१. विकासासाठी ज्ञानाचा उपयोग**

तथाकथित "विकसित अर्थव्यवस्थे "मध्ये अतिशय वेगाने होत असलेले बदल हे नवीन परिमाणे, नवे नियम आणि यशासाठीच्या नव्या प्रेरणा यांच्याशी निगडीत आहेत. जागतिक अर्थव्यवस्थेत गेल्या पंचवीस वर्षात झालेला सर्वाधिक मोठा संरचनात्मक बदल म्हणजे ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेची वाढ. महत्त्वाचा स्त्रोत म्हणून ज्ञानाला मोठेपण मिळाल्याने जुनी अर्थव्यवस्था आणि तथाकथित नवीन अर्थव्यवस्था यांच्यात दरी निर्माण झाली. पोलाद, वाहन उद्योग आणि रस्तेबांधणी यावर आधारित असलेल्या औद्योगिक अर्थव्यवस्थेकडून या देशांचे परिवर्तन सिलीकॉन, कॉम्प्युटर आणि नेटवर्क यांच्या पायावर उभ्या राहिलेल्या 'नव्या अर्थव्यवस्थे"त झाले. आर्थिक संबंधांमध्ये झालेल्या लक्षणीय बदलातून ते दिसून आले. हा बदल पूर्वीच्या काळात कृषी युगाकडून औद्योगिक युगाकडे

झालेल्या प्रवासाइतकाच लक्षणीय होता. भविष्यकाळासाठी स्पर्धा, नवीन उत्पादने किंवा सेवा निर्माण करण्याची क्षमता आणि व्यवसायांचे पूर्णपणे नव्या स्वरूपात रूपांतर करण्याची योग्यता हे सर्वकाही म्हणजे 'नवीन अर्थव्यवस्था". नव्या स्वरूपातील या घटकांची भुतकाळात जेव्हा कल्पनाही करता आली नसती आणि भविष्यात, करता येणार नाही, त्या अर्थव्यवस्था लुप्तदेखील झालेला असू शकतील. जुन्या अर्थव्यवस्थेपेक्षा 'नव्या अर्थव्यवस्थे"चे वेगळेपण सांगणाऱ्या काही महत्त्वाच्या परंतू परस्परांच्या क्षेत्रात अतिक्रमण करणाऱ्या संकल्पना आहेत. मध्ये : १) ज्ञान; २) डिजीटायझेशन; ३) आभासीकरण (Virtualization); ४) मॉलेक्युलरायझेशन; ५) एकात्मिकरण (Integration)/ इंटरनेटच्या आधारे काम; ६) मध्यस्थ दूर करणे (Dis-intermediation); ७) कॉन्व्हर्जन्स; ८) नवीन उपक्रम; ९)व्यावसायिक खप (Prosumption); मध्यस्थाशिवाय थेट संपर्क (Immediacy); १०) जागतिकीकरण; ११) विसंगती; १२) स्वयंरोजगाराची प्रचंड लाट यांचा समावेश आहे.

भारतात "एमएसएमई" च्या विकासविषयक धोरणाचा फार दीर्घकालीन इतिहास असूनदेखील ज्ञाननिर्मितीच्या दिशेने आपले प्रयत्न आणि त्याचा या क्षेत्राच्या संदर्भात प्रसार हा जागतिक मानांकनापेक्षा खूपच खालच्या पातळीवर आहे. उदाहरणार्थ 'एमएसएमई"ना सुरक्षित कार्यक्षेत्र उपलब्ध करून देणारे संख्यात्मक निर्बंध दूर करणे बेफिकीरपणाचे होते. खुल्या बाजारपेठेशी संबंध येऊन देखील या क्षेत्राला त्याचा फायदा झाला नाही. मुक्त आर्थिक धोरणाद्वारे व्यवसायासाठी समान संधी देणारी परिस्थिती निर्माण होण्याची अपेक्षा असताना, परिणाम या क्षेत्राच्या अपेक्षेप्रमाणे नव्हता. उपक्रमशीलता हा शाश्वततेचा मंत्र आहे असा दावा धोरणाच्या पातळीवर केला गेला, त्यासंबंधातील कार्यवाही तुलनेने मर्यादित होती.

ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेत "एमएसएमई" ची शाश्वततेची अपेक्षा स्वतंत्र आधारावर करता येणार नाही. त्यासाठी आंतरक्षेत्रीय दुव्यांचे फायदे मिळणे गरजेचे आहे. मुख्यत्वे आयात केलेल्या तंत्रज्ञानावर अवलंबून असलेल्या विकासाच्या जुन्या संकल्पनेची येथे फारच थोडी भूमिका आहे. 'नवीन अर्थव्यवस्थे"त जागा आणि वेळ यांचे महत्त्व आहे आणि त्यांचा उपयोग स्थानिक ज्ञान व्यवस्थेच्या माध्यमातून चांगल्या प्रकारे करण्याची गरज आहे. विशेषत्वाने "एमएसएमई" क्षेत्राशी संबंधित ज्ञान व्यवस्थेत फार मोठ्या प्रमाणावर सुधारणांची गरज आहे. अशा या ज्ञान व्यवस्थेचे एकात्मिकरण करण्याची आणि "एमएसएमई"साठी लागू होत असलेली संपूर्ण मूल्यसाखळी तिच्याशी संपर्कात येण्याची व तिचे पोषण होण्याची गरज आहे. एक व्यूहरचनात्मक दृष्टिकोन म्हणून 'उत्पादन करा भारतात"मुळे ('Make in India') या अयशस्वी ठरलेल्या मार्गापासून फारकत घेण्यात आल्याचे स्पष्ट झाले. अर्थात, "एमएसएमई" वर होणाऱ्या त्याच्या परिणामांवर चर्चा होऊ शकते.

**२. उद्योजकता - एक निर्णायक साधनसंपत्ती**

भारतात परंपरागत असा समज आहे की, व्यावसायिक पार्श्वभूमी असलेल्या समाजगटांमध्येच उद्योजकतेचा उदय होतो. या विचारसरणीत १९७० च्या दशकाच्या प्रारंभी आमुलाग्र बदल घडून आला आणि बांधेसूद उद्योजकता विकास कार्यक्रमांच्या माध्यमातून संरक्षण देणारी उद्योजकता विकास धोरणांचा त्याग करण्यात आला. त्यामुळे संस्था आणि कार्यक्रमांद्वारे उद्योजकता विकासाला मुख्यप्रवाहात स्थान मिळाले असले तरी त्याचे परिणाम अजूनही योग्यप्रकारे मोजण्यात आलेले नाहीत आणि ते मोजण्यासाठीची मोजपट्टी योग्य पद्धतीने विकसित करण्याची गरज आहे. उद्योजकता विकासासाठी घेण्यात आलेल्या पुढाकारात; कार्यक्रमाची आदर्श रचना; व कार्यक्रमांचे क्रियान्वयन या दोन निर्णायक घटकांचा समावेश आहे. मूल्यमापनाच्या अनेक अभ्यासांमध्ये या दोन्ही घटकांमध्ये कमतरता असल्याचे सूचित करण्यात आले आहे.

देशाची विशालता आणि त्याच्या लोकसंख्येत मोठ्या प्रमाणावर असलेला युवकवर्ग लक्षात घेता उद्योजकता विकासासाठी समज, मोजणी आणि नियोजन योग्य दृष्ट्या विकसित करण्याची गरज आहे. या संदर्भात साधनसंपत्तीचा दृष्टिकोन प्रसंगोचित ठरतो. उद्योजकता ही एक निर्णायक साधनसंपत्ती असून तिची जपणूक आणि पोषण करण्याची गरज आहे. ही अनिवार्यता लक्षात घेता धोरणे आणि व्यूहरचना यांचा इतिहास बारकाईने तपासून बघण्याची गरज आहे.

**३. एकात्मिक क्षमतानिर्मिती**

क्षमतानिर्मिती या शब्दातच एकात्मतेची, अखंडत्वाची संकल्पना अंतर्भूत आहे. कोणत्याही अर्थव्यवस्थेत विद्यमान असलेली रोजगाराच्या बाजारपेठेची स्थितीच ठरवते की,

कोणत्या प्रकारच्या क्षमतेची निर्मिती करण्याची गरज आहे. असे असले तरी क्षमतानिर्मितीचे मार्ग वेगवेगळे असू शकतात.

देशाला सध्या रोजगाराच्या बाजारपेठेत असलेल्या विलक्षण विरोधाभासाला तोंड द्यावे लागत आहे. ही परिस्थिती आपल्याला भारतातील तरूण लोकसंख्येला युद्धपातळीवर कौशल्य प्रशिक्षण देण्याच्या अनिवार्यता लक्षात आणून देते, ज्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेतील निर्मितीक्षम क्षेत्रात त्यांना सामावून घेण्याचे प्रमाण वाढू शकेल. पंतप्रधानांनी गेल्या वर्षीच्या स्वातंत्र्यदिनी केलेल्या आपल्या भाषणात हा भक्कम मुद्दा मांडला होता. देशातील रोजगाराच्या बाजारपेठेबाबतच्या धोरणाची चौकट स्पष्ट करणारी 'कुशल भारत' नावाची महत्त्वाकांक्षी योजना त्यांनी जाहीर केली होती. असे असले तरी अशा धोरणांचा तपशील निश्चित करण्याची गरज होती. 'कुशल भारत" धोरणाला नव्याने प्रेरणा देण्यासाठी आणि आगामी काही दशकांमधील आपल्या वाढत्या मनुष्यबळाला रोजगार मिळवून देईल असे कौशल्य देण्यासाठी नोव्हेंबर २०१४ मध्ये कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाची स्थापना करण्यात आली.

भारताने आपल्या अर्थव्यवस्थेचे ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेत रूपांतर केल्यामुळे आपल्या लोकसंख्येला, विशेष करून तरूणांना, प्रेरणा, प्रोत्साहन देण्याची आणि केवळ मोठ्या प्रमाणावर नाही तर दर्जेदार कौशल्य देण्याची देखील गरज आहे. त्यासाठी संस्था, कार्यक्रम आणि मानांकन यांच्याशी संबंधित बारीक-सारीक तपशीलात जाऊन खूप मोठ्या प्रमाणावर काम करण्याची आवश्यकता आहे. अशा व्यूहरचनात्मक दृष्टिकोनात भारताच्या रोजगार बाजारपेठेच्या मसुद्यासाठी प्रत्यक्ष कृति आणि अनुभव यावर आधारित असलेला नियम म्हणून उपयोगी पडणारे राष्ट्रीय धोरण गृहित धरलेले असते.

कौशल्य विकासाचा वेगळेपणाने विचार करून चालत नाही. कौशल्य ही जरी मूलभूत असली तरी ती सन्मानजनक रोजगार मिळवण्यासाठी किंवा चांगला उद्योजक होण्यासाठी पुरेशी नसतात. कौशल्य विकास हा फार मोठा भाग असलेल्या रोजगार बाजारपेठेतील हस्तक्षेप हे मागणीवर आधारित असण्याची गरज आहे; रोजगार आणि आर्थिक वाढीच्या व्यूहरचना यांचा ते अविभाज्य भाग असण्याची गरज आहे. राष्ट्रीय व्यापक-आर्थिक धोरणे आणि व्यूहरचना यांच्याबरोबरचा समन्वय हा म्हणूनच अनिवार्य ठरतो. त्यामुळे कौशल्य आणि उद्योजकता विकास यासाठीचे पुढाकार हे १) मोबदला देणारा रोजगार; २) स्वयंरोजगार; आणि ३) कामगारांची निर्यात यांचा समावेश असलेल्या वाढीव उत्पन्नाच्या संधींच्या गरजेसाठी घेतले गेले पाहिजेत. मोबदला देणारा रोजगार उपजीविकेसाठीच्या मिळकतीची खात्री देतो. स्वयंरोजगार स्वत:च्या उपजीविकेची गरज पूर्ण करण्याबरोबरच उत्पन्न आणि रोजगाराचे प्रमाण वाढवण्यास चालना देतो. कामगारांच्या निर्यातीमुळे देशाला परकीय चलन मिळवून देणाऱ्या साधनांमध्ये भर पडते. एकात्मिक रोजगार बाजारपेठ धोरणात या तीनही बाबींची शास्त्रशुद्ध पद्धतीने काळजी घ्यावी लागेल. हे तीनही विविध दृष्टिकोन संरचनात्मकदृष्ट्या परस्परांशी संबंधित असले तरी त्यांची जबाबदारी भारत सरकारच्या विविध मंत्रालयांकडे आणि विभागांकडे असल्याने त्यांच्या कामकाजात सुसूत्रता असण्याची गरज आहे.

देशात २००५ ते २०१२ या सात वर्षांच्या काळात केवळ २७ लाख अतिरिक्त थेट रोजगार निर्माण झाल्याचा अंदाज आहे. यातून असे दिसून येते की, देशात मोबदला देणाऱ्या रोजगारांची संख्या मागणीच्या तुलनेत खूपच कमी आहे. त्यामुळे हाताला काम मागणाऱ्यांपैकी किमान काही जणांना योग्य प्रोत्साहन दिले आणि मार्गदर्शन केले तर त्यांना उद्योजकतेकडे वळवता येईल. यातूनच उद्योजकता आणि विश्वासू सल्लागार होण्यासाठीच्या प्रशिक्षणाचा समावेश असलेल्या सुयोग्य व्यवसाय विकास सेवांची तरतूद करण्याची आवश्यकता निर्माण होते. कौशल्य विकासाची अनिवार्यता लक्षात घेऊन २००९ मध्ये राष्ट्रीय कौशल्य विकास धोरण आखण्यात आले. कौशल्य आणि उद्योजकता विकासविषयक राष्ट्रीय धोरण २०१५ ने २००९ मधील धोरण मागे सारले. या धोरणाचा उद्देश गती, दर्जा आणि शाश्वतता यांच्या आधारे व्यापक प्रमाणावर रोजगार बाजारपेठेत हस्तक्षेपांसाठी कार्यपद्धती तयार करणे हा आहे. देशातील कौशल्य विकसनाच्या सर्व उपक्रमांसाठी एक व्यापक कार्यपद्धती उपलब्ध करून देणे, त्यांचे प्रमाणीकरण करणे आणि हे उपक्रम बाजाराची गरज लक्षात घेणारे असतील याची निश्चिती करणे हे त्याचे ध्येय आहे. ध्येय निश्चिती आणि अपेक्षित उद्दीष्ट निश्चित करण्याशिवाय हे धोरण अपेक्षित उद्दीष्ट गाठण्यासाठीचे साधन बनेल

यासाठी संस्थात्मक कार्यपद्धतीदेखील निश्चित करेल. कौशल्य विकास ही सरकार, रोजगार पुरवणारे आणि व्यक्तीश: प्रत्येक कामगार यांच्याबरोबरच अनेकविध संबंधित घटकांची सामुहिक जबाबदारी आहे, त्यात स्वयंसेवी संस्था, समाजगटांवर आधारित संघटना, खासगी प्रशिक्षण संस्था आणि इतर संबंधित घटक कळीची भूमिका बजावतात.

पंतप्रधानांचे 'कुशल भारता'चे स्वप्न अर्थपूर्ण रोजगार बाजारपेठ धोरणाच्या कार्यकक्षेत, जिथे देशाच्या आणि प्रदेशाच्या पातळीवर प्रत्येक मंत्रालय, विभाग यांना विशिष्ट भूमिका बजावावी लागेल, पुढे नेण्याची गरज आहे. या भूमिका त्यांच्या विशिष्ट तज्ञतेशी निगडित असाव्यात यासाठी निश्चित करण्याची गरज आहे, त्यामुळे परिश्रमांची अनावश्यक पुनरावृत्ती होण्याची शक्यता किमान राहील.

**४. सामाजिक उपक्रम**

'परिणामकारक गुंतवणूक" आणि 'सामाजिक उपक्रम" या आजच्या जबाबदार व्यवसायाच्या शब्द शस्त्रावलीतील दोन महत्त्वपूर्ण संकल्पना आहेत. भारतीय संदर्भात मात्र या संकल्पना अद्याप अस्तित्वात आलेल्या नाहीत.

भारताला भौगोलिक विस्तार प्रचंड असल्याने अनेक सामाजिक समस्यांना तोंड द्यावे लागते. या सामाजिक समस्या मूळातच सध्या उपलब्ध असलेली साधनसंपत्ती आणि संधी यांच्या माध्यमातून सोडवण्याची गरज आहे. प्रत्येक सामाजिक समस्या किंवा सामाजिक गरज यामध्ये एक संधी दडलेली असते. या संधींचा फायदा करून घेण्यासंबंधातील क्षमता हीच शाश्वत उपक्रम विकासाच्या मसुद्याच्या केंद्रस्थानी आहे. "उपक्रमशीलता" हे मूलभूत मानवी गुणवैशिष्ट्य असून एका विशिष्ट संदर्भात त्याची जोपासना करण्याची आवश्यकता आहे. सामाजिक समस्येच्या बाबतीत अंतर्भूत असलेली संधी शोधावी लागते आणि अर्थपूर्ण उपाययोजनेसाठी तिचा उपयोग करून घ्यावा लागतो. या संदर्भातून सामाजिक उपक्रमांचे औचित्य उपस्थित होते.

सामाजिक उपक्रमांची व्याख्या अशी केली जाते - व्यवसायाप्रमाणे चालणारे, बाजारपेठेसाठी वस्तू आणि सेवांची निर्मिती करणारे परंतू आपला कारभार सांभाळणारे आणि त्यातील अतिरिक्त उत्पादन सामाजिक आणि पर्यावरणविषयक ध्येयाचा पाठलाग करणारे उपक्रम. आवश्यक तितके उत्पन्न मिळवणारे हे व्यवसाय असतात. नफा न कमावणाऱ्या संघटना किंवा नफा कमावण्यासाठी कंपन्या ते चालवत असले तरी सामाजिक उपक्रमांची दोन ध्येय असतात : (१) सामाजिक, सांस्कृतिक, समाजगटांचे आर्थिक किंवा पर्यावरणीय उद्देश साधणे; आणि (२) उत्पन्न मिळविणे. ही दोन ध्येय असतात. सकृतदर्शनी अनेक सामाजिक उपक्रम पारंपरिक व्यवसायांसारखे दिसतात, वाटतात आणि कारभारदेखील करतात. परंतू अधिक खोलात जाऊन बघता सामाजिक उपक्रमाची ओळख करून देणारी गुणवैशिष्ट्ये दिसून येतात : व्यवसायाच्या केंद्रस्थानी ध्येय असते आणि उत्पन्न मिळवणे ही महत्त्वाची सहाय्यकारी भूमिका असते.

खासगी क्षेत्र आणि सार्वजनिक क्षेत्र यांच्यामध्ये असलेल्या अखंड रचनेच्या आधारे उपक्रम आणि संघटनांचे मूल्यांकन करणाऱ्या सामाजिक उपक्रमांच्या आवाक्यातून संघटनांचा विचार केला जाऊ शकतो. "सामाजिक उद्देश" सर्वोच्च स्थानी ते "व्यावसायिक हेतू" तळाशी अशाप्रकारे प्राथमिक उद्दीष्टाच्या आधारे, 'य" अक्षावर (vertical axis) उपक्रम किंवा संघटना यांची श्रेणी पाडली जाते.

सामाजिक जबाबदारीच्या भूमिकेतून (सामाजिक, आर्थिक किंवा पर्यावरणीय) विविध मुद्यांवर उपाययोजना करण्याच्या गरजेतून आणि खासगी किंवा सार्वजनिक क्षेत्राकडून दुर्लक्षित करण्यात आलेल्या (किंवा अर्धवट पूर्ण केलेल्या) गरजा पूर्ण करण्यासाठी एक 'सामाजिक अर्थव्यवस्था" विकसित होते. नफा कमावण्यासाठी कारभार करत नसल्याचे ध्येय गाठण्यासाठी उपाय योजून एक सशक्त, शाश्वत, भरभराट होणारा आणि समावेशक समाज घडवण्याच्या कामात सामाजिक अर्थव्यवस्थेची एक विशिष्ट भूमिका आहे. राजकारण आणि अर्थकारण सांधे बदलत असल्याने सामाजिक-आर्थिक क्षेत्राच्या मर्यादांची व्याख्या करणे कठीण आहे; सामाजिक अर्थव्यवस्थेच्या उपक्षेत्रांमधून कार्यरत होत असताना संघटना कोणत्याही क्षणी ''काहीशा आत, काहीशा बाहेर"" असू शकतात.

यशस्वी सामाजिक उपक्रम सरकारी ध्येय-धोरणे पूर्ण करण्यासाठी भूमिका बजावतात :

- उत्पादकता आणि स्पर्धात्मकता वाढवून;
- सामाजिकदृष्ट्या समावेशक अशा संपत्ती निर्मितीमध्ये भर घालून;
- स्थानिक परिसरात नवचैतन्य निर्माण करण्यासाठी व्यक्ती आणि समाजगटांना ताकद देणे;
- सार्वजनिक सेवा उपलब्ध व्हाव्यात

यासाठी नवीन मार्ग दाखवणे;

➢ समावेशक समाज आणि कार्यक्षम नागरिकत्व विकसित करणे.

देशाची विशालता लक्षात घेता भारताने अनेक आदर्श सामाजिक उपक्रम तयार केले आहेत. पूर्णपणे सरकारी ते खासगी आराखड्याप्रमाणे तयार केलेल्या आदर्श नमुन्यांचा त्यात समावेश आहे. या क्षेत्रात जरी अनेक नामवंत असले तरी राष्ट्रीय पातळीवरील सामाजिक उपक्रम धोरणाचा देशात अभाव आहे.

गेल्या दोन दशकांमध्ये भारताच्या एकूण देशांतर्गत उत्पादनात लक्षणीय वाढ होऊन देखील देशातील शंभर कोटी वीस लाख लोकसंख्येतील एकतृतीयांश जनता अजूनही दारिद्रयरेषेखाली आहे. याशिवाय, पाच वर्षांपेक्षा कमी वय असलेली चाळीस टक्क्यांपेक्षा अधिक मुले कुपोषित आहेत, तर जागतिक आरोग्य संघटनेच्या म्हणण्यानुसार, ६२० दशलक्ष लोकांना उघड्यावर जावे लागते. त्यामुळे, सामाजिकदृष्ट्या ध्येय निश्चित असलेली गुंतवणूक किंवा 'परिणामकारक गुंतवणूक' यांच्या माध्यमातून या समस्यांना तोंड देण्याचे मोठे आव्हान आहे.

देशाच्या समावेशक विकासाच्या कार्यक्रमात सामाजिक उपक्रम महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. इतर अनेक देशांप्रमाणे एक क्षेत्र म्हणून भारतात त्यांना अधिकृत किंवा कायदेशीर ओळख नसली तरीदेखील गरीबीच्या विरोधातील लढ्यात ते महत्त्वाचा वाटा उचलत आहेत.

सामजिक उपक्रम म्हणजे काय याची मांडणी करणे हे जरी आव्हानात्मक असले तरी एकदा त्याची ओळख निश्चित झाली की, कल्पनेपासून ते नवीन उपक्रमांपर्यंत पोहोचण्यासाठी अशा व्यवसायांना मदतीच्या ठरतील अशा सशक्त धोरणांसाठीचा मार्ग सोपा होऊ शकेल. त्यामध्ये गुंतवणूक, कर्जे आणि उपक्रम सुरू करण्यासाठी अनुदान तसेच करांमध्ये सवलती, जमीन, ऊर्जा, पाणी यासाठी अनुदान यांचा समावेश असू शकेल. सध्या बहुतेक सामाजिक उपक्रम सुरू करण्यासाठीचा अर्थपुरवठा परकीय गुंतवणुकदारांकडून होतो. असे असले तरी भारतात पुरेसे भांडवल आहे, विशेषत: सरकार आणि मोठ्या औद्योगिक संस्थांकडे, महत्त्वाचे गुंतवणुकदार म्हणून भूमिका वठवण्यासाठी, भारतात पुरेसे भांडवल आहे.

**निष्कर्ष**

*'समावेश" ही संकल्पना राजकीय घोषणेतून गंभीर, कृतिप्रवण संकल्पनेत रूपांतरित करण्याचे आव्हान आज धोरण तयार करणाऱ्यांसमोर आहे. या संदर्भात लहान आणि मध्यम उद्योग एक मतदारसंघ म्हणून महत्त्वाची भूमिका बजावू शकतात.*

*(लेखक **पी. एम. मॅथ्यू** हे लघुउद्योग आणि विकास संस्थेचे संचालक आहेत.)*

**संपर्कासाठी ई- मेल**

irector@isedonline.org

## आगामी अंक

**सप्टेंबर २०१५**

**'स्मार्ट शहरे -शहरी विकासाचे बदलते चित्र'.**

## सूचना

सर्व योजनाच्या सभासदांना विनंती आहे की, त्यांनी प्रत्येक योजना संबंधीत अभिप्राय योजना कार्यालय:- 'बी' विंग, केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर - ४००६१४ या पत्त्यावर पाठवावे. आपल्या सूचनांद्वारे आवश्यक बदल करता येतील.

## प्रकाशन विभागाची नवी पुस्तके

१. **व्हर्ल्ड ऑफ थिन फिल्म कोटिंग्स (इंग्रजी)** ₹ ९०/-

२. **तिलक का मुकदमा (हिंदी)** ₹ ३३५/-

३. **राजभाषा (हिंदी)** ₹ १००/-

१. **एक देश एक हृदय (हिंदी)**

२. **उपभोक्ता संरक्षण (हिंदी)**

३. **पऱ्यावरण संरक्षण : चुनौतिया और समाधान**

# REACTIONS OF SOME SUCCESSFUL STUDENTS IN UPSC

**Vivekanad Jadhwar**
(AIR 799 / 2014)
"During my initial journey of civil services Preparation the book by Ranjan Kolambe sir Was the base. Sir has very good skill to make things simple. It helped me a lot in UPSC preparation. Thank you sir."

**Rajesh Gavali**
(AIR 1118 / 2014)
"Ranjan sir harbours a Mircro University in himself: teaching of many subjects in simple yet organised manners."

**Harshit D. Bari (IRS)**
" Known as 'one man army ', Ranjan Sir is the best bet."

**Adinath Dagde**
(AIR 1000 / 2014)



**Vijay Kulange**
(AIR 176 / 2013)
" Importance and relevance of Ranjan Kolambe Sir to Civil Services coaching is beyond doubt, his very name instills confidence."



**Dr. Satish Shitole (IRS)**
**(AIR 514 / 2013)**
" Bhagirath Symbolizes hard work, It's manifestation in this sector is Ranjan Kolambe Sir, and it's reflection is unmistakably found in his vast student community".

***Our Publications by :*** **Ranjan Kolambe Sir**




Coming Soon

आधुनिक भारताचा इतिहास

## MPSC RESULT 2014-15

**40 + Students Class - I**

**109 + Student Class- II**

## UPSC | MPSC

**Mains + Prelim** | **पूर्व + मुख्य परिक्षा**

FOUNDATION BATCH 2015-16
BATCHES STARTS FROM 1 JULY 2015

**By : Ranjan Kolambe & Bhagirath Team**



**अभयसिंह मोहिते**
(Dy. Collector) **राज्यात प्रथम**
माझ्या यशामध्ये रंजन कोळंबे सर आणि सरांच्या पुस्तकांचा मोलाचा वाटा आहे. सरांच्या मॉक इंटरव्हुचा मला खूप फायदा झाला.



**समाधान शेंडगे**
(Dy. Collector) **राज्यात द्वितीय**
सरांच्या पुस्तकांचा मला UPSC व MPSC दोन्ही परीक्षांसाठी खुप फायदा झाला आहे. आणि मी सलग दोन वर्षे सरांकडे मॉक इंटरव्हूव दिला, सरांनी विचारलेले प्रश्नच मला आयोगांच्या पॅनलमध्ये विचारण्यात आले.



**प्रशांत खेडेकर**
(Dy. Collector) **राज्यात तृतीय**
MPSC चा अभ्यास सुरु करतांना सर्वात पहिले पुस्तक वाचलं ते रंजन कोळंबे सरांचे 'भारतीय अर्थव्यवस्था' माझ्या यशामध्ये सरांच्या सर्व पुस्तकांचा सिंहाचा वाटा आहे.



**वनश्री लाभशेटवार**
(Dy. Collector) **मुलींमध्ये प्रथम**
रंजन कोळंबे सरांच्या इंटरव्हूचा मला खुप फायदा झाला. माझ्यातल्या Positive Quality आणि अजून काय करण्याची गरज आहे, याचे खुप चांगले मार्गदर्शन केले आणि इंटरव्हुच्या लेक्चरमध्ये पण मुलांनी कुठल्या विषयाचा अभ्यास करावा यापासुन कुठला पोषाख घालून इंटरव्हुला जावे इंथपर्यंत सरांनी मुलांना मार्गदर्शन केले रंजन सरांसारखे मार्गदर्शन कुणी करु शकत नाही.



**स्नेहल कनिचे**
(Dy. Collector)
रंजन कोळंबे सर म्हणजे प्रत्यक्ष ज्ञानमुर्ती, मार्गदर्शनाबरोबर जिद्द, चिकाटी ! जे येथील भगीरथी ते नक्कीच होतील अधिकारी ! भगीरथ प्रयत्न व रंजन सरांचे मार्गदर्शन यामुळे अशक्य स्वप्न सहज सोपे झाले.

'विद्यादाना' च्या पवित्र कार्याचे संपूर्ण 'व्यापारीकरण' कधी झाले कळलेच नाही ! 'जाहिरात म्हणजे कायद्याच्या चौकटीत राहुन केलेली थापेबाजी होय' हे H.G.Wells या ब्रिटिश विचारवंताचे वक्तव्य अक्षरश: खरे करण्याची चढाओढ सुरू झाली. ''आमचे १०० विद्यार्थी पास झाले'' असे जर चार संस्था म्हणत असतील तर त्यातील ९० विद्यार्थी कॉमन असतात. कारण सर्वश्रृत आहे. पुण्यात-महाराष्ट्रात स्पर्धा परीक्षार्थींच्या यशासाठी मनापासून झटणाऱ्या बऱ्याच संस्था आहेत. 'भगीरथ ॲकॅडमी' ही त्यातील एक! वर्षातून केवळ दोन बॅचेस! "Teaching Quality + Quantity + मर्यादीत फी' या त्रिसुत्रीने 'अद्वितीय' ठरलेली! त्यामुळे 'भगीरथ ॲकॅडमी' च्या योग्यतेची पूर्ण खात्री असल्याशिवाय प्रवेश घेऊ नका. अधिक माहितीसाठी प्रत्यक्ष भेट द्या किंवा जाणकारांकडून माहिती मिळवा. खरे यश विद्यार्थ्यांचेच, त्यांच्या कष्टाचे व इच्छाशक्तीचे ! खऱ्या खुऱ्या 'भगीरथा' प्रमाणे! आमचा वाटा केवळ खारीचा !!!!

... रंजन कोळंबे

**Bhagirath IAS Academy**
UPSC • MPSC

मंत्री हाईट्स, २ रा मजला, शनिवार पेठ, पुणे -३०.
फोन नं. : ०२०-६४०१३४५० ९९७०२९८१९७

www.bhagirathacademy.com
bhagirathacademypune@gmail.com
Bhagirath IAS Academy

# भारतातील विविध क्रांत्यांमधिल आंतरराष्ट्रीय सहभाग आणि सामाजिक बदल

- भावना गोखले




**विकसीत देशांनी अवलंबिलेल्या विविध क्रांत्यांचा परिणाम आणि छाप भारतावरही पडली. भारताने हरितक्रांतीची सुरूवात करून खाद्यान्न उत्पन्नात कमालिची प्रगती केली 'धवल क्रांतीचा' जनक म्हणून म्हणून भारताला ओळखण्यात येते तर नील क्रांती, रेड, ब्लॅकरिव्हॉल्यूशन मध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर बदल घडवून आले. पंतप्रधान नरेद्रं मोदी सत्तेत आल्यानंतर त्यांनी "मेक इन इंडीया" ही संकल्पना या विविध क्रांत्याच्या आधारावर मांडली असुन नवीन चतुरंग क्रांतीची ओळख आणि सुरूवात केली आहे. या चतुरंग क्रांतीमुळे दुर्लक्षित होत असलेला परंतु भारतीय अर्थव्यवस्थेचा पारंपरिक कणा असलेल्या कृषी क्षेत्राचा कायापालट नवीन तंत्रज्ञानामुळे होईल, होत आहे हे नक्की.**

क्रांती म्हणजे हातात शस्त्र धरुन युद्ध करणे नव्हे तर, क्रांती या शब्दाचा अर्थ एका विशिष्ठ स्तरातुन, अति विकसीत तंत्रज्ञानाच्या साह्याने नवीन युगाला सुरुवात करणे. यामध्ये सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि आर्थिक बदल हा व्यापक स्तरावर घडविणे अभिप्रेत असते. जेव्हा या सर्व घटकांद्वारे एका विशिष्ट क्षेत्राचा विकास घडविण्याचे ठरविण्यात येते तेव्हा तो त्या क्षेत्राचा पुर्नरुत्यांनाचा काळ असतो. इतर देशांच्या तुलनेत भारताचा विचार केला तर, आणि ऐतिहासिक वर्षांचा जरी दाखला दिला तरी भारताने कधिही आपल्या आर्थिक विकासाच्या नाड्या दुसऱ्या देशांकडे सोपविल्या नाहीत. थोडक्यात आर्थिक परावलंबित्व पत्करले नाही. भलेही आर्थिक विकासाची गती आंतरराष्ट्रीय पातळ्यावरील निर्णय, नैसर्गिक आपत्ती इत्यांदीमुळे मंदावली असेल आणि म्हणुनच प्रत्येक समस्येचे समाधान देशांतर्गत मिळविण्यासाठी संशोधन, अभ्यासाची सवय भारताला स्वावलंबन टिकविण्यास पुरक ठरली. परराष्ट्रीय धोरण आणि राजनैतिक कौशल्य याचे वर्णन आंतरराष्ट्रीय संबंधाच्या प्रक्रियेचे चलन करणारी चाके असल्याचे केले गेले आहे. कोणतेही राष्ट्र त्यापासुन वेगळे राहु शकत नाही. राज्यांमधील तसेच विविध राष्ट्रांमधील व्यापार सांस्कृतिक आणि राजकीय संबंध हे सर्वाधिक न टाळता येण्याजोगे सबंध आहेत त्याचमुळे प्रत्येक राज्याने, देशाने स्वहित जपण्यासाठी आपल्या शेजारील राज्याशी, देशाशी संबंध राखण्याबाबत परस्पर निती निश्चित करणे आवश्यक आहे. एका राज्याने अवलंबविलेल्या विकास मॉडेल चा अभ्यास, उपयोग दुसरे राज्य करु शकते. जशी 'सेल्फ हेल्प ग्रुप'ची संकल्पना ग्रामिण महिला, युवकांना संघटीत करणे, आर्थिक स्वावलंबन आणि रोजगार वाढविण्यावर होती आणि भारतातील अनेक राज्यांमध्ये यशस्वी झाली. तसेच विकासाच्या अन्य रोड मॅप ची आवश्यकता आहे. भारतात घडून आलेल्या विविध क्रांत्यामधुन सामाजिक, आर्थिक विकासाची एक तरी दिशा मिळाली आहे.

१. चार्ल्सटुलीच्या मते, अशी क्रांती जी देशाच्या आर्थिक सामाजिक आणि राजकिय जडण घडविण्यात व्यापक, प्रकर्षाने आणि त्वरीत बदल घडविते. क्रांती ही केवळ राजकीय तत्वाने प्रेरित असते असे नाहीतर समाज, संस्कृती, तत्वज्ञान आणि तंत्रज्ञान यामध्ये कमालिचा बदल घडवून आणते. जागतिक, औद्योगिक, व्यवसायीक क्रांती ही या बदलांची वैशिष्ठ्यपुर्ण उदाहरणे आहेत.

२. ॲरिसस्टॉटल च्या मते राजकीय क्रांतीत दोन प्रकारंची स्थित्यांतरे आढळतात एक म्हणजे एका राज्यघटनेतुन दुसऱ्या राज्यघटनेचा सर्वस्वी अंगीकार करणे तसेच संघस्थितील राज्यघटनेत आधुनीक बदल घडविणे.

१९७१ मध्ये भारताला गरिबी, उपासमार आणि भूक या तीव्र प्रश्नांना सामोरे जावे लागले. २००७ पर्यंत भारताचे प्राथमिक दरडोई आहाराचे प्रमाण अवघे ९ किलो होते, जे की अमेरिकेच्या १५, युरोपचे १२, जपानचे १२ पेक्षा जास्त आणि चीनच्या ९ केजेपेक्षा जास्त यापेक्षा कमी होते. या सर्व निरीक्षणानंतर भारताने कृषी उत्पादन वाढीवर लक्ष केंद्रीत करून स्वालंबन निती अंगीकारण्याचे ठरविले तेव्हाचं अमेरिकन कृषी शास्त्रज्ञ नॉर्मन बोरलॉग यांनी भारताला कृषी उत्पादन वाढीचा एक नवा विकसीत मार्ग दाखविला ज्याने भारत आणि पाकिस्तानचे गहु उत्पादन तिपट्टीने वाढले भारताचे सद्याचे आयातीचे प्रमाण कृषी क्रांतीनंतर घटले. आज भारत विकसनशील देशांपैकी एक असून नेपाळ, भूतान, अफगाणिस्तान, पाकिस्तान,चीन आदी शेजारी देशांशी राजकीय, व्यापारविषयक, सांस्कृतिक संबंध प्रस्थापित केले आहेत तसेच जगातील सर्वोच्च देशांच्या बरोबरीने कृषी क्षेत्रातील जीडीपी गाठला आहे.

स्पर्धेपेक्षा सहकार्याने नेहमीच फायदा होतो. हे तत्व अंगीकारून जनकल्याणासाठी जागतिक विकासाची दृष्टी बाळगणाऱ्या विविध संशोधकांनी हाच नियम आग्रहाने सांगितला आहे. एका मेक्सिकन संशोधन संस्थेचे प्रमुख आणि अमेरिकन कृषी अर्थशास्त्रज्ञ नॉर्मन बोरलॉग यांची भारत व पाकिस्तानला नवा गहू देण्यात महत्वाची भूमिका होती त्यांना सर्वप्रथम मेक्सिकोमध्ये हरित क्रांती घडवून आणली यासाठी त्यांना शांततेचे नोबेल पारितोषिक देण्यात आले. भारतातील डॉ. एम.एस. स्वामीनाथन भारतातील हरित क्रांतीचे प्रणेते होते.

**हरित क्रांती**

मेक्सिको आणि फिलिपाईन्स या देशांतील संशोधन संस्थांनी हरित क्रांतीची सुरूवात केली आणि त्यांना त्या देशांची सरकारे, आंतरराष्ट्रीय दाता संस्था आणि अमेरिकन सरकारने अर्थसाह्य दिले.

बोरलॉग(जन्म १९१४) यांना मेक्सिकन सरकार व रॉकफेलर फाऊंडेशनने कडधान्याचे उत्पादन व वितरणात देश स्वयंपूर्ण बनवण्यासाठी गव्हावरील संशोधन हाती घेण्यास १९४४ मध्ये पाचारण केले. बोरलॉग यांच्या पथकाने वेगवेगळ्या वातावरणांत उत्तम पैदास होणाऱ्या गव्हाच्या विविध जाती विकसित केल्या ज्यांना पारंपरिक प्रजातींपेक्षा




अमेरिका युरोप, जपान, चायना व भारत यांचा दैनंदिन दरडोई खाद्यान्न आहार

★ ही सांख्यिकी, किरकोळ व्यापारांना आणि कुटूंबियांना एकुण पुरविलेल्या खाद्याची एकुण कॅलरी मुल्य प्रतिनिधित्व करते. याला एकुण लोकसंख्येने भागले आहे

★ जागतिक स्तरावरील ४९ अविकसीत देश

★ स्त्रोत एफए-ओ - आरबीए

रासायनिक खतांची अतिरिक्त मात्रा दिल्याने फायदा झाला होता. १९७० मध्ये गव्हाचे उत्पादन १९४४ मधील उत्पादनापेक्षा चौपटीनी वाढले. मेक्सिको जो आतापर्यंत गव्हाची आयात करत होता, तो देश १९५६ पर्यंत कडधान्य उत्पादनांत स्वयंपूर्ण झाला होता. मेक्सिकोतील या यशाची गुरूकिल्ली म्हणजे लहान उंचीच्या खोडाची गव्हाची रोपे हीच होती जी इतर प्रजातींपेक्षा कमी उंचीवर यायची. याउलट रोपे उंच वाढली तर ती शेजारच्या रोपांना प्रकाश मिळू देत नाहीत व कापणीपूर्वीच कोसळून पडतात तर खुज्या देठाची रोपे एकसंघरित्या वाढतात आणि कापणीला सोपीही असतात. मेक्सिकन गव्हाची खुजी रोपे प्रथम शेतकऱ्यांपर्यंत १९६१ मध्ये पोहचवण्यात आली आणि त्या वर्षी सरासरी उत्पादन दुपटीने वाढले.

मेक्सिकोशिवाय पाकिस्तान, भारत आणि फिलिपाईन्स यांच्याशिवाय अफगाणिस्तान, श्रीलंका, चीन, इंडोनेशिया, इराण, केनिया, मलाया, मोरोक्को, थायलंड, ट्युनिशिया व तुर्की या देशांना हरित क्रांतीचा लाभ झाला. हरित क्रांतीने शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीला (तेव्हा शेतकरी ट्रक्टर व अन्य कृषी अवजारे खरेदी करण्यास सक्षम होते) विजेचा वापर व ग्राहकोपयोगी उत्पादने आदी साह्याद्वारे व्यापार व वाणिज्याची गती वाढवून या देशांच्या एकंदर आर्थिक विकासात मोठे योगदान दिले.

भारताने नव आगामी, नवतंत्रज्ञानयुक्त पद्धतीचा विकास करून तसेचं शेतकऱ्यांच्या समस्या, कृषी शिक्षण, अर्थसहाय्य, कृषी संशोधन, हवामानाच्या आधारावर कृषी

पीक उत्पादकता पद्धती, किड नियंत्रण या सर्वच क्षेत्रात प्रगतीचे विविध टप्पे गाठले आहेत आकृती क्र. १ नुसार फक्त गव्हाचे उत्पादन घेतांना उपयोगात आणलेले क्षेत्र, उत्पादन व पीके यांचा आलेख दिला आहे. भारताचे गव्हाचे उत्पन्न, वर्ष १९९५, ९७, २००० आणि २०१२ ला उत्कृष्ठ, होते. गहू, तांदूळ आणि इतर अन्नधान्यांच्या गंज प्रतिबंधक जाती विकसित करून भारतीय कृषी संशोधन संस्थेनेही हरित क्रांतीत आपला वाटा उचलला आहे. उच्च पैदाशीचे वाण विकसित करून तसेच रासायनिक खते व पाटबंधाऱ्यांचा अधिकाधिक वापर केल्याच्या परिणामी भारताला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनण्यासाठी आवश्यक तितके उत्पादन वाढू शकले व अशा तऱ्हेने भारतातील कृषी क्षेत्रात सुधारणा झाली. यासाठी उच्च पैदाशीचे वाण (HYV) आणि आधुनिक पद्धतीने शेती ही पद्धती वापरण्यात आली.

हे नवीन युग होते ज्यात जगभरातील सर्वच देश नवीन क्रांतींचा सातत्याने विकास करत होते, अंमलात आणत होते आणि प्रयोगही करत होते.




Figure 1. India: Wheat: Area, Production, and Yield

## भारतातील डिजीटल क्रांती

तिसरी औद्योगिक क्रांती या नावने ओळखली जाणारी डिजीटल क्रांतीने ॲनालॉग कॉम्प्युटर पासुन ते यांत्रिक ते इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञानाद्वारे विकासाचे नवनवीन टप्पे गाठले आहेत. डिजीटल क्रांती म्हणजे तंत्रज्ञान युगाची सुरुवात इतर पाश्चिमात्य विकसीत देशांसारखे भारताला ही स्वातंत्र्यानंतर त्वरीत डिजीटल क्रांतीचा उद्घोष करता आला असता परंतु इतर अविकसीत क्षेत्रे, त्यांच्या समस्या यांकडे भारताने लक्ष पुरविले व हरित, धवल क्रांती द्वारे सामाजिक आर्थिक बदल सुनिश्चित केला. १९८० मध्ये सेलफोन द्वारे प्रवेश केलेल्या तंत्रज्ञानाने व्यापक रुप धारण करुन दूर संचार क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली. मोबाईल धारकांची कोटींमधील संख्या, ३-G सेवा आणि मोबाईल क्रमांक पोर्टेबिलीटी मध्ये क्रांतीकारक बदल घडून आला. वर्ष २००१ च्या तुलनेत वर्ष २०१५-१६ मध्ये मोबाईल धारकांच्या संख्येत ११० पटीने वाढ झाली. सध्या भारतात इंटरनेट उपयोग कर्त्यांची संख्या ०८ टक्के आहे. भारतीय इंटरनेट आणि मोबाईल संस्थेचे वर्ष २०११ पासुन कार्यरत अध्यक्ष सुबोध रे यांच्या मते भारताच्या ब्राडबॅंण्ड आणि इंटरनेट उपयोग कर्त्यांच्या संख्येत १०० दशलक्षाने वाढ होऊन हे उपयोग कर्ते डिजीटल क्षेत्राच्या संशोधनात व विकासातील मुख्य धारेत येतील.

**धवल क्रांती**

देशात ऑपरेशन फ्लड सुरू करण्यात आले आणि दुग्धोत्पादनाच्या बाबतीत देश स्वयंपूर्ण झाला.संपूर्णपणे सहकारी तत्वावर रचनेद्वारे हे साध्य करण्यात आले आणि ही रचना डॉ. व्हर्गीस कुरियन ज्यांना धवल क्रांतिचे प्रणेते म्हटले जाते त्यांनी विकसित केली होती. गरीब आणि अशिक्षित शेतकऱ्यांचा गैरवापर दूध वितरक करत आहेत, असे त्यांना दिसले. अनेक गावांतील शेतऱ्कऱ्यांना कणखर बनविण्यासाठी त्यांनी सहकारी सोसायट्या स्थापन केल्या. आज देशातील २२ राज्यांतील एक कोटी वीस लाख शेतकरी २५० दूध डेअरींचे मालक असून दररोज दोन कोटी लिटर दुधाचे उत्पादन करतात. हे लक्षणीय यश आहे. भारतात आपण हे यश गृहित धरत असलो तरीही जगभरातून प्रशंसा खेचून घेण्यात ही कामगिरी यशस्वी ठरली आहे.

१९५५ मध्ये आमची लोण्याची आयात प्रतिवर्ष ५०० टन होती, तर आज आमच्या सहकारी सोसायट्या एकट्यानेच १२ हजार टन लोण्याचे उत्पादन घेतात. त्याचप्रमाणे, १९५५ मध्ये भारत ३००० टन बेबी फुड आयात करत होता. आज देशातील सहकारी सोसायट्या एकट्याच ३८,००० टन बेबी फुड उत्पादित करतात. १९७५ पर्यंत दूध व दुग्धजन्य पदार्थांची सर्व आयात थांबवण्यात आली. ऑपरेशन फ्लड अंतर्गत मदतीच्या आयातीला परवानगी होती.

धान्याची मदत स्वीकारून त्याचा उपयोग ऑपरेशन फ्लडमध्ये करण्यासाठी भारतीय दुग्धोत्पादन महामंडळ नावाची

स्वतंत्र संस्था स्थापन करण्यात आली होती, जिचे प्रमुखत्व डॉ. व्हर्गिस कुरियन यांच्याकडेच होते. ऑपरेशन फ्लडपूर्वीच्या वर्षांतील २२,००० टन दूध पावडरीचे उत्पादन १९८९मध्ये एक लाख ४० हजार टनांपर्यंत पोहचले होते. भारतातील दुग्धविकासाचा परिणाम आणि यातील स्वत:चे योगदान यावर जागतिक बँकेने १९९८ मध्ये एक अहवाल प्रसिद्ध केला होता. त्यातून असे स्पष्ट झाले की, जागतिक बँकेने ऑपरेशन फ्लडमध्ये गुंतवणूक म्हणून दिलेल्या २०० कोटी रुपयांवर दहा वर्षे भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेतून निव्वळ परतावा तब्बल २४, ०००कोटी रुपये प्रतिवर्ष मिळाला असून कोणत्याही दुग्धोत्पादन कार्यक्रमाची याच्याशी बरोबरी होऊ शकत नाही.

**नील क्रांती**

नील क्रांती याचा अर्थ मासळी आणि सागरी उत्पादनांमध्ये वाढ करण्यासाठी एकत्रित कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे असा आहे. भारतात १९७० मध्ये पाचव्या पंचवार्षिक योजनेंतर्गत सरकार पुरस्कृत मासळी उत्पादक विकास संस्था (एफएफडीए) स्थापन करून नील क्रांतीची सुरूवात करण्यात आली. ११ वर्षांपूर्वी बंगालचा उपसागर येथे स्थापन करण्यात गोड्या पाण्यातील संवर्धनासाठीच्या केंद्रीय संस्थेने (सीआयएफए) प्रचंड संशोधन केले होते. त्यानंतर सागरी संपत्तीचे संवर्धन करण्यासाठी **"ब्रेकिश वॉटर फिश फाम्थस डेव्हलपमेंट एजन्सी"** ही संस्था स्थापन करण्यात आली. मासळी प्रजनन, संगोपन, बाजारपेठेपर्यंत नेणे व निर्यात यासाठी नवीन तंत्र वापरून संवर्धनात नील क्रांतीने सुधारणा केली. नील क्रांती कार्यक्रमांतर्गत कोळंबी माशाच्या उत्पादनात प्रचंड वाढ झाली आहे. आंध्रप्रदेश आणि तामिळनाडूत कोळंबीचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात आले. सागरात तसेच देशाच्या आंतरभागातील पाण्यात माशांच्या सुमारे १८०० प्रजाती सापडतात,ज्यापैकी व्यावसायिक दृष्ट्या महत्वाच्या फारच थोड्या आहेत. १९५०-५१ मध्ये ०.७५ दशलक्ष टन असलेले मासळीचे उत्पादन २००६-०७ मध्ये ६८.६९ दशलक्ष टन इतके होते. एक कोटी ४० लाख लोकांच्या उपजीविकेचा आणि परकीय चलन मिळवून देणारे प्रमुख साधन असलेल्या मासेमारी, संवर्धन आणि इतरही अनेक तत्सम उपक्रमांचे २००५-०६ मध्ये एकूण जीडीपीमध्ये एक टक्का इतके योगदान होते आणि कृषी क्षेत्राचे योगदान ५.३ टक्के होते. भारतातील सागरी मासळीचा भौगोलिक पाया ८,११८ किलोमीटरची किनारपट्टी, ०.५ दशलक्ष चौरस किलोमीटर उपखंडीय किनारपट्टी, ३९३७ मासेमारी गावांसह २.०२ दशलक्ष चौरस किलोमीटरचे फक्त मासळीसाठी असलेले आर्थिक क्षेत्र हाच आहे. हरीत, धवल, नील क्रांती नंतर आंतरराष्ट्रीय घडामोडींचा विकास आणि त्याची छाप भारतावरही पडत होती भारताच्या ऑटोमोबाईल उत्त्पादनाला २००० नंतर वेग प्राप्त झाला कारण दळणवळाचा प्रश्न तेव्हाच सोडविता आला असता जेव्हा देशात वाहनांची संख्या वाढली असती. आंतरराष्ट्रीय स्तरावरील पेट्रोलच्या किंमतीचा परिणाम भारतावर होणे स्वाभाविक होते परंतु त्यात एकसुत्रता व नियमांची आवश्यकता होती. भारताने ब्लॅक रिव्हॉल्युशनवर जोर दिला. भारताच्या औद्योगिक जीडीपीमधील पेट्रोलियम, (केमीकल्सचा वाटा निर्यात मिळकतीच्या ३४ टक्के आहे. भारताच्या गुजरात राज्यातील जामनगर येथिल पेट्रोलियम शुद्धीकरण (रिफायनरीची) क्षमता दर दिवशी १.२४ दशलक्ष बॅरल इतकी आहे. या रिफायनरीच्या विकासानंतर भारताचे ८४ टक्के इतर देशांवरील अवलंबित्व कमी झाले.

१९७२ मध्ये भारताने क्षेत्रीय विकासाचे उदारमतवादी धोरण स्वीकारले. त्यावेळी धर्मनिरपेक्षतावाद आणि अमेरिकेतील लोकशाहीवादी आघाड्या मजबूत होत्या आणि अमेरिकेतील लोकशाही आघाड्यांचा प्रभाव जगभर पसरला होता. क्रांती याचा अर्थ क्षेत्रनिहाय विकासाकरता बदल घडवण्यासाठी सातत्याने कठोर परिश्रम करत राहणे असा असून ज्याचा परिणाम एकंदरीत आर्थिक विकासावर होत असतो. गोल्डन फायबर रिव्होल्युशन, ब्लॅक रिव्होल्युशन- पेट्रोल उत्पादन, ब्राऊन रिव्होल्युशन - चामडे, कोको अशा अपारंपरिक उर्जा उत्पादन, गोल्डन फायबर रिव्होल्युशन - ताग उत्पादन, सुवर्ण क्रांती - एकंदरीत फलोत्पादन, मध, फळांचे उत्पादन, ग्रे रिव्होल्युशन - खते, लोकर उत्पादन, गुलाबी क्रांती - कांदा, झिंगा, औषधे उत्पादन, रेड रिव्होल्युशन - टोमॅटो, लाल मांस उत्पादन, राऊंड रिव्होल्युशन - बटाटे उत्पादन, रजत क्रांती - अंडी उत्पादन, सिल्व्हर फायबर रिव्होल्युशन - कापूस उत्पादन, पीत क्रांती - तेल बिया उत्पादन अशा अनेक क्रांत्या आंतरराष्ट्रीय पातळीवर घडून आल्या. भारतात हरित, धवल, नील आणि सुवर्ण क्रांती साध्य केल्यावर भारताने इतर देशांनाही निधी पुरवला असून त्यांच्यासोबत करारमदार

केले आहेत. सर्वच क्रांती भारतात प्रचंड यशस्वी ठरल्या आहेत.

**नरेंद्र मोदी यांची चतुरंगी क्रांती**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चतुरंगी क्रांतीची कल्पना मांडली असून प्रोटिन्सने समृद्ध असलेल्या डाळींचे उत्पादन वाढवण्यासाठी दुसरी हरित क्रांती, दुभत्या जनावरांची काळजी घेण्यासाठी धवल क्रांती, सौर उर्जेवर भर देणारी भगवी क्रांती आणि स्वच्छ पाणी व मच्छीमारांच्या कल्याणासाठी नील क्रांती यांचा पुरस्कार केला आहे. निळा रंग हा अशोक चक्राचा आहे. दूध, अन्नधान्य, सागरी खाद्यपदार्थ आणि उर्जा (वीज) अशा विविध क्षेत्रांत शास्त्रीय उत्पादनावर लक्ष केंद्रित करण्यावर त्यांनी जोर दिला आहे. ही क्षेत्रे हिरवा, सफेद, भगवा आणि निळ्या रंगांचे प्रतिनिधित्व करतात. दुसरी हरित क्रांती ही काळाची गरज आहे कारण अन्नधान्य उत्पादन, नैसर्गिक आपत्ती आणि लोकसंख्या यांचे प्रमाण प्रचंड असंतुलित आहे. राजकीय आशिर्वादाने आणि लोकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या कृत्रिम दुधाच्या विपरित परिणामांवर निर्बंध आणण्यासाठी दुग्धोत्पादनाच्या शास्त्रोक्त पद्धतीची अंमलबजावणी व्हायला हवी. धवल क्रांती देशात दुधाचे उत्पादन वाढवण्यास साह्य करेल. १९७२ पासूनच भारत नील क्रांतीत यशस्वी ठरला आहे तरीही बंदर उभारणीस प्रोत्साहन व मच्छीमारांना मजबूत करून त्याद्वारे सागरी सामर्थ्य वाढवण्यासाठी नवीन तंत्र व संशोधन कार्याची गरज आहे. या विविध उत्पादनांआधारित क्रांतीद्वारे विविध देशांमध्ये आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि आदिभौतिक विकास घडून आला त्यामुळे संपुर्ण जग विशिष्ट साचेबद्ध पद्धतीने कार्यरत असल्याचे जाणवते. परंतु यामुळे दरडोई उत्पादनात वाढ, रोजगारात वाढ, कुशल कामगार, तंत्रज्ञान विकास हे सर्व साध्य होत आहे. प्रत्येक घडून आणलेल्या क्रांतीमुळे जसा विकास साधता आला तसेच त्याच्या दु:ष्परिणामांना तोंड देणे आवश्यक आहे या सर्वांचा अभ्यास आवश्यक आहे. कृषी उत्पादन वाढवितांना वापरण्यात अलेल्या रासायनिक घटकांमुळे झालेल्या मानवी आरोग्यावरील विपरीत परिणाम देशाने अनुभवले आहेत. 'सेंद्रीया खते' सेंद्रीय शेती या संकल्पनांच्या अंमलबजावणीवर जोर देण्यात आला. धवल क्रांतीचा पुरस्कार करतांना एकत्रित करण्यात येणारे दुध विविध प्राण्यांचे असते ते एकत्रित केल्यास प्राण्यांच्या गुणधर्मानुसार मानवी शरिरावर काय परिणाम होईल या सर्वांचा विविधांगी अभ्यास आवश्यक आहे. अतिवेगाने विस्तारीत आणि विविध क्षेत्र आपल्या तंत्रज्ञानावर नियंत्रण ही काळाची गरज आहे कारण जिथे सर्वसमावेशक वृद्धीच्या कल्पना राबविणारी डोकी कार्यरत असतात तिथेच विध्वसंक वृत्तीही वेगाने वाढत असतात. याचें गंभीर उदाहरण म्हणजे मुंबई सारख्या उच्चतम लोकसंख्या असलेल्या आणि देशाची दुसरी आर्थिक राजधानी असलेल्या राज्यात विविध ठिकाणी झालेले बॉम्बस्फोट जे इंटरनेट चा वापर करून मेलद्वारे संदेशवहन करून घडविण्यात आले. विदारक घटनेनंतरच्या दारूण वास्तव्यास सामोरे जातांना पैसा, श्रमशक्ती, आणि संवेदना मोठया प्रमाणावर खर्ची करावे लागतात.

डिजीटल तंत्रज्ञानामुळे आर्थिक व्यवहार करणे सोपे झाले. पुर्वी तासनतास रांगेत उभे राहुन पैसे जमा करणे किंवा काढणे हे आता एका चुटकीसरशी करता येते परंतु त्याचबरोबर आर्थिक गैरव्यवहारात वाढ, आर्थिक घोटाळे हे सुद्धा वाढलेत. लोक जागरूकता मार्गदर्शिका आणि संरक्षणावर लक्ष देणे ही सरकारची जबाबदारी आहे.

*(लेखिका* ***भावना गोखले*** *या भारतीय माहिती सेवेच्या अधिकारी असुन सध्या योजना मासिकाच्या संपादक म्हणुन कार्यरत आहेत.*

**संपर्कासाठी ई- मेल**

**myojanadpd@gmail.com / bhavanagokhale2404@ gmail.com**

# वस्तु व सेवा कर प्रणाली - एका नवीन प्रारूपात

**डॉ. विजय काकडे**




**१ एप्रिल २०१६ पासुन लागु होणाऱ्या नवीन वस्तु व सेवा कराच्या अंमलबजावणीकडे सर्वांचे लक्ष लागले असुन ही कर प्रणाली केवळ अर्थव्यवस्था बळकट, करण्याचे साधन नसुन परकीय थेट गुंतवणुकीवर प्रोत्साहन देण्यासाठी, उपयोगात आणण्यात येणारी सोपी कर प्रणाली आहे. यामुळे विदेशी गुंतवणुकदरांना विविध करांच्या क्लिष्ट प्रक्रीयांवर तोडगा काढता येऊन सहजहस्ते गुंतवणूक करता येईल वर्ष २०१०च्या प्रस्तावित १२% तर वर्तमानातील २७% प्रस्तावित कर दरातील तफावत बघता जीवनावश्यक वस्तु व सेवांच्या दरात समाविष्टता आवश्यक आहे यात जागतिक स्पर्धात्मकतेचा भागही आहेच.**

एका नव्या आधुनिक कर प्रणालीची म्हणजे जी एस टी किंवा वस्तु आणि सेवा कराची सुरूवात एक एप्रिल २०१६ पासून होण्याची शक्यता, आता हे प्रकरण निवड समितीकडे गेल्याने या प्रणालीच्या अंमलबजावणीची गती मंदावली आहे. हे जरी सत्य असले तरी ही कर प्रणाली स्वीकारणे अपरिहार्य असून त्यातील तांत्रिक व व्यावहारिक अडचणीवर लवकरच मार्ग निघेल. ही पद्वती नव्या बदलत्या उद्योग व्यवसाय रचनेची आवश्यकता बनली असून त्याबाबत इतर देशांचेही अनुभव महत्वाचे ठरतात. ही पद्धती नेमकी कशी आहे? त्याचे फायदे कोणते त्यावर आक्षेप कोणते आहेत? याचा अभ्यास केल्यास या पद्धतीबाबतचे गैरसमज दूर व त्यात स्पष्टता येण्यास मदत होईल.

शासन व्यवस्थेच्या विकासाबरोबर कररचना विकसित झाली आहे. शासनाच्या प्रशासकीय विकासात्मक कल्याणकारी अशा विविध कार्यासोबत अंतर्गत शांतता आणि सुव्यवस्था याचबरोबर परकीय आक्रमणापासून संरक्षण अशी अनेक कार्ये करावी लागतात. शासनाच्या या जबाबदाऱ्या लोकशाही रचनेत व कल्याणकारी समाजरचनेत अधिक प्रमाणात वाढत गेल्या आहेत अर्थात यासाठी लागणारा पैसा समाजानेच म्हणेज आपण सर्वांनी कराच्या स्वरुपात देणे आवश्यकत ठरते. कर सक्तीचे आणि कोणत्याही प्रमाणशीर लाभाची हमी न देता शासनाला दिलेली फी अशा स्वरुपाचे असतात. व्यक्ती आणि कंपन्यांच्या उत्पनावरील कर, संपत्ती कर हे प्रत्यक्ष कर म्हणून ओळखले जातात कारण हे कर पुढे दुस-यावर हस्तांतरीत करता येत नाहीत. मात्र आपण ज्या अनेक वस्तू व सेवा खरेदी करतो त्यावर दिला जाणारा कर हा उत्पादक किंवा विक्रेता भरत असला तरी तो ग्राहकावर अंतिमत": वाढलेल्या किंमतीतून घेतला जात असल्याने त्याला अप्रत्यक्षकर म्हणतात. प्रत्यक्षकर हे श्रीमंतावर अधिक दराने आकारले जातात व त्यातून विषमता कमी होते तर अप्रत्यक्ष कराबाबत ज्या वस्तू जीवनावश्यक व गरिबांच्या उपभोगातील आहेत त्यावर कमी कर किंवा सूट देऊन समानतेचे तत्व पाळले जाते. कररचना समन्वयी असावी, कर गोळा करण्याचा प्रशासकीय खर्च कमी असावा, करामुळे बचत गुंतवणूक यावर प्रतिकूल परिणाम होऊ नये, तसेच कर भार कमीत कमी असावा, उत्पादन रोजगार यावर प्रतिकूल परिणाम होऊ नये अशी आदर्श करप्रणाली असते. यातील अप्रत्यक्ष कर म्हणजे वस्तू व सेवांवरील कर हेच उत्पन्नाचे मोठे साधन अनेक देशांत असून आपणही याला अपवाद नाही - स्वातंत्र्योत्तर काळात वांच्छू एकॅल्डार यांचेपासून केळकर समितीपर्यंत विविध तज्ञसमित्यांनी आपली करप्रणाली

सुधारणेसाठी सूचना केल्या आहेत. १) यातील सर्वात महत्वाचा क्रांतीकारक किंवा फार मोठा परिणाम करणारा बदल म्हणून सध्याच्या जी एस टी किंवा वस्तू व सेवा कराचा उल्लेख करावा लागेल, जो मोठ्याप्रमाणात निर्यातीला प्रोत्साहन देणारा असेल आणि विविध देशातील गुंतवणुकदारांना भारतात गुंतवणुकीसाठी आकर्षित करेल.

करपध्दतीमध्ये मोठया प्रमाणात दर भिन्नता संदिग्धता असेल तर त्यामुळे उत्पादनसाधन सामग्रीचा कार्यक्षम वापर होत नाही. याचा विपरीत परिणम उत्पादन, रोजगार याबरोबर निर्यातीवरही होतो. भारताची निर्यात क्षमता व स्पर्धात्मकता वाढवणेसाठी व्यापक वस्तू व सेवा कराची आवश्यकता होती. याबाबत 'नॅशनल कौन्सील ऑफ अप्लाईड इकॉनॉमिक रिसच'या संस्थेने २००९ मध्ये सविस्तर असा अभ्यास १३) प्रसिध्द केला असून जी एस टीच्या अंमलबजावणीतून ०.९ ते १.७ राष्ट्रीय उत्पन्न वाढण्याची शक्यता व्यक्त केली आहे ; वर्ष २००८-०९ च्या आकडेवारीप्रमाणे ४३,००० ते ८४,००० कोटी रुपयांचा लाभ होणार होता.

**आवश्यकता :**

आपली कररचना अधिक कार्यक्षम रोजगार व उत्पादनाला चालना देणारी सुलभता असणारी हवी यादृष्टीने

विविध समित्यांनी सूचना केल्या होत्या. एल. के. झा समितीने १९७६ मध्ये सुचीवल्या प्रमाणे मूल्यवर्धित कर "वॅट" (VAT) लागू करण्यात आला. पुढे आपण आर्थिक उदारीकरणाची नवी आर्थिक नीती स्वीकारल्यानंतर स्पर्धात्मक व कार्यक्षम व्यवस्थेची पूर्वअर म्हणून राजा चेसैया तसेच विजय केळकर समितीने सुचविलेप्रमाणे व्यापक वस्तू व सेवा कर आकारला जावा यासाठी मान्यता मिळाली. आंतरराष्ट्रीय स्तरावर भारत निर्यातीतून आपल्या विकासाचे साध्य करु शकेल असा विश्वास कूगर सारख्या ख्यातनाम तज्ञांनी सुचविले. केवळ आठ टक्के वाटा राष्ट्रीय उत्पन्नात निर्यातीचा वाटा १९९०-९१ मध्ये २६% पर्यंत वाढला यातून कूगर यांच्या विधानाची सत्यता लक्षात येते. भारत २१ व्या शतकात विकासाच्या उत्पादनाचे जागतिक केंद्र "मेक इन इंडीया" यासारख्या धोरणात्मक रचनेतून होऊ शकतो. त्यासाठी जीएसटी पध्दतीची कररचना आवश्यक ठरते. यातूनच आपण २०१० पासून ही कररचना अंमलात आणण्याचे ठरविले होते परंतू पुढील ५ वर्षात हे साध्य झाले नाही. याची अप्रत्यक्ष किंमत आपण मोठया प्रमाणात देत आहोत जीएसटी ज्यांनी स्वीकारला त्यांच्या अनुभवातून स्पष्ट होते

**जी. एस. टी. - आतंरराष्ट्रीय अनुभव :**

१९५४ मध्ये फ्रान्सचे मॅरीस लॉरे यांनी मूल्यवर्धित कर ही संकल्पना मांडली. उत्पादकांना त्यांनी जेवढया प्रमाणात मूल्यवर्धित केली असेल तेवढया प्रमाणातच कर द्यावा व अंतिमत: तेवढाच. ग्राहकांकडून वसूल करावा हे या पध्दतीचे मुख्य सूत्र आहे. पूर्वीच्या उत्पादकाने कर भरलेला "सेट ऑफ" पध्दतीने कमी केला जात असल्याने दुहेरी कर आकारणी टाळली जाते. यापध्दतीचे फायदे लक्षात घेऊन सध्या १३० देशांत ही पध्दत वापरात असून एकूण जागतिक कर महसूलापैकी २०% कर महसूल जीएसटीमधून होतो. या पध्दतीच्या फायद्यांचा व परिणमांचा अभ्यास थायलंडच्या बाबत १९९१ मध्ये देवराजन यांनी तर विटवेन किम यांनी ऑस्ट्रेलिया बाबत केले आहेत. अशा असंख्य अभ्यासातून जीएसटीमुळे व्यापार वाढ, उत्पादनकार्यक्षमता वाढ झाल्याचे स्पष्ट झाले. कॅनडाच्या स्थूल राष्ट्रीय उत्पन्नात १.४% ने वाढ झाल्याचे स्पष्ट झाले. आंतरराष्ट्रीय व्यापारातील वाढीने भारतास ३.२ ते ६.३% वाढ होऊन ३१ ते ६१ हजार कोटी रुपयाचे लाभ होतील असा एनसीए इआर (NCAER) च्या अभ्यासातून स्पष्ट झाले आहे. (४) याचा शेतीक्षेत्रालाही लाभ होणार असून व्यापारशर्ती १.८ ते ३.८% इतक्या प्रमाणात अनुकूल होणार आहेत. उत्पादकांनाही लाभ होईल विविध उत्पादन घटकांना होणाऱ्या लाभाचे प्रमाण पुढील कोष्टकातून स्पष्ट होईल

**तक्ता क्र. १ जीएसटी लाभप्रमाण**

| अ. क्र. | घटक | प्रमाण % |
|---|---|---|
| १ | शेती | भूमी ०-४२ ते ०.८२% |
| २ | वेतन | ०-६८ ते १.३३% |
| ३ | भांडवल | ०-३७ ते ०.७४% |

संदर्भ - एनसीएइआर अभ्यासगट (१३) अहवाल पृ. १०

जीएसटी प्रणाली जमीन श्रम, भांडवल अशा सर्वच घटकांना फायद्याची असून सर्वाधिक लाभ कामगारांना रोजगार व वेतन वाढीच्या स्वरुपात मिळणार आहेत. त्यानंतर भूमी व शेवटी भांडवलासही ०.३७ ते ०.७४% लाभ मिळणार आहेत. जीएसटीमुळे अन्य लाभ जे मिळणार त्यात ऊर्जा किंवा वीज वापरातील कार्यक्षमता वाढून पर्यावरण

सुरक्षितता वाढणार आहे. ही व्यवस्था आपण स्वीकारण्यात जेवढा विलंब करणार तेवढया प्रमाणात हे लाभ आपण घेऊ शकणार नाही. ही अप्रत्यक्ष किंमत राष्ट्रीय उत्पान्नाच्या २% जरी धरली तर होणारे अंदाजित नुकसान हे प्रतिवर्षी २५ हजार कोटी रुपयांचे होते. संचयीपध्दतीने होणारे हे नुकसान जीएसटीची आवश्यकता स्पष्ट करते

**जी.एस. टी. स्वरुप :**

खंडप्राय आकार आणि संघीय लोकशाही शासनपध्दती यांना अनुरुप ठरणारी जीएसटी प्रणाली भारताने स्वीकारली असून यामध्ये केंद्र सरकारचा आणि राज्यसरकारचा जीएसटी अशी व्यवस्था असणार आहे. या व्यवस्थेमुळे अनेक प्रकारचे कर रद्द होऊन करपध्दतीत सूसुत्रता येणार आहे. जीएसटी व्यवस्था राबवण्यासाठी माहिती तंत्राचा वापर करुन जीएसटी नेटवर्क तयार केले जाणार आहे त्यासाठी केंद्र व राज्य सरकार सोबत एनएसडीए सहभाग घटक असणार आहे. याबाबतची १२२ वी घटना दुरुस्ती ५ मे २०१५ रोजी संसदेने मान्य केली. तथापि राज्यसभेने त्याला २१ सदस्यांच्या निवडसमितीकडे देण्याचे ठरविले. जीएसटीच्या अंमलबजावणीसाठी जीएसटी कौन्सील स्थापित होणार असून त्यामध्ये केंद्रीय वित्त मंत्री ;अध्यक्ष महसूल व वित्त विभागाचे केंद्रीय राज्य मंत्री राज्यसहकार नियुक्त प्रतिनिधि असे घटक असणार आहेत. या कौन्सील मार्फत जीएसटी दर आकारणी सूट द्यावयाच्या वस्तू व सेवा या बाबत निर्णय देण्याबरोबरच विवाद मिटवण्याचे कार्यही करावे लागणार आहे. जीएसटी स्वीकारल्याने राज्यांचे महसूली नुकसान होत असेल तर त्याची ५ वर्षापर्यंत भरपाई केंद्रामार्फत दिली जाणार आहे. जीएसटीच्या कक्षेबाहेर मद्य, डिझेल व पेट्रोल तसेच तंबाखूजन्य पदार्थ यांना ठेवले आहे

**जी.एस.टी दर :**

जीएसटी कार्यप्रणाली यशस्वी ठरण्यासाठी सर्वात महत्वाचा घटक ठरणार तो त्याचा दर याबाबत महसूल तटस्थ दर हा आधार घेतला आहे त्यानुसार जीएसटीचा दर असा हवा की, ज्यामुळे शासनाच्या सद्याच्या करमहसूलावर प्रतिकूल परिणाम होऊ नये. याचाच अर्थ जीएसटी दरातूनही पूर्वी एवढाच कर महसूल होणे आवश्यक आहे. करप्रणालीबाबत नेहमीच करांचे दर वाजवी असावेत असा आग्रह धरला जातो. जर करांचे दर अवाजवी जास्त झाले तर करचुकवेगिरी उद्योगस्थलांतर दडते. याबाबत ज्या विविध देशांनी जीएसटी स्वीकारला त्यांचे पाहणे उद्बोधक ठरेल.

तक्ता क्र. २ जीएसटी दर अ. क्र देश प्रारंभ दर

| अ. क्र | देश | प्रारंभ | दर |
|---|---|---|---|
| १ | बांग्लादेश | १९९१ | १५% |
| २ | चीन | १९९४ | १७% |
| ३ | जपान | २००८ | ५% |
| ४ | श्रीलंका | २००२ | १२% |
| ५ | डेन्मार्क | १९६७ | २% |

संदर्भ: http://www.prsindia.org En.wikipedia.org

जीएसटी बाबत २७% एवढा दर (महसूल तटस्थ दर) भारताने प्रस्तावित केला व तो खूप मोठा असल्याचे अर्थमंत्र्यांनीच मान्य केल्याने तो १८% पर्यंत अंतिम होण्याची शक्यता आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मकतेचा विचार करता हा दर सध्याच्या १४% सेवाकर दरापेक्षा अधिक असू नये व त्यातून जीवनावश्यक वस्तू व सेवांची शून्य दरात समाविष्टता आवश्यक ठरते. यापूर्वी २०१० मध्ये जीएसटीचा दर १२% प्रस्तावित केला होता हेही लक्षात घेतले पाहिजे

**काही प्रश्न :**

जीएसटी व्यवस्थेला पूरक आणि पोषक अशी धोरणात्मक व प्रशासकीय चौकट वेगाने तयार करावी लागणार आहे. यामध्ये "जीएसटी साक्षरता" निर्माण केली तर उद्योग व्यावसायीकांचे सहकार्य मिळेल. विशेषत: राज्यांची आर्थिक स्वायत्तता अबाधीत ठेवणे संघीय लोकशाहीसाठी आवश्यक आहे. उद्योग व्यवसाय पुर्नरचना करण्यास अवधि द्यावा लागेल. हा कर गंन्तव्य आधारीत असल्याने पुन्हा आंतरराज्य व्यापारावर १% कर आकारणी विसंगत ठरते. एका नव्या महत्वपूर्ण कररचनेचा स्वीकार सर्व घटकांच्या सहकार्यातूनच होणार असल्याने जीएसटी तक्रारनिवारण व्यवस्था कार्यक्षम हवी. अद्यापी व्यापार व्यवहाराच्या - दृष्टीने भारत खंडीत राहीला असून त्याची मोठी किंमत आपण देत आहोत. अखंड आर्थिक भारत जीएसटीतून शक्य असल्याने ही करसुधारणा नव्या पर्वाची, वेगवान विकासाची सुरुवात ठरेल असे दिसते.

*(**डॉ. विजय काकडे** हे शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे अर्थशास्त्र विभाग प्रमुख असुन अर्थशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)*

***संपर्कासाठी ई -मेल***

vijay382000@gmail.com

# सर्वसमावेशक वृध्दी आणि भारतीय अर्थव्यवस्था

संजय महाजन



**सर्वसमावेशकतेच्या दृष्टीने प्रगतीचा अंदाज वर्तविणे हे अत्यंत कठीण काम आहे. लोकप्रतिनिधी, विविध पातळीवरील प्रशासकीय अधिकारी व कर्मचारीवर्ग हा विविध आर्थिक विकासाचे कार्यक्रम व योजनांची कितपत प्रामाणिकपणे आणि कार्यक्षमरित्या अंमलबजावणी करतो यावरच सर्वसमावेशक वृध्दीचे भवितव्य अवलंबून आहे. जेव्हा देशातील सर्व घटकांना राष्ट्रीय संपत्ती निर्माणाच्या प्रक्रियेशी उत्पादक स्वरूपात जोडले जाईल तेव्हाच सर्वसमावेशक वृध्दी साध्य होईल. सर्वसमावेशकतेसाठी देशातील सामान्य जनतेला (आम आदमी) जीवनाच्या आधारभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देऊन विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची आवश्यकता आहे.**

**प्रस्तावना :-** स्वातंत्र्योत्तर सहा दशकांमध्ये देशाने लक्षणीय अशी प्रगती साध्य केली आहे. आपली अर्थव्यवस्था आता अशा वळणावर पोहोचली आहे की, यापुढे स्थायी विकास साध्य करून भारतीय जनतेचे महत्तम कल्याण साधून जागतिक महासत्ता होण्याच्या मार्गावर वाटचाल करणे आपणास शक्य झाले आहे. परंतु अध्यापही समाजातील एक मोठा समूह या सर्वांपासून दूर आहे. उत्पन्नामधील विषमता, विभागीय असमतोल, अज्ञान, निरक्षरता, स्त्री-पुरूष भेदभाव,दारिद्रय, कुपोषण, उपसामारी, अनारोग्य, भ्रष्टाचार इत्यादीमुळे आर्थिक विकासापासूनचे प्राप्त लाभ सर्वांपार्यंत पोहोचू शकले नाहीत. अर्थात आपला आर्थिक विकास हा सर्वसमावेशक नाही. डॉ. अर्जुन सेनगुप्ता (२००७) अहवालानुसार गरिबांदरम्यान संसाधनांचे वितरण हे समानरित्या घडून आले नाही तर वृध्दी दर पुढे सरकणार नाही. एवढेच नव्हे तर सामाजिक न्याय देखील प्रस्थापित होऊ शकणार नाही. कारण भारतीय समाजात सुमारे ७०% जनता ही गरिब व वंचित आहे. सामाजिक क्षेत्र व दारिद्रय निर्मुलन कार्यक्रमांवरील अंदाजपत्रकीय तरतुद ही सुरूवातीच्या तुलनेत २५% ने वाढली आहे. परंतु UNDP च्या मानवी विकास निर्देशांक संकेतानुसार भारत आर्थिक सुधारणांच्या सुरूवातीस ज्या १३५ व्या स्थानावर होता, त्याच्या आसपासच अद्यापही घुटमळतो आहे. जो पर्यंत आर्थिक विकास आणि त्यापासून निर्मित लाभांमध्ये समाजातील सर्व घटकांचा समावेश होत नाही. तो पर्यंत असा विकास निरर्थक ठरतो. प्रस्तुत लेखात सर्वसमावेशक वृध्दी आणि भारतीय अर्थव्यवस्था याचा संक्षिप्त आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**सर्वसमावेशक वृध्दीची संकल्पना:-** सर्वसमावेशक वृध्दी ही दीर्घकालीन प्रक्रिया आहे. सर्वांना समान संधीबरोबर विकास साध्य करणे हाच सर्वसमावेशक विकास आहे. अर्थात सर्वसमावेशक विकास म्हणजे असा विकास की, जो केवळ नवीन आर्थिक संधी निर्माण करतो असे नव्हे तर समाजातील सर्व वर्गांसाठी निर्मित अशा संधींची समान पोहोच देखील निर्धारित करतो. जेव्हा समाजातील सर्व व्यक्तिंचा आर्थिक विकासामधील सहभाग आणि योगदानास निश्चित केले जाते तेव्हा त्यास सर्वसमावेशक वृध्दी असे संबोधले जाते. या विकास प्रक्रियेचा आधार हा समानता आहे. असा विकास शाश्वत वृध्दी आणि संपत्ती व समृध्दीच्या समान वितरणासाठी आवश्यक आहे. अमर्त्य सेन यांच्या मते, आर्थिक विकासाबरोबरच गरिबांची क्रयशक्ती वाढल्यास सामाजिक कल्याण साधले जाऊन आपोआप सर्वसमावेशक वृध्दी घडून येईल. अशा प्रकारच्या वृध्दीमुळे अर्थव्यवस्था आणि तिच्या

वृध्दीच्या सुक्ष्म व स्थूल निर्धारकांमध्ये प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित होतो. सुक्ष्म निर्धारकांमध्ये समाजाचे संरक्षणात्मक रूपांतर अभिप्रेत आहे. तर स्थूल निर्धारकांमध्ये स्थूल राष्ट्रीय उत्पादन व स्थूल देशांतर्गत उत्पादन अभिप्रेत असते. या वृध्दी प्रक्रियेत समाजातील सर्व वर्गांसाठी मूलभूत सेवा-सुविधा (शिक्षण, आरोग्य, आहार, निवारा, पिण्याचे पाणी, कौशल्य विकास इ.) उपलब्ध करून देण्याबरोबरच सन्मानाने जीवन जगण्यासाठी उपजिविका साधनांची उपलब्धता करून देणे अभिप्रेत आहे. परंतु असे करीत असतांना पर्यावरणीय संरक्षणाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. कारण पर्यावरणीय ऱ्हास घडवून आणणारा (पर्यावरणीय किंमत मोजावी लागणारा) विकास हा टिकाऊ असत नाही. तसेच तो सर्वसमावेशकसुध्दा असत नाही. अमर्त्य सेन यांच्या मते, दारिद्रयात घट घडवून आणण्यासाठी सर्वसमावेशक वृध्दीची आवश्यकता आहे. यासाठी विकासाचा पाया विस्तृत व मजबूत असला पाहिजे. कृषी क्षेत्र व बिगर कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांच्या उत्पन्नामधील विषमता कमी करणे हे सर्वसमावेशक वृध्दीचे उद्दिष्ट असले पाहिजे. समाजातील सर्व प्रकारच्या उत्पन्न घटकातील लोकांचा उत्पादनातील सहभाग, विकास व वितरणातील समानता महत्वाची असते. अर्थात एका बाजूने विचार करता सर्व गटातील लोकांचे संघटन आणि दुसऱ्या बाजूने विचार करता सर्वांसाठी त्याचे फायदे असे घडून आल्यासच सर्वसमावेशक वृध्दीचे उद्दिष्ट साध्य होईल. उत्पन्नाचे प्रत्यक्षात वितरण करण्यापेक्षा उत्पादक रोजगार निर्माणाची आवश्यकता आहे. असे घडून आल्यास विकासापासून वंचित असणाऱ्या लोकांच्या उत्पन्नात वाढ घडून येईल. श्रमशक्तीचा विकास प्रक्रियेतील सहभाग हा सर्वसमावेशक वृध्दीचा कार्यक्षम मार्ग असतो. जलद आर्थिक विकास ही सामाजिक कल्याणाची आवश्यक पूर्वअट असली तरी ती पुरेशी नाही. सर्वसमावेशक वृध्दीशिवाय व्यापक जनहित साध्य करणे ही बाब केवळ कठीणच नव्हे तर अशक्य आहे.

सर्वसमावेशक कामगिरी/ निष्पादन (Performance on Inclusiveness):- विकास संदर्भात सर्वसमावेशक कामगिरीचे मूल्यांकन करणे अत्यंत कठीण काम आहे. कारण सर्वसमावेशक वृध्दी ही एक बहुआयामी संकल्पना आहे आणि या प्रगतीच्या अनेक बाजूच्या मूल्यांकनाची आवश्यकता आहे. ii) सर्वसमावेशक वृध्दीच्या विविध बाजूंशी संबंधित आकडेवारी उपलब्ध होण्यास दीर्घ कालावधी लागतो. iii) सर्वसमावेशक लक्ष्यांना सामोरे ठेऊन आखण्यात आलेल्या धोरणांचा प्रभाव हा केवळ दीर्घ कालावधीनंतरच दिसून येतो. अर्थात धोरणे योग्य दिशेने असली तरीदेखील त्यांचे परिणाम बऱ्याच कालावधीनंतरच सामोरे येतात. उदा. गरिबांसाठी शैक्षणिक सुधारणा संबंधातील उपाय अवलंबिल्यास असे गृहीत धरण्यात येते की, भविष्यात याद्वारे गरिबांच्या मिळकत (उत्पन्न) क्षमतेत सुधारणा घडून येईल. परंतु अधिक उत्पन्न मिळकत स्वरूपात याचा परिणाम दीर्घ कालावधीनंतरच दिसून येतो. डॉ. मनमोहन सिंग यांच्या मते,विकासाचे लाभ सर्व घटकांपर्यंत पोहोचू शकले नाही तर असा विकास अपुराच म्हणता येईल. त्यामुळे ही विकास प्रक्रिया अधिक सर्वसमावेशक, दारिद्रय निर्मुलनाच्या दृष्टीने गरिबांच्या उत्पन्नात वाढ आणि उत्तम रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करणारी असली पाहिजे. तसेच सर्व घटकांपर्यंत शिक्षण आणि आरोग्याच्या संधी पोहोचल्या पाहिजेत. या सर्व बाजूंवर सर्वसमावेशकता प्राप्त करण्यासाठी अनेकविध उपायांची आवश्यकता आहे. यश हे केवळ नवीन धोरणांची आखणी व अंमलबजावणी केल्याने प्राप्त होऊ शकत नाही तर ते संस्थात्मक आणि अभिवृत्तीमुलक (Institutaional and Attitudinal) बदलांवर देखील अवलंबून असते. यासाठी बराच कालावधी जावा लागतो.

सर्वसमावेशक वृध्दीचे बहुआयामी पैलू (Multidimensionality Inclusion):- संसुगत पैलूंना सूचिबध्द करणे हे अशा प्रकारच्या वृध्दीचे उत्तम उदाहरण आहे. लोकसंख्येमधील जास्तीत जास्त हिस्सा हा दारिद्रय रेषेच्या वरती असणे हा प्रगतीचा सर्वात योग्य निदर्शक आहे. परंतु अनेक कुटूंबे ही प्रतिव्यक्ति उपभोग या अर्थाने दारिद्रय रेषेच्या वरती आहेत मात्र त्यांना शिक्षण, आरोग्य स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छता यासारख्या मूलभूत सोयी-सुविधा देखील उपलब्ध होऊ शकल्या नाहीत. सर्वसमावेशक वृध्दीत आवश्यक मूलभूत सोयी-सुविधांच्या प्राप्तीचा देखील समावेश करण्यात आला आहे. नेहमीच असा तर्क वर्तविण्यात आला आहे की, जोपर्यंत गरिबांना विकासापासूनचे लाभ मिळत आहेत तोपर्यंत विषमतेस काहीच अर्थ असत नाही. परंतु हे देखील खरे असू शकते की, गरिबांच्या उत्पन्नामध्ये

जलदगतीने वृध्दी घडून येत असतांनाच काही लोक हे विषमतेमध्ये देखील वृध्दीचा विचार मान्य करू शकतात. मात्र जर विषमतेमध्ये अधिक वृध्दी घडून आली आणि गरिबांच्या जीवनमानाच्या स्तरात किंचितच सुधारणा घडून आली तर मात्र ही बाब मान्य केली जाऊ शकत नाही. या संदर्भात विषमता ही केवळ उत्पन्नाचे वितरण किंवा व्यक्तिंद्वारे उपलब्ध साधनसामग्रीच्या उपभोगापर्यंतच मर्यादित नाही, तर एका राज्यातून दुसऱ्या राज्यात आणि काही बाबतीत तर एका क्षेत्रातून दुसऱ्या क्षेत्रादरम्यान देखील राज्यांतर्गत असमानता दिसून येत आहे. भारतासंदर्भात सर्वसमावेशक वृध्दीच्या बाबतीत विचार करता, समाजातील काही समूह हे विशेष लक्ष देण्यास पात्र आहेत. हे समूह बहुतांशत: उत्पन्न वितरणाच्या निम्न स्तरावरील आहेत. अंतिमत: असा विचार केला जाऊ शकतो की, दारिद्रय निर्मुलन किंवा विषमता दूर करण्याचा हाच मार्ग आहे. परंतु जर सर्वसमावेशक वृध्दीच्या व्याख्येकडे ध्यान दिले आणि या समूहांना उर्वरित लोकसंख्येप्रमाणेच समान पातळीवर आणण्याचा विचार असेल तर हा मुद्दा ध्यानात घेण्याची आवश्यकता आहे आणि एकूण उत्पन्न वितरणात या समूहांचे देखील प्रतिनिधीत्व असले पाहिजे. बाराव्या पंचवार्षिक योजनेत जलद, शाश्वत आणि अधिक सर्वसमावेशक वृध्दीचे प्रतिबिंब म्हणून पुढील पंचवीस मुख्य निर्देशक स्वीकारण्यात आले आहेत. आर्थिक विकास :- १) वास्तव स्थूल देशांतर्गत उत्पादनात (GDP) ८% दराने वृध्दी घडवून आणणे. २) ४% दराने कृषी क्षेत्राची वृध्दी ३) १०% दराने विनिर्माण क्षेत्राची वृध्दी ४) प्रत्येक राज्याद्वारे अकराव्या योजनेच्या तुलनेत बाराव्या योजना कालावधी दरम्यान अधिमानत: उच्च सरासरी वृध्दी दर साध्य केला पाहिजे. दारिद्रय आणि रोजगार :- ५) योजनेच्या अखेरपर्यंत पूर्ववर्ती अंदाजाच्या तुलनेत दरडोई उपभोग दारिद्रय दरात १०% अंकाने घट ६) योजना कालावधीत बिगर कृषी क्षेत्रात ५० मिलियन नवीन कार्यसंधींची निर्मिती आणि याच प्रमाणात कौशल्य प्रमाणपत्र (Skill Certification) उपलब्ध करून देणे हे शिक्षण होय.:- ७) योजनेच्या अखेरपर्यंत शालेय शिक्षणाचे नोंदणी वय वाढवून सात वर्ष करणे. ८) अर्थव्यवस्थेत कौशल्य आवश्यकतेस अनुसरून प्रत्येक तुकडीसाठी दोन दशलक्ष अतिरिक्त जागा निर्माण करून उच्च शिक्षणापर्यंत पोहोच वृध्दींगत करणे. ९) शालेय नोंदणीमधील लैंगिक (उाह्) व सामाजिक दरीस(मुला-मुलींदरम्यान आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, मुस्लीम आणि उर्वरित लोकसंख्येदरम्यान) योजनेच्या अखेरपर्यंत दूर करणे. आरोग्य :- १०) योजनेच्या अखेरपर्यंत नवजात शिशु मृत्यू दरात (IMR) घट २५ पर्यंत आणि माता मृत्यू दर (MMR) प्रति १००० जिवित प्रसुतीत १ पर्यंत घट व बालक लिंग गुणोत्तरात (०-६ वर्ष) (Child Sex Ratio) सुधारणा ९५० पर्यंत घडवून आणणे. ११) योजनेच्या अखेरपर्यंत एकूण प्रजनन दरात घट घडवून आणून २१ करणे १२) ०-३ वयापर्यंतच्या बालकांमधील अल्पपोषणात (Undernutrition) घट घडवून NFHS-३ स्तराच्या निम्यावर आणणे. ग्रामीण आधारभूत सुविधांसहित आधारभूत सोयी-सुविधा :- १३) पायाभूत सुविधांमधील गुंतवणूकीमध्ये वाढ करून स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या ९% वर आणणे. १४) स्थूल सिंचित क्षेत्रात ९० मिलियन हेक्टर वरून १०३ मिलियन हेक्टरपर्यंत वाढ घडवून आणणे १५) सर्व गावांना वीज उपलब्ध करून देणे आणि AT & C नुकसानीत घट करून २०% वर आणणे १६) सर्व गावांना बारमाही (all-weather) रस्त्यांना जोडणे १७) राष्ट्रीय व राज्य महामार्गांचा दर्जा किमान द्रुपद्रीवर (Minimum Two-Lane) आणणे. १८) पूर्वोत्तर व पश्चिमी सर्मपित मालवाहतूक जोडमार्गांना पूर्ण करणे. १९) ग्रामीण प्रसारणास (Tele-Density) ७०% पर्यंत वृध्दींगत करणे. २०) ग्रामीण लोकसंख्येमधील ५०% ना नळाद्वारे ४० एलपीसीडी (Lped piped drinking water supply) पिण्याच्या पाण्याचा सुलभ पुरवठा आणि ५०% ग्रामपंचायतींना निर्मल ग्रामचा दर्जा (Nirmal Gram Status) प्राप्त करून देणे. पर्यावरण आणि शाश्वतता :- २१) हरित आच्छादन क्षेत्रात (as measured by satellite imagery) प्रतिवर्षी एक मिलियन हेक्टर्सची वृध्दी साध्य करणे. २२) नुतनीकरण/नवीकरणीय ऊर्जा क्षमतेत ३०,००० मेगावॅटची वृध्दी २३) GDP च्या उत्सर्जन तीव्रतेस सन २०२० पर्यंत २००५ मधील स्तराच्या तुलनेत २० ते २५% घटविण्याचे लक्ष्य सेवांची पोहोच (Service Delivery) :- २४) ९०% भारतीय कुटूंबापर्यंत अधिकोष सेवा पोहोचविणे २५) बँक खात्याशी जोडण्यात आलेल्या आधार व्यासपीठाचा (Aadhar Platform) उपयोग करून मुख्य अनुदाने व कल्याणासंबंधी लाभार्थी रक्कमेचे थेट

रोख हस्तांतरण (Direct Cash Transfer- DCT) करणे. या सर्व लक्ष्यांवर (Targets) GDP वृध्दीची समीक्षा करते वेळी ध्यान देण्याची आवश्यकता आहे. तसेच कृषीमधील वृध्दी, दारिद्र्यात घट आणि रोजगार संधीमधील वृध्दी इत्यादी समावेशन पैलूंवर लक्ष दिले पाहिजे. डॉ. मॉन्टेक सिंग अहलुवालिया यांच्या मते, या बहु-आयामतेचा एक परिणाम असा आहे की, विविध आयामांमध्ये जी प्रगती घडून येत आहे. ती वेगवेगळी असू शकते. उदा. अशी देखील शक्यता असू शकते की, दारिद्र्यात घट घडून आली असता विषमता वाढते. अशा प्रकारे देशातील अनेक कुटूंबांमधील एकूणच विषमता घटू शकते किंवा अपरिवर्तीत राहू शकते. याऊलट राज्यांदरम्यान विषमतेत वृध्दी घडून येऊ शकते. सर्वसमावेशक प्रगतीचे जर समग्र मूल्यांकन करावयाचे झाल्यास याचा आधार हा या सर्व प्रकारच्या विकास कार्याशी संमिश्र दृष्टीने बनविण्याची आवश्यकता आहे. दारिद्र्य आणि आवश्यक सेवांपर्यंत पोहोच यामधील त्रुटी हया दोन्ही गंभीर समस्या बनल्या आहेत. परंतु सकारात्मक दृष्टीने पाहता अनेक क्षेत्रांमध्ये सुधारणा घडून आली आहे. डॉ. अहलुवालिया यांच्या मते, सर्वसमावेशक वृध्दीमधील प्रगती मंद राहिली आहे. त्वरीत वृध्दी दिसून येत आहे. या विरोधाभासामुळे सामान्य धारणा अशी बनली आहे की, त्वरीत वृध्दीमुळे उत्पन्न आणि संपत्तीचे उच्च वर्गातील लोकांकडे केंद्रिकरण घडून आले आहे. संपत्ती केंद्रिकरणाची ही प्रवृत्ती आणखीनच वाढीस लागली आहे. सर्वसमावेशक वृध्दीत आर्थिक विकास प्रक्रियेत होणाऱ्या उत्पन्नाच्या विषमतेसह सामाजिक वंचिततेला महत्व असते. डॉ. अहलुवालिया यांच्या मते, विकास साधतांना विकासापासून निर्मित लाभ वेगवेगळया परिस्थितीत राहणाऱ्या लोकांना मोठया प्रमाणात मिळाले पाहिजेत. प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ अभिजित सेन यांच्या मते, कृषी आणि बिगर-कृषी क्षेत्रातील प्रतिव्यक्ति उत्पन्नामधील तफावत न रूंदावणे ही सर्वसमावेशक वृध्दीची आवश्यक अट आहे. जागतिक बँकेने सर्वसमावेशक वृध्दी कल्पनेचा अधिक विस्तार करण्याचा प्रयत्न केला आहे. जागतिक बँकेच्या २००६ मधील अहवालानुसार, जात, धर्म, पंथ, लिंग, श्रीमंत-गरिब अशा प्रकारचा कोणताही भेदभाव न करता मनुष्य हा घटक विचारात घेऊन आर्थिक वृध्दीची प्रादेशिक व्याप्ती वाढविणे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या (UNDP) २००८ मधील अहवालात सर्वसमावेशक वृध्दीसंकल्पनेत उत्पादन व उत्पन्नावर जोर देण्यात आला आहे. समाजामधील व्यापक घटक सामाजिक भेदभावांना सामोरे जात असतील तर तुम्ही आर्थिक सर्वसमावेशक प्राप्त करू शकत नाही. सर्वसमावेशकतेत शासन आणि समाजातील शक्तीस्थळांची, समाजातील तळागाळातील समूहांचे सक्षमीकरण घडून येईल आणि त्यांच्यातील नाते समानतेच्या तत्तावर आधारित बनेल अशा प्रकारे फेररचना करणे अभिप्रेत आहे.

**दारिद्रय आणि सर्वसमावेशक वृध्दी :-**

दारिद्र्यात घट घडवून आणणे हा आपल्या सर्वसमावेशक वृध्दीचा एक प्रमुख घटक आहे. यासंदर्भात काही प्रगती देखील घडून आली आहे. मागील अधिकारिक दारिद्र्यासंदर्भातील अंदाजानुसार दारिद्रय रेषेखाली असलेल्या लोकसंख्येच्या प्रमाणात सन १९९३-९४ ते २००४-०५ या दरम्यान ८.५% अंकांपर्यंत घट घडून आली आहे. परंतु दारिद्रय रेषेच्या उपयुक्ततेबद्दल काही क्षेत्रांत शंका व्यक्त करण्यात आल्याने सरकारने मा. सुरेश तेंडुलकर यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेषतज्ञ समिती नियुक्त केली. या समितीने ग्रामीण दारिद्रय रेषेच्या पुनर्निर्धारणाची शिफारस केली, जेणेकरून त्यास शहरी दारिद्रय रेषेबरोबर अधिक तुलनात्मक बनविले जाऊ शकेल व दारिद्रय रेषा अधिक उपयुक्त ठरेल. तेंडुलकर समितीची दारिद्रय रेषा लागू केल्याने ग्रामीण दारिद्र्याचा आणि यामुळे समग्र दारिद्र्याचा देखील एक उच्च अंदाज प्राप्त होऊ शकतो. परंतु जर नवीन पध्दतीस मागील वर्षांवर लागू करण्यात आले तर यावरून स्पष्ट झाले आहे की, दारिद्र्यातील लोकसंख्येचे प्रमाण सन १९९३-९४ मध्ये ४५% होते ते २००४-०५ मध्ये घटून ३७% झाले आहे. अशाप्रकारे अकराव्या योजनेपासून पहिल्या वर्षात प्रतिवर्ष स्थूलमानाने ०.८% ची घट घडून आली. अकराव्या पंचवार्षिक योजनेत २% प्रतिवर्ष दराने घट घडवून आणण्याचे अधिक महत्वाकांक्षी लक्ष्य ठेवण्यात आले होते. सन २००९-१० च्या संबंधात नवीन NSSO पाहणीच्या अवलंब करता प्रारंभिक अंदाजावरून असे स्पष्ट झाले आहे की, दारिद्र्यांतर्गत लोकसंख्येचे प्रमाण हे यापूर्वीच्या तुलनेत अधिक जलदगतीने घटले आहे. सन २००४-०५ ते २००९-१० नंतर एक वर्ष दुष्काळाचे होते व या वर्षी दारिद्र्यात अस्थायी स्वरूपात वृध्दी घडून आली. दारिद्रय घटीचा अंतरर्निहित दर

हा संभवत: १% प्रतिवर्ष पेक्षा अधिक राहिला आहे. अंदाज असा आहे की, दारिद्रय घटीच्या वेगात तीव्रता आली आहे. तथापि भविष्याकडे पाहता भारत १९९० व २०१५ च्या दरम्यान दारिद्रयातील ५०% घट सहस्त्रकातील विकास लक्ष्यांना (Millennium Development Goal) प्राप्त करण्याच्या दिशेने सज्ज होऊ लागला आहे.

सर्वसमावेशकता मात्रेची पडताळणी करण्यासाठी एक महत्वाचे प्राचल (Parameter) हे पाहावयाचे आहे की, ग्रामीण क्षेत्रात गरिबांची मोठी संख्या प्रमुख स्वरूपात भूमिहीन श्रमिकांची असल्याने आणि त्यामधील बहुतांश अद्यापही आपल्या उपजिविकेसाठी कृषी क्षेत्रावर अवलंबून आहेत. सन २००७ ते २०१० (Claendar Year) या दरम्यान सरासरी वेतन दरामध्ये अखिल भारतीय स्तरावर १६% ची वृध्दी घडून आली आहे. आंध्र प्रदेश (४२%) व ओरिसामध्ये (३३%) ही वृध्दी अधिक होती. बिहार आणि उत्तर प्रदेश यासारख्या राज्यात या वर्षांदरम्यान वास्तविक कृषी वेतन क्रमश: १९ व २०% वाढले. जागतिक बँकेद्वारे १० एप्रिल २०१४ रोजी सादर करण्यात आलेल्या "सर्वांसाठी समृध्दी" (Prosperity for All) या अहवालानुसार जगातील १/३ गरिब लोकसंख्या भारतामध्ये राहत आहे. राष्ट्रसंघाच्या "इंडिया ऍण्ड द मिलेनियम डेव्हलपमेंट गोल: कम्प्लीटिंग द टास्क" अहवालानुसार भारतातील सुमारे ३० कोटी जनता ही अद्यापही आत्यंतिक दारिद्रयात जीवन जगत आहे. सुरेश तेंडुलकर समितीने ग्रामीण भागातील गरिबी निश्चित करण्यासाठी ८१६ रूपये तर शहरी भागात १००० रूपये इतके दरडोई मासिक उत्पन्न गृहीत धरले तर रंगराजन समितीने हे आकडे अनुक्रमे ९७२ व १४०७ रूपये असे गृहीत धरले आहेत. रंगराजन अहवालामुळे एकदम १० कोटी भारतीय दारिद्रय रेषेखाली सरकले आहेत त्यामुळे हा आकडा ३६ कोटी ३० लाखावर पोहोचला आहे अर्थात एक तृतीयांश (१/३) भारत दरमहा तुटपुंजे उत्पन्न देखील मिळवू शकत नाही. जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणे निधीद्वारे निर्धारित करण्यात आलेल्या सहस्त्रकातील विकास लक्ष्यांवरील प्रगती अहवालानुसार २०११ मध्ये जगातील सुमारे १/३ गरिब हे भारतात राहत होते. जागतिक मॉनिटरिंग अहवाल २०१४-१५ नुसार २०११ मध्ये जगभरात सुमारे १०१ कोटी गरिब व्यक्ति राहत होत्या. यामधील सुमारे ३०% व्यक्ति हया भारतामधील आहेत. २०११ मध्ये भारताची एकूण लोकसंख्या १२१ कोटी होती. जागतिक बँकेच्या अंदाजानुसार २०११ मध्ये भारतामधील एकूण लोकसंख्येतील सुमारे २४.७% लोक हे गरिब होते. जागतिक बँकेने प्रतिदिन १.२५ डॉलर पेक्षा कमी खर्च असणाऱ्या व्यक्तिंचा दारिद्रय श्रेणीत समावेश केला आहे. जागतिक बँकेच्या २०१० मधील अहवालानुसार भारतामधील सुमारे ३२.८% लोकसंख्या ही दारिद्रय रेषेखाली होती. अहवालातील आकडेवारीनुसार एका वर्षाच्या कालावधीत भारतामधील दारिद्रयात सुमारे ८% ने घट घडून आली आहे. बँकेच्या आकडेवारीनुसार २००८ मध्ये सुमारे ४१.६४% भारतीय गरिब होते. अर्थात तीन वर्षांदरम्यान भारतीय दारिद्रयात १७% ने घट घडून आली आहे. जागतिक बँकेची ही आकडेवारी २००५ च्या तुलनेत लोकांच्या खरेदीशक्ती क्षमतेवर आधारित आहे. या बँकेने आपल्या अहवालात हे मान्य केले आहे की, जागतिक स्तरावर दारिद्रय निर्मुलनात सर्वाधिक लोकसंख्या असणाऱ्या चीन व भारताने महत्वपूर्ण अशी भूमिका निभावली आहे. सन २००८ ते २०११ या दरम्यान या दोन देशांतील सुमारे ३२.२ कोटी लोकसंख्या ही दारिद्रय रेषेच्या वरती आली आहे. या अहवालानुसार २०११ मध्ये जगातील ६०% गरिब लोकसंख्या ही केवळ पाच (बांगलादेश, चीन, कांगो, भारत आणि नायजेरिया) देशांमध्ये राहत होती. यामधील सुमारे ३०% गरिब भारतामध्ये होते. १०% नायजेरिया ८% चीन, ६% बांगलादेश आणि ५% कांगोमध्ये राहत होते. या अहवालानुसार २०११ मध्ये विकसनशील देशातील सुमारे १७% लोकसंख्या ही गरिब होती आणि अंदाज आहे की, २०३० पर्यंत ही आकडेवारी घटून ५.७% वर येईल. अहवालामध्ये युवकांसाठी रोजगार संधी वृध्दींगत करण्यासाठी कौशल्य विकास शिक्षणावर जोर देण्यात आला आहे. एका अध्ययनाचा दाखला देऊन स्पष्ट करण्यात आले आहे की, अनेक कॉलेज व विद्यापीठांचे पदवीधर हे चांगल्या प्रकारे प्रशिक्षित असत नाहीत यासाठी सॉफ्टवेअर, बँकिंग, फार्मा व रिटेल कंपन्या हया प्रशिक्षणाचा कार्यक्रम बनवत आहेत.

**ग्रामीण भारताचे भीषण वास्तव: सामाजिक- आर्थिक व जातीनिहाय जनगणना-२०११ :-**

जनगणना अहवाल २०११ द्वारे

ग्रामीण भारतामधील गावांची स्थिति अत्यंत दयनीय असल्याचे स्पष्ट संकेत मिळतात. ब्रिटीश राजवटीत १९३२ मध्ये करण्यात आलेल्या अशा प्रकारच्या पाहणीनंतर तब्बल ऐंशी वर्षांनी (आठ दशकांत) प्रथमत: इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा (डिजिटल) अवलंब करून तयार करण्यात आलेला हा एक महत्वपूर्ण असा दस्तऐवज आहे. संपूर्ण देशातील ६४० जिल्हयांत सन २०११ मध्ये सुरू करण्यात आलेली ही पाहणी अंतिम टप्प्यात पोहोचली असली तरी देखील महाराष्ट्रासह १७ राज्यांतील निष्कर्षांना अंतिम स्वरूप देणे अजूनही बाकी आहे. केंद्रिय ग्रामीण विकास मंत्रालयाच्या देखरेखी अंतर्गत करण्यात आलेल्या पाहणीची आकडेवारी ३ जुलै २०१५ रोजी सार्वजनिक करण्यात आली. भारत हा जलदगतीने शहरीकरणाकडे निघालेला देश असल्याचे गृहीत धरून विकास आराखडा निश्चित केला जात असतांनाच प्रत्यक्षात मात्र सुमारे ७०% पेक्षा देखील अधिक जनता ही ग्रामीण आणि या लोकसंख्येमधील निम्म्याहून अधिक लोक हे उदरनिर्वाहासाठी शेतमजूरी आणि रोजंदारीवर अवलंबून असल्याचे या अहवालावरून स्पष्ट झाले आहे. या अहवालामधील निष्कर्ष हे शेती क्षेत्रावर अवलंबित असणारी लोकसंख्या घटणे, रोजगारीच्या कृषीबाहय पर्यायी स्त्रोतांत वृध्दी घडवून आणणे, प्रागतिक जीवन शैलीच्या शहरांची संख्या वाढविणे हया विकास आराखडयाची अंमजबजावणी अद्यापही किती बाकी आहे याकडे अंगुली निर्देश करीत आहेत. या अहवालातील प्रमुख महत्वाचे मुद्दे पुढील प्रमाणे आहेत १) देशातील कुटूंबांची एकूण संख्या ही २९.३९ कोटी असून यामधील १७.९१ कोटी कुटूंबेही गावांमध्ये राहत आहेत. २) खेडयात राहणाऱ्या एकूण कुटूंबांपैकी १०.६९ कोटी कुटूंबे ही वंचित गटात आहेत. ३) वंचित असल्याची नोंद न केलेल्या कुटूंबांची संख्या दोन कोटी आहे. ४) ग्रामीण क्षेत्रातील ५.३७ कोटी (२९.९७%) कुटूंबे ही भूमिहिन असून त्यांचे उदरनिर्वाहाचे साधन हे मेहनत -मजदूरी आहे. ५) गांवातील २.३७ कोटी (१३.२५%) कुटूंबे ही एका खोलीत, कच्च्या भिंती व छपराच्या घरात राहत आहेत. ६) ४.२१ कोटी (२३.५२%) कुटूंबातील २५ वर्षांवरील एकही प्रौढ साक्षर नाही. ही बाब ग्रामीण क्षेत्रातील शैक्षणिक मागासलेपणाचा/ दुरावस्थेचा स्पष्ट संकेत देते. ७) या जनगणनेत स्पष्ट करण्यात आले आहे की, खेडयांत राहणारी २१.५३% (३.८६ कोटी) कुटूंबे ही अनुसूचित जाती-जमाती या प्रवर्गातील आहेत. ८) ग्रामीण भागात एकंदर नोकरदार कुटूंबांचे प्रमाण केवळ १०% आहे. ९) शेतीवर अवलंबून असलेल्या ग्रामीण कुटूंबांची संख्या ५.३९ कोटी (एकूण लोकसंख्येच्या ३०.१%) इतकी आहे. १०) शेतमजूरी व रोजंदारीवर काम करणाऱ्या कुटूंबांचे प्रमाण सुमारे ५१.१४% (९.१६ कोटी) इतके आहे. ११) २.५ कोटी कुटूंबांचे (१४.०१%) उत्पन्न हे सरकारी नोकरी, खाजगी नोकरी किंवा सार्वजनिक कंपनीमधील नोकरीवर अवलंबून आहे. १२) केवळ ८.२९% कुटूंबांमध्येच अशा व्यक्ति आहेत की, ज्यांचे वेतन १०,००० रूपयांपेक्षा अधिक आहे. १३) गावांमध्ये १७.१८% कुटूंबे ही अशी आहेत की, ज्यांचे वेतन ५००० रूपये ते १०,००० रूपये या दरम्यान आहे. १४) ग्रामीण भागातील केवळ ४.१% कुटूंबाजवळ शेतकामास लागणारी साधन सामग्री आहे. तर ९.९% कुटूंबांकडे सिंचनाची कोणतीही सोय नाही हया कुटूंबांना सिंचनासाठी पावसावर अवलंबून राहावे लागत आहे. १५) सुमारे ६८.४% कुटूंबाजवळ मोबाइल दूरध्वनी आहे. अर्थात अनेकांच्या पोटाचा (रोजीरोटीचा) प्रश्न गंभीर आहे परंतु हातात मात्र मोबाइल आहे. तर दूरसंचार संपर्काचे साधन नसलेल्या कुटूंबांचे प्रमाण २७.९% इतके आहे. १६) अवघ्या ३.६% कुटूंबांनीच किसान क्रेडिट कार्ड घेतले आहे. १७) ग्रामीण क्षेत्रातील कुटूंबांपैकी केवळ १०% घरांमध्ये वेतनाचे उत्पन्न येत असून त्यामधील ४.६% कुटूंबांतील लोक प्राप्तीकर भरतात. १८) प्राप्तीकर भरणाऱ्या SC चे प्रमाण ३.४९% आहे तर ST प्रवर्गातील प्राप्तीकर भरणाऱ्यांचे प्रमाण ३.३४% आहे. १९) सरकारी कर्मचारी असणारी कुटूंबे ५% २०) खाजगी नोकरीत असणाऱ्या कुटूंबांची संख्या ३.५% २१) सार्वजनिक क्षेत्रात काम करणाऱ्या कुटूंबांची संख्या १.११% २२) स्वयंचलित वाहन असलेली कुटूंबे २०.६९% (दुचाकीवर अवलंबून असणारे) २३) २.५% कुटूंबांकडे चारचाकी मोटार आहेत. २४) ग्रामीण भागात अपंग व्यक्ति प्रमुख असलेली ७.१६ लाख कुटूंबे. २५) देशात अशी काही राज्ये आहेत की, जेथे अनुसूचित जाती समूहात सन २०११ मध्ये अल्प वयातच (वयवर्ष १५ पेक्षा कमी) मुलींचे देखील लग्न झाले आहे देशात अद्यापही मुलींचे अल्प वयातच लग्न करण्याची

प्रथा आहे. याबाबतीत बिहार राज्य सर्वात पुढे आहे. बिहारमध्ये सन २०११ मध्ये वयवर्ष १५ पेक्षा कमी वय असणाऱ्या ३०,००० पेक्षा अधिक मुलींचे लग्न करण्यात आले आहे. यानंतर राजस्थानचा क्रम लागतो. राजस्थानमध्ये वयवर्ष १५ पेक्षा कमी असणाऱ्या २८,६४४ मुलींचे, पश्चिम बंगालमध्ये २६८९४ आणि मध्यप्रदेशात १८९२३ मुलींचे लग्न करण्यात आले आहे. पंजाबमधील ११,८४५ मुलींचे अल्पवयात लग्न करण्यात आले आहे तर हरियाणामध्ये सुमारे ६८२२ मुलींचे लग्न झाले आहे. गुजरामध्ये देखील अशाप्रकारे ६४४१ लग्ने झाली आहेत. बाल विवाह निषेध अधिनियम -२००६ मध्ये वयवर्ष १८ पेक्षा कमी वयाची मुलगी आणि वयवर्ष २१ पेक्षा कमी वयाच्या मुलाचे लग्न करण्यास दंडात्मक कारवाईची तरतूद करण्यात आली आहे. या अहवालामधील केवळ सामाजिक -आर्थिक आकडेवारी जाहीर करण्यात आली आहे. सरकारने जातिनिहाय आकडेवारी जाहीर करण्याचे टाळले आहे.

या अहवालानुसार ग्रामीण गावांत राहाणाऱ्या प्रत्येकी तीन कुटूंबांतील एक कुटूंब हे भूमिहिन असून त्याच्याकडे उदरनिर्वाहासाठी शारीरिक श्रमाशिवाय दुसरा पर्याय उपलब्ध नाही. रंगराजन समितीनुसार ३०.९% ग्रामीण जनता ही गरिब आहे तर याअगोदर तेंडुलकर समितीने हेच प्रमाण २५.७% असल्याचे निश्चित केले होते. हे दोन्ही निष्कर्ष आता कालबाहय असल्याचे या अहवालावरून स्पष्ट होते. या अहवालानुसार दारिद्रय रेषेखालील लोकांचे प्रमाण ४८.५२% इतके आहे. दारिद्रय रेषेखालील लोकसंख्या ७५% असल्याचे गृहीत धरून अन्नसुरक्षा विधेयकाची मांडणी करण्यात आली परंतु या पाहणीने (जनगणना- २०११) ही टक्केवारी चुकीची असल्याचे ठरते, अर्थात आधि वाटत होते त्यापेक्षा अधिक गरिब ग्रामीण भागात आहेत परंतु आधि वाटत होते त्यापेक्षा कमी व्यक्तिंना अन्न सुरक्षेची गरज आहे असा विचित्र तिढा निर्माण झाला आहे. या अहवालाने आर्थिक सुधारणांची मर्यादा देखील उघड केली आहे. या अहवालानुसार वंचितांमध्ये SC व ST प्रवर्गातील कुटूंबांचा हिस्सा सर्वाधिक आहे. या मधील सुमारे ५६% कुटूंबांजवळ कोणत्याही प्रकारची भूमि नाही आणि हे त्यांच्या उदरनिर्वाह स्त्रोतांत स्पष्ट स्वरूपात झळकत आहे. या कुटूंबातील निम्म्या कुटूंबांच्या उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत हे असंघटित वेतन आहे आणि त्यांना नियमितपणे वेतनाचे काम देखील उपलब्ध होत नाही. यावरून असा निष्कर्ष निघतो की, प्रत्येक स्तरावरील सरकारने त्यांच्यासाठी आपल्या कामाच्या जागांमध्ये कपात केली आहे. केंद्राद्वारे प्रायोजित योजना आणि कल्याणासाठी वरील पातळीवरून करण्यात येणाऱ्या प्रयत्नांपासून मोहभंगाच्या सामान्य धारणेस या जनगणनेने आणखीनच मजबूती मिळाली आहे.

**सर्वसमावेशकतेसाठी योजना कार्यक्रम** -(Plan Programmes for Inclusiveness) :- अकराव्या योजनेत अनेक कार्यक्रमांना विशेष प्रोत्साहन देण्यात आले आहे. यामागील हेतू हा ग्रामीण व शहरी आधारभूत सोयी-सुविधा निर्माण करणे आणि मूलभूत सेवा उपलब्ध करून देण्याचा होता. जेणेकरून सर्वसमावेशकतेत वाढ आणि दारिद्रयात घट घडून येईल. यामधील काही कार्यक्रम हे नवीन होते तर अन्य विद्यमान कार्यक्रमांना अधिक सुदृढ केले जाणार होते. तेरा अशा अग्रणी कार्यक्रमांची (Flagship Programmes) यादी पुढील पत्रकात दर्शविली आहे.

पत्रक क्रमांक-१, अग्रणी विकास कार्यक्रम (एकक : को.रू.)

| | वर्ष २००७-०८ ते २०११-१२ | | | |
|---|---|---|---|---|
| कार्यक्रम | मंत्रालय/विभाग | वास्तविक खर्च | अंदाजपत्रकीय अंदाज | एकूण अकरावी योजना |
| १) मनरेगा (MGNREGA) | ग्रामीण विकास | १२६६१ | ४०००० | १५६३०१ |
| २) इंदिरा आवास योजना (IAY) | ग्रामीण विकास | ३८८६ | १०००० | ४१४८६ |
| ३) राष्ट्रीय सामाजिक सहाय्यता कार्यक्रम (NSAP) | ग्रामीण विकास | ३१०४ | ६१५८ | २३५३६ |
| ४) प्रधानमंत्री ग्राम सडक योजना (PMGSY) | ग्रामीण विकास | ६५०० | २०००० | ६५००२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन | आरोग्य आणि कुटूंब कल्याण | १०५०९ | १८११५ | ६९२१४ |
| ६) एकात्मिक बाल विकास सेवा योजना (ICDS) | महिला आणि बाल विकास | ५१९३ | १०००० | ३८९८० |
| ७) मध्यान्ह भोजन योजना (MDM) | शालेय शिक्षण आणि साक्षरता | ५८३२ | १०३८० | ३८६०२ |
| ८) सर्वशिक्षा अभियान (SSA) | शालेय शिक्षण आणि साक्षरता | ११४७७ | २१००० | ७७५७६ |
| ९) जेएनएनयूआरएम (JNNURM) | शहरी विकास | ५५०८ | १३७०० | ४८४८५ |
| १०) त्वरित सिंचन लाभ कार्यक्रम (AIBP) व अन्य जल संसाधन कार्यक्रम | जलसंसाधन | ५४४६ | १२६५० | ४६६२२ |
| ११) राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजना | विद्युत | ३९१३ | ६००० | २५९१३ |
| १२) राजीव गांधी पिण्याचे पाणी अभियान NRDWP आणि समग्र स्वच्छता अभियान | पिण्याचे पाणी पुरवठा | ७३२ | ११००० | ४६७२२ |
| १३) राष्ट्रीय कृषी विकास योजना | कृषी व सहकार | १२०० | ७८११ | १८५५० |
| एकूण | | ८१,२१७ | १,८६,५३९ | ६,९१,९७६ |

स्त्रोत : वेगान शाश्वत आणि अधिक समावेशक वृद्धी, १२व्या पंचवार्षिक योजनेचा भाग (ऑगस्ट)११), योजना आयोग, भारत सरकार, नवी दिली पेज क्र. ७.८

यामधील बहुतांश कार्यक्रम हे केंद्र प्रायोजित योजना आहेत की, ज्यांची राज्य सरकार एजन्सीजद्वारे अंमजबलावणी केली जात आहे. परंतु ज्यांचे बहुतांश वित्तपोषण हे एक निश्चित राज्य सरकारच्या हिस्स्याबरोबरच केंद्र सरकारद्वारे केले जात आहे. केंद्र सरकारद्वारे सन २०११-१२ (अंदाजपत्रकीय अनुमान) मध्ये या कार्यक्रमांवर एकूण १,८८,५७३ कोटी रूपये खर्च करण्यात आले आणि अकराव्या योजना कालावधी दरम्यान एकूण खर्च हा ७,००,००० कोटी रूपयांची आहे. असे अपेक्षित आहे की, या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीची प्रभावशीलता ही प्रत्येक राज्यात वेगवेगळी आहे. अभ्यास आणि प्रेस अहवालावरून प्राप्त निधींचा गैरवापर झाल्याचे उदाहरणावरून स्पष्ट झाले आहे आणि हा चिंतेचा योग्य स्त्रोत आहे.

सर्वसमावेशक वृध्दी संबंधातील अकराव्या योजनेतील कामगिरी (Eleventh Plan Achievements on Inclusive Growth) :- १) अकराव्या योजनेत (२००७-०८ ते २०११-१२) GDP वृध्दी दर ८% राहिला याच्या तुलनेत दहाव्या योजनेत (२००२-०३ ते २००६-०७) तो ७.६% आणि नवव्या योजनेत तो (१९९७-९८ ते २००१-०२) ५.७% होता. दोन वैश्विक संकटे आली असताना देखील अकराव्या योजनेत GDP वृध्दी दर हा ७.९% असल्याचे पाहावयास मिळाले. हा दर इतर कोणत्याही देशाच्या तुलनेत सर्वाधिक राहिला आहे. २) अकराव्या योजना कालावधीत कृषी GDP वृध्दी दरात गती येऊन तो ३.७% सरासरी दरापर्यंत पोहोचला. या तुलनेत दहाव्या योजनेत २.४% आणि नवव्या योजनेत तो २.५% होता. ३) दारिद्रय रेषेखालील लोकसंख्या प्रमाणात २००४-०५ ते २००९-१० या १.५ प्रतिशतांक (Percentage Points) प्रतिवर्ष दराने घट घडून आली. ही घट सन १९९३-९४ ते २००४-०५ या कालावधीच्या तुलनेत दुप्पट आहे. सन २०११-१२ साठी नवीन NSSO ची आकडेवारी उपलब्ध झाल्यानंतर हा घटीचा दर सुमारे २ प्रतिशतांक प्रतिवर्ष राहण्याची संभवनीयता आहे.४) सन २००४-०५ ते २०११-१२ पर्यंत ग्रामीण क्षेत्रात प्रतिव्यक्ति वास्तव उपभोग वृध्दी दर हा ३.४% प्रतिवर्ष राहिला की, जो सन १९९३-९४ ते २००४-०५ या कालावधीच्या तुलनेत चार पटीने अधिक आहे. ५) सन २००४-०५ मध्ये

बेरोजगारीचा दर ८.२% होतो तो घटून सन २००९-१० मध्ये ६.६% असा राहिला. या दराने मागील कालावधीतील प्रवृत्तीमध्ये बदल घडवून आणला. सन १९९३-९४ मध्ये बेरोजगारीचा दर ६.१% होता. तो वाढून सन २००४-०५ मध्ये ८.२% असा राहिला होता. ६) अकराव्या योजने दरम्यान ग्रामीण वास्तव वेतनात प्रतिवर्षी ६.८% ची वृध्दी घडून आली आहे. या तुलनेत मागील दशकात याची सरासरी १.१% प्रतिवर्ष होती आणि ही वृध्दी प्रामुख्याने सरकारी ग्रामीण धोरणे आणि पुढाकारामुळेच शक्य झाली आहे. ७) सन २००२-०४ आणि २००७-०८ या दरम्यान पूर्ण लसीकरणात २.१ प्रतिशतांक (ppt) प्रतिवर्ष दराने वृध्दी घडून आली. याऊलट सन १९९९-९८ आणि २००२-०४ या दरम्यान प्रतिवर्ष १.७ प्रतिशतांक ची घट घडून आली होती. अशा प्रकारे २००२-०४ आणि २००७-०८ या दरम्यान संस्थानिक प्रसुतीमध्ये १.६ प्रतिशतांकाची वृध्दी घडून आली जी सन १९९८-९९ आणि २००२-०४ या दरम्यानच्या १.३ प्रतिशतांक प्रतिवर्ष वृध्दीच्या तुलनेत अधिक आहे. ८) सन २००९-१० मध्ये प्राथमिक स्तरावर निव्वळ नाव नोंदणीचा दर वाढून ९८.३% अर्थात सुमारे सर्वव्यापकतेच्या जवळपास पोहोचला. शाळा सोडण्याच्या दरामध्ये (वर्ग – I -VIII ) सुधारणा घडून आली आहे. सन २००३-०४ आणि २००९-१० या दरम्यान शाळा सोडण्याच्या दरात १.७ प्रतिशतांक (ppt) प्रतिवर्ष घट घडून आली की, जी सन १९९८-९९ आणि २००३-०४ या दरम्यानच्या ०.८ प्रतिशतांक घटीच्या दुप्पट होती.

सर्वसमावेशक वृध्दीला प्रोत्साहन (Fostering Inclusive Growth) :- भारतीय विकास नियोजनाचे केंद्र हे असे कार्यक्रम आणि धोरणे तयार करण्याचे राहिले आहे की, ज्यांचे उद्दिष्ट हे समाजामधील सीमांत/समाजातील किनाऱ्यावरील वर्ग आणि गरिब वर्गास (Marginalized and Poor Section of Society) मुख्य प्रवाहास जोडण्याचे आहे. सरकारने सामाजिक आणि वित्तीय समावेशनासाठी अनेकविध कार्यक्रम आणि योजनांची अंमलबाजावणी केली आहे. लाभ वितरणाच्या हेतूने एका योग्य अशा मार्गाची आवश्यकता आहे की, जो वित्तीय सक्षमता उपलब्ध करून देईल व देखरेखीस सरळ व स्थानिक संस्थांना अधिक जबाबदार बनवेल. २८ ऑगस्ट २०१४ रोजी सुरू करण्यात आलेली प्रधानमंत्री जन-धन योजना (PMJDY) आणि रूपे कार्ड (RuPay Card) की, जे पेमेंटचे एक साधन आहे, या संबंधातील महत्वाची योजना आहे. या दोन्ही योजना सहाय्यक स्वरूपातील आहेत. हया योजना वित्तीय समावेशन, विमा प्रवेश आणि डिजिटाइजेशन (Digitalization) यासारख्या उद्देशांना पूर्ण करण्यास मदत करतील सरकारने अनुभवाच्या आधारे अस्तित्वातील अनेक वर्तमान कार्यक्रमांची पुनर्रचना व त्यांना सुव्यवस्थित केले आहे, जेणेकरून त्यांना आवश्यकता आधारित (Need Based) बनविले जाऊ शकेल. यामध्ये पुढील कार्यक्रमांचा समावेश आहे. A) शिक्षणाशी संबंधित योजना :- १) ब्रॉड ब्रँड सुविधा माध्यमातून शिक्षण २) पंडित मदन मोहन मालवीय राष्ट्रीय शिक्षक आणि शिक्षण अभियान ३) विशेष आवश्यकता असणाऱ्या व्यक्तिंसाठी उच्च शिक्षण (HEPSN) ४) उन्नत भारत अभियान ५) सर्व शिक्षा अभियान (SSA) ६) राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान (RMSA) ७) अध्यापक शिक्षण (TE) ८) साक्षर भारत/प्रौढ शिक्षण (SB/Adult Education) ९) अनुसूचित जाती/ जमातीच्या मुलांमध्ये शिक्षणास प्रोत्साहन देणाऱ्या योजना व इतर योजना १०) इतर मागासवर्गासाठी शैक्षणिक योजना B) रोजगार/ प्रशिक्षणाशी संबंधित :- १) दीनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना २) महात्मा गांधी नरेगा ३) राष्ट्रीय ग्रामीण उपजिविका/आजिविका अभियान (NRLM) ४) राष्ट्रीय शहरी आजिविका अभियान (NULM) ५) प्रशिक्षण आणि रोजगार कार्यक्रमास सहाय्यता (STEP) ६) अनुसूचित जाती उप-योजना विशेष केंद्रिय सहाय्यता (SCSP) C) वित्त, विमा आणि सामाजिक कल्याणाशी संबंधित :- १) प्रधानमंत्री जन-धन योजना (PMJDY) २) पत जोखिम हमी निधी (CRGF) ३) राजीव ऋण योजना (RRY) ४) आम आदमी विमा योजना (AABY) ५) राष्ट्रीय सामाजिक सहाय्यता कार्यक्रम (NSAP) ६) अनुसूचित जातींसाठी उद्यम भांडवल निधी ७) राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त आणि विकास महामंडळ (NSKFDC) व राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त आणि विकास महामंडळास (NSFDC) समभाग सहाय्यता योजना ८) राष्ट्रीय अनुसूचित जमाती वित्त आणि विकास महामंडळ (NSTFDC) ९) प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना १०) प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना ११) अटल पेन्शन योजना D) आरोग्याशी संबंधित :- १) ग्रामीण स्वच्छ भारत अभियान २) राष्ट्रीय आरोग्य मिशन

(NHM) ३) ग्रामीण पिण्याचे पाणी- राष्ट्रीय ग्रामीण पिण्याचे पाणी कार्यक्रम (NRDWP) ४) प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजना (PMSSY) ५) मानवी संसाधन, आधारभूत विकास/तृतीयन आरोग्य देखरेख उन्नती ६) नशाखोरी आणि द्रव्य (औषध) दुरूपयोग (नियंत्रण) सहाय्यता योजना. E) गृह/आधारभूत संबंधी :- १) इंदिरा आवास योजना (IAY) २) राजीव आवास योजना (RAY) ३) प्रधानमंत्री ग्राम सडक योजना (PMGSY) ४) जवाहरलाल नेहरू योजना राष्ट्रीय शहरी नुतनीकरण मिशन (JNNURM) इ) महिला आणि बालकांशी संबंधी :- १) बेटी बचाव बेटी पढाव कार्यक्रम (BBBP) २) नई रोशनी (Nai Roshni) ३) प्रजनन आणि बालकांचे आरोग्य (RCH) ४) मध्यान्ह भोजन योजना (MDM) ५) एकात्मिक बाल विकास सेवा योजना (ICDS) ६) एकात्मिक बाल संरक्षण योजना (ICPS) ७) राजीव गांधी किशोरी सक्षमीकरण योजना (Sabla) व राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त आणि विकास महामंडळास (NSFDC) समभाग सहाय्यता योजना ८) इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना (IGMSY) ९) काम करणाऱ्या मातांच्या बाळासाठी राजीव गांधी राष्ट्रीय स्क्रेच योजना १०) राज्य महिला सम्मान आणि जिल्हा महिला सम्मान. उ) वृध्द व्यक्तिंसाठी एकात्मिक कार्यक्रम योजना H) संसद आदर्श ग्राम योजना (SAGY) I) भारतीय विशिष्ट ओळख विकास प्राधिकरण (UIDAI) व) वनबंधु कल्याण योजना (VKY) ख) आपली अनामत ठेवा/ हमारी धरोहर (Hamari Dharohar) विविध सामाजिक आधारभूत सुविधा आणि मानवी विकास कार्यक्रमाचा समन्वय साधण्याच्या हेतूने सरकारने संसद आदर्श ग्राम योजना (SAGY) सुरू केली आहे. ही योजना वर्तमान सरकारी कार्यक्रमांची एककेंद्राभिमुखता/एकत्रिकरण आणि अंमलबजावणी माध्यमातून लागू केली जाणार आहे. या व्यतिरिक्त वन-बंधु कल्याण योजनेची अंमलबजावणी ही पाचव्या अनुसूचि क्षेत्रातील दहा राज्यांच्या एक-एक गटात केली जाणार आहे. सर्वसमावेशक वृध्दीला प्रोत्साहित करण्यासाठी कार्यान्वित बहुविध योजना पाहता पंचायती राजसंस्था आणि शहरी स्थानिक सरकारांची भूमिका महत्वाची बनली आहे.

समारोप :- सर्वसमावेशकतेच्या दृष्टीने प्रगतीचा अंदाज वर्तविणे हे अत्यंत कठीण काम आहे. लोकप्रतिनिधी, विविध पातळीवरील प्रशासकीय अधिकारी व कर्मचारीवर्ग हा विविध आर्थिक विकासाचे कार्यक्रम व योजनांची कितपत प्रामाणिकपणे आणि कार्यक्षमरित्या अंमलबजावणी करतो यावरच सर्वसमावेशक वृध्दीचे भवितव्य अवलंबून आहे. जेव्हा देशातील सर्व घटकांना राष्ट्रीय संपत्ती निर्माणाच्या प्रक्रियेशी उत्पादक स्वरूपात जोडले जाईल तेव्हाच सर्वसमावेशक वृध्दी साध्य होईल. सर्वसमावेशकतेसाठी देशातील सामान्य जनतेला (आम आदमी) जीवनाच्या आधारभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देऊन विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची आवश्यकता आहे. ग्रामीण अर्थकारणात अधिक भांडवल खेळते ठेवणे, ग्रामीण कुटूंबांच्या उत्पन्न स्त्रोतांत वाढ घडवून आणण्यासाठी त्या-त्या ठिकाणच्या उत्पादन प्रणालीचा, जैवभौगोलिक परिस्थितीचा, मानवी संसाधनांचा आणि समूह मानसिकतेचा योजना व कार्यक्रामाची आखणी आणि अंमलबजावणी करतांना विचार केला जावा. कृषी व्यवसाय सक्षम करण्यासाठी सरकारी व खाजगी गुंतवणूक मात्रा वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत जेणेकरून ग्रामीण क्षेत्राकडून रोजगारीच्या शोधात शहरांकडे घडून येणारे स्थलांतरण रोखण्यास मदत होईल. तसेच या क्षेत्रासमोरील हवामान परिवर्तनाचे आव्हान लक्षात घेऊन बियाणांच्या नवीन प्रजाती विकसित कराव्यात की ज्या प्रतिकूल परिस्थितीत देखील टिकून राहतील. समतोलित मुल्य धोरण, सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील सुधारणा आणि साठवणूक व्यवस्थेतील सुधारणांच्या माध्यमातून देखील आपण कृषी क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणू शकतो. सरकारच्या महत्वाकांक्षी शंभर स्मार्ट शहरे उभारणी कार्यक्रमांतर्गत उभारण्यात येणारी शहरे ही आपापल्या परीघातील ग्रामीण अर्थकारणास चालना देणारी केंद्र बनली पाहिजेत असे घडून आल्यास आर्थिक विकासामधील असमतोल सावरता येईल आणि याची वाढत्या सामाजिक समस्या सोडविण्यास मदत होईल. कृषीबाहय उत्पादन व रोजगाराचे स्त्रोत विकसित करण्याचे ध्येय सामोरे ठेऊन धोरणांची आखणी व अंमलबजावणी केली जावी. विविध राज्यांच्या क्षमतेत असणारी तफावत दूर करण्यासाठी साक्ष व क्षमतांचा परस्पर संबंध जोडण्याची गरज आहे. विकास हा अधिक मानवीय जीवनाकडे वाटचाल करणारा असला पाहिजे. योग्य उपजिविका संधी आणि

आर्थिक कल्याण व सामाजिक सुरक्षा योजनांना प्रोत्साहन देण्यासाठी सक्षम हस्तक्षेपाची आवश्यकता आहे. एकूणच ग्रामीण भारताचे अर्थवास्तव लक्षात घेता सर्वसमावेशकतेसाठी नियोजनाची दिशा व संकल्पना बदलण्याची आवश्यकता आहे.


References :

1) Twelfth Five Year Plan (2012-17), (English Edition) Planning Commission ,Government of India, New Delhi. Volume-I, Page No. 8,9, 35, 36. Hindi Edition Page No. 33,34
2) Faster, Sustainable and More Inclusive Growth, (English Edition) Draft, An Approach to the 12th Five Year Plan, Planning Commission, Government of India, New Delhi. (August -2011), Page No. 4 to 9 Hindi Edition Page No. 3, 7(Volume- I)
3) Eleventh Five Year Plan (2007-08 to 2011-12), (Hindi, English Edition) Planning Commission, Government of India, New Delhi. Volume- I Page No. 1, 2. to 28 Chapter – 1, Volume – I
4) Economic Survey-2014-15, (Hindi and English edition), Ministry of Finance, Government of India, New Delhi. Page No. 143, 144 Appendix Page No A141 to 145.
5) Montek. S. Ahluwalia, Prospects and Policy Challenges in the Twelfth Plan, Yojana Monthly, (English Edition), January -2012, Page No. 10 , 11.
6) www.jansuraksha.gov.in
७) भोसले काटे (२०१३) “भारतीय अर्थव्यवस्था”, फडके प्रकाशन, कोल्हापूर पान नं. २९, ३०, ३३, ३४, ३७.
८) योजना (मराठी) एप्रिल – २००७, पान नं. २
९) प्रतियोगिता दर्पण (हिंदी) मासिक मार्च २०१४ पान नं. ८४ to ८६, ११२.
१०) योजना (हिंदी) जानेवारी – २०१२, पान नं. १०, ११
११) बिझनेस स्टँडर्ड, (हिंदी दैनिक) ६/०७/२०१५ पान नं. ५.
१२) नवभारत टाइम्स, ०४/०७/२०१५ पान नं. १.
१३) बिझनेस स्टँडर्ड, ०४/०७/२०१५ पान नं. १२
१४) दैनिक महाराष्ट्र टाइम्स ०४/०७/२०१५ पान नं. १, १४
१५) दैनिक सकाळ ०४/०७/२०१५ पान नं. ८
१६) दैनिक लोकसत्ता ०४/०७/२०१५ पान नं. १०
१७) दैनिक लोकसत्ता सोमवार ०६/०७/२०१५ पान नं. ९
१८) दैनिक महाराष्ट्र टाइम्स ०६/०७/२०१५ पान नं. ८
१९) योजना (मराठी) जानेवारी – २०१२, पान नं. २
२०) बिझनेस स्टँडर्ड ९ ऑक्टोंबर २०१४ पान नं. ४
२१) दैनिक लोकसत्ता ८ जुलै २०१४ पान नं. ७
२२) महाराष्ट्र टाइम्स ६ फेबुवारी २०१५ पान नं. १२
२३) योजना (हिंदी) ऑगस्ट २०१३ पान नं. ५,८



*(लेखक **संयज महाजन** हे शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये महाविद्यालय, कळंबोली ता. पनवेल येथे सहाय्यक प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख म्हणून १९९९ पासुन कार्यरत आहेत. ग्रामीण अर्थव्यवस्था, पर्यावरण, भारतीय जाती पध्दती इ. विषयांवर चार संदर्भग्रंथ प्रकाशीत झाले आहेत.)*

**संपर्कासाठी ई- मेल**

sanjay.mahajan0106@gmail.com






विकास समर्पित मासिक

**योजना**

नियमित वाचा, वर्गणीदार व्हा.

**प्रकाशन विभागाची नवी पुस्तके**

१. छत्रपती शिवाजी महाराज (हिंदी) ₹ ९५/-

**अन्य काही पुस्तके**

१. भारतेंदू हरिश्चंद्र (हिंदी) ₹ ११०/-

२. आपला राष्ट्रीय ध्वज (मराठी) ₹ ११०/-

# सहकार चळवळ-जागतिकीकरण आणि आर्थिक सबलीकरण

**विश्वास ठाकुर**



**स्व. यशवंतराव चव्हाणांनी सहकार तत्वावरील कृषी औद्योगिक क्रांतीची संकल्पना मांडली व सहकार क्षेत्राला उत्तेजन दिले. सहकार तत्वावर चालणाऱ्या सर्व बँका, पतपेढया, उद्योग केंद्रांनी स्वतःचे एक वगळे स्थान समाजात स्थापन करून ग्रामिण, शहरी लोकांना गुंतवणुकीचा एक नवा आयाम मिळवून दिला. 'विना सहकार नाही उद्धार' या उक्तीनुसार आज देशात सहकार चळवळीने जोर धरला आहे. मध्यंतरीच्या काळात सहकारी बँकांच्या घोटाळ्यांमुळे बँकांच्या अस्तित्वावर प्रश्न चिंन्ह लागले होते. परंतु त्यासाठी सहकार बँक कायद्याची आवश्यकता आहे. नियमांच्या चौकटीत असलेला विकास नेहमीच शाश्वत असतो.**

**जागतिक सहकाराचा उगम आणि विकास :-** अठराव्या शतकात मोठे कारखाने स्थापन झाल्याने इंग्लंडमधील असंघटीत कामगारांची अवस्था दयनीय झाली. परिणामी कामगार कर्जबाजारी होत गेले. सावकारी पद्धतीने जबर व्याज भरावे लागत होते तसेच संसारोपयोगी वस्तूही अवास्तव किंमतीत खरेदी कराव्या लागत असल्यामुळे काही समाज सुधारकांनी औद्योगिक सहकारी मंडळाची स्थापना केली. काही लोकांनी वर्गणी काढून रक्कम जमा केली आणि कमी व्याजाने गरजुंना देण्याची योजना चालू केली. नफेबाजी व सावकारीला रोखण्याचा हा प्रयत्न होता त्यानंतर रॉबर्ट ओवेन यांनी एकोणीसाव्या शतकाच्या तिसर्या दशकात औद्योगिक संघ आणि सहकारी भांडाराची संकल्पना रुजवली. त्यामुळे त्यांना सहकारी संघटनेचा जनक म्हटले गेले.

दारिद्र्य अर्थ दुर्बलता व कर्जबाजारीपणा या संकटातून गरीब, शेतकरी, मजूर, कारागिर यांना सोडविण्याच्या दृष्टीने इंग्लंडमध्ये झालेल्या समाज सुधारकांच्या चळवळीतून सहकाराचा उगम झाल्याचे मानले जाते. इंग्लंडमधील रॉबर्ट ओवेन, फ्रान्समध्ये फुरिअर या समाज सुधारकांनी भांडवलशाहीतील दोष ओळखून सहकार तत्त्वावर कामगारांचे संघटन करण्यासाठी प्रयत्न केले. जर्मनीत रायफायसेन व शुलूझ डेलीच यांनी असेच उपक्रम राबवून सहकारी संघटनेचा पाया रचला. इंग्लंड व स्कॉटलंड या देशात सहकारी पद्धतीने भांडवल व माल पुरवण्याची संस्था भरभराटीस आली. डेन्मार्कमध्ये शेतकऱ्यांच्या मालाची सहकारी पद्धतीने विक्री करण्याची योजना अशाच पद्धतीने यशस्वी झाली. जर्मनीतही सोसायट्यांचा प्रसार झाला.

लोकशाही व्यवस्थापन, एक सदस्य-एक मत, खुले सदस्यत्व, भांडवलावर मर्यादित व्याज, झालेल्या नफ्याचे सभासदांमध्ये वाटप, सर्व व्यवहार रोखीत, संस्थेस झालेल्या नफ्याचे सभासदांनी खरेदी केलेल्या शेअर्सच्या प्रमाणात वाटप, सभासदांना सहकाराच्या संकल्पनेसंबंधी शिक्षण व प्रशिक्षण देणे, संस्था चालवितांना राजकीय निरपेक्षता असणे गरजेचे आहे. १५० वर्षानंतरही ही तत्त्वे आजही जशीच्या तशी लागू आहेत. सन १९९५ मध्ये मँचेस्टर येथे भरलेल्या जागतिक सहकार परिषदेने ही तत्त्वे मान्य केली आहेत.

सध्याच्या स्पर्धायुक्त जागतिकीकरणाच्या काळात त्यातील

मर्यादा स्पष्ट होत असतांना 'सहकार' हा त्यास उत्तम पर्याय ठरावा, यादृष्टीनेच त्याचे महत्व लक्षात घेवून त्यादृष्टीने प्रयत्न असणे यावर अधिक भर देण्याची गरज आहे. छोटे शेतकरी, ग्राहक संस्था यातील लोकशाही मुल्य, समानता, स्वयं सहाय्यता, जबाबदारी, स्वयंशासन ही सहकारातील गुण वैशिष्ट्ये अन्य व्यवसाय प्रकाराहून वेगळी ठरलेली आहेत. यादृष्टीने सहकाराची भूमिका या अधिवेशनात मांडली गेली. 'जास्तीत जास्त नफा" व त्यास विरोध केला गेला. इतकेच नव्हे तर जागतिक स्तरावर सहकार क्षेत्राच्या दृष्टीने एकजुटीने महत्व व संघटीत कार्याचे महत्व आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेने व्यक्त केले.

**भारतातील सहकाराचा उगम :-**

भारतात सहकाराचा उगम १८७५ च्या सुमारास झाला. तत्कालीन मुंबई क्षेत्रातील शेतकऱ्यांनी सावकारी जाचा विरोधात बंड पुकारुन आपले कर्ज रोखे परत देण्यास भाग पाडले. सर्व रोखे उघड्यावर जाळण्यात आले. त्यानंतर १८७९ मध्ये जमिनीच्या अदलाबदली व जबरी व्याजावर नियंत्रण करण्यासाठी डेक्कन ॲग्रीकल्चरिस्टस रिलीफ ॲक्ट संमत झाला. या कायद्यामुळे शेतकऱ्यांच्या जमीनींना काही प्रमाणात संरक्षण मिळाले. सन १८८२-८३ च्या सुमारास सर विल्यम वेडरबर्न व न्यायमूर्ती माधवराव रानडे यांनी पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील शेतकऱ्यांची जुनी कर्जे फेडून त्यांना चालू कामाकरीता भांडवल पुरवण्यासाठी एक बँक काढण्याची योजना हाती घेतली; मात्र काही काळानंतर या बँकेची पद्धत सदोष असल्याचे सांगत ब्रिटीश सरकारने ही बँक बंद केली. मात्र याच सुमारास सरकारने लॅण्ड इम्प्रुव्हमेंट लोन्स ॲक्ट (जमीन सुधारणेबाबतच्या कर्जाचा कायदा) तसेच १८८४ साली ॲग्रीकल्चर लोन्स ॲक्ट (शेतकऱ्यांच्या कर्जाचा कायदा) असे दोन कायदे संमत केले. पहिल्या कायद्यामुळे शेतकऱ्यांना यंत्रसामग्रीसाठी, जमीन सुधारणा करणे, तर दुसऱ्या कायद्यामुळे शेतीच्या चालू कामाकरीता कमी व्याजाने कर्ज देण्यासाठी व्यवस्था सरकारनेच उपलब्ध करुन दिली. भारतातील सहकारी चळवळीचा उगम यातूनच झाल्याचे मानले जाते. भारत हा एक प्राचीन देश असून इथे सहकाराची एक परंपरा आहे.

सहकाराचा अर्थकारणाशी अतिशय जवळचा संबंध असल्यामुळे या कार्यामध्ये आर्थिक नियमांचे काटेकोरपणे पालन करणे अत्यावश्यक आहे. सहकार हा समाजाच्या आर्थिक प्रगतीचा सर्वोत्तम मार्ग आहे. हा भारतात सहकार परंपरा रुजविणाऱ्या धुरीणांचा मूलभूत विचार होता. आर्थिक सुव्यवस्थाच नाही तर समाजाचे हितसंवर्धन ही सहकाराची महत्त्वपूर्ण कसोटी आहे. त्यासाठी आपण प्रत्येकाने समाजाभिमुख राहीले पाहिजे, अशी त्यांची धारणा होती. सहकाराच्या माध्यमातून केवळ संस्थेचाच नव्हे तर जिल्हा, राज्य व देश यांच्या प्रगतीस हातभार लागू शकतो, असे त्यांनी आपल्या कार्यातून देशाला दाखवून दिले आहे.

**महाराष्ट्रातील सहकार :-**

आपल्या देशातील पहिला सहकारी कायदा १९०४ साली संमत करण्यात आला असला तरी, आपल्या देशातील सहकारी चळवळीचा शुभारंभ करण्याचा मान वडोदरा शहराने मिळविलेला आहे. वडोदरा येथील गेल्या शतकातील एक समाजसेवक प्रा. विठ्ठल लक्ष्मण कवठेकर यांनी १८८९ साली देशातील पहिली सहकारी पतपेढी चालू केली. या पतपेढीचे नांव त्यांनी 'अन्योन्य सहकारी मंडळी' असे ठेवले. श्री. कवठेकर यांनी या संस्थेचा उद्देश दोनच शब्दांत नोंदवला आहे तो म्हणजे, 'परस्परातील सहकार्य". वडोदरा येथील मोठ्या संख्येने असलेल्या महाराष्ट्रीय मंडळींना बचतीची सवय लावून त्यातून त्यांचे जीवनमान सुधारणे हा उद्देश ठेवून या संस्थेचे काम चालू झाले. भागधारक ही कल्पना त्याकाळी अस्तित्त्वात यावयाची होती. परंतु संस्थेच्या सभासदांनी दरमहा रु. २/- एच्छिक वर्गणी म्हणून संस्थेत जमा करावे, असे ठरवण्यात आले. वडोदरामध्ये १८८९ साली स्थापन झालेल्या या अन्योन्य सहकारी मंडळीचे रुपांतर पुढे अर्बन को-ऑप. बँकेत झाले व ही बँक आज वडोदरा येथे उत्तमप्रकारे काम करीत आहे. वडोदऱ्याची ही बँक केवळ नागरी सहकारी बँकांची नव्हे, तर देशातील सहकारी चळवळीची खऱ्या अर्थाने जननी आहे.

सहकार चळवळ हा विषय राज्य सरकारच्या अखत्यारित आल्यानंतर

१९२५ साली ‘मुंबई राज्य सहकारी कायदा“ मंजूर करण्यात आला. हा कायदा महाराष्ट्र राज्यात १९६० सालापर्यंत अस्तित्त्वात होता. १९६० साली महाराष्ट्र राज्याने नवीन सहकारी कायदा मंजूर करुन स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या देशातील सामान्य माणसांचे स्वप्न सहकार चळवळीतून साकार करण्याचे उद्दिष्ट राज्यापुढे व समाजापुढे ठेवले. १९२५ सालापासून नागरी सहकारी बँक चळवळीचा आपल्या देशात पाया घातला जात होता, त्याचा आणि रिझर्व्ह बँकेचा जन्म त्या काळी झालेलाही नव्हता. रिझर्व्ह बँकेची स्थापना १९३५ साली झालेली आहे.

भारतातील सहकारी चळवळीचा मागोवा घेता प्रथम सन १९०४ मध्ये सहकारी संस्थांचा कायदा अस्तित्वात आला. त्यानंतर खऱ्या अर्थाने सहकारी चळवळीला प्रारंभ झाल्याचे दिसते. सहकारी क्षेत्राच्या चळवळीत महाराष्ट्र हे अग्रेसर राज्य आहे. राज्यातील असे एकही गाव किंवा खेडे नाही जिथे सहकाराने स्पर्श केला नाही आणि कोणतीही महत्त्वाची अशी आर्थिक कृती केली नाही की जी सहकारी तत्त्वावर नाही. महाराष्ट्रातील सहकारी चळवळ ही त्रिस्तरीय आहे. सुरुवातीस गरजू शेतकऱ्यांना शेतीसाठी कर्ज व त्यांनी तयार केलेल्या मालाची विक्री व्यवस्था बँकांनी राबवली. तद्नंतर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या माध्यमातून प्राथमिक सहकारी संस्थांना व त्यांचेमार्फत शेतकऱ्यांना सवलतीच्या दराने पतपुरवठा करणे आणि शेती उत्पादनावर आधारित सहकार क्षेत्रातील साखर कारखाने, सूत गिरण्या, प्रक्रिया संस्था यांना पतपुरवठा करण्याचे काम होते. सर्वसामान्य सभासदांना सहकाराच्या माध्यमातून सर्वांगीण विकास व त्यासाठी विकासात्मक बँकिंग हा सर्वसमावेशक विचार मध्यवर्ती बँकांनी प्रामाणिकपणे जोपासला आहे. एकूण अर्थव्यवस्था व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गाच्या विकासाच्या दृष्टीने जिल्हा मध्यवर्ती बँकांचे महत्त्वपूर्ण कार्य करीत आहेत आणि सर्वांगीण विकासाचे मध्यवर्ती बँका हे सर्वोत्तम साधन आहे. सर्वसामान्य माणूस शेतकरी, शेतमजूर नजरेसमोर ठेवून जिल्हा पातळीवर हे काम म्हणूनच यशस्वीपणे सुरू आहे. युनायटेड नेशन जनरल ॲसेम्बलीच्या ठरावात ‘सामाजिक विकासात सहकाराचे योगदान“ याविषयी काही मूल्ये सांगितली आहेत. त्यावरून सहकारविषयक विकासाचा जागतिक दृष्टिकोन लक्षात येतो.

- सामाजिक विकासाचे ध्येय साकारताना गरिबी निर्मूलन व रोजगार निर्मिती, सामाजिक दुरावस्था दूर करण्याच्या दृष्टीने सहकार क्षेत्राची पूर्ण क्षमता व योगदान व उपयोगिता पूर्णत: वापरात येणे आवश्यक आहे.
- सहकार विकासाच्या दृष्टीने अशा संस्थांना विविध प्रकारे सवलती देऊन गरिबीत जीव जगणारे लोक, स्त्रिया, तरुण, अपंग व्यक्ती यांना एकत्रित करुन त्यांच्या विकासाच्या दृष्टीने त्यांच्या पूर्ण सहकार्याने त्यांना आवश्यक असणाऱ्या व्यवसायांची स्थापना करुन त्यांनी पुरविलेल्या सेवांच्या उपयोगातून त्यांचे जीवनमान सुधारण्याच्या दृष्टीने प्रयत्न व्हावेत.
- सहकाराद्वारे विकासाच्या दृष्टीने वेगवेगळी पावले उचलून त्यास पोषक वातावरण निर्मिती करणे की, ज्यात सरकार व सहकार यांच्या परिणामकारक समन्वयातून सहकारी व्यवस्थापनातील अडथळे दूर करण्याच्या दृष्टीने संशोधन, तांत्रिक ऑडीट, पारदर्शकता, क्षमता विस्तार, प्रशिक्षण, सहकार व्यापार तंत्र, विस्तार या दृष्टीने विविध सहकारी संस्थांनी एकत्रीत येऊन या विषया संदर्भात भागीदारी स्थापन करावी की ज्याचा उपयोग सहकार चळवळ विस्तारण्यात होईल.
- जनसामान्यात सहकारातील रोजगार निर्मिती व साधलेला सामाजिक व आर्थिक विकास व प्रगती दर्शविणारी आकडेवारी आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील एकूण विकासातील, सहकार कार्यप्रणाली व तत्वे यांच्याबाबतची जनजागृती करणे.
- सहकार व सहकार चळवळ यांनी एकत्रित येऊन सहकारातील कार्यक्षमता विस्तार, संस्था व्यवस्थापन, आर्थिक याबाबतीतील सभासदांचे कौशल्य वाढविणे त्यादृष्टीने नवीन तंत्रज्ञान, व सहकार विस्ताराबाबतच्या नवनवीन कार्यक्रमांची आखणी करावी जेणेकरुन सहकार व सहकार चळवळ दृढ होण्यास मदत होईल.
- सहकार व आंतरराष्ट्रीय संघटना आणि सहकारी चळवळ व सहकारी संस्था यांनी एकत्रित येऊन सहकारी क्षेत्रास प्रोत्साहनाद्वारे त्यांना

किफायतशीर आर्थिक सेवा सुविधा पुरवून जुनाट तंत्राऐवजी आधुनिक तंत्रज्ञान, पाणी-पुरवठा सोयींची उपलब्ध, व्यापार तंत्रांचा विकसित प्रणालीचा वापर, आर्थिक विकासात महिलांचा सहभाग यासारख्या उपक्रमांच्या माध्यमातून प्रोत्साहन देण्यात यावे.

भारताची सहकार परंपरा उज्वल आहे. याचे भान ठेवून आपल्यातल्या स्थानिक प्रश्नांची जाण लक्षात घेवून सहकारी बँकांनी आपली आर्थिक सुधारणा करावी. सहकार चळवळीचे जनक वैकुंठभाई मेहता, डॉ.धनंजयराव गाडगीळ, यशवंतराव चव्हाण, पद्मश्री विठ्ठलराव विखे-पाटील अशा अनेक सहकार धुरींनी सहकारी संस्थांच्या कार्यपध्दतीविषयी मार्गदर्शक तत्वे सांगितली आहेत. ती आचरणात आणली तर कार्पोरेट गर्व्हनन्स ही संकल्पना कार्यान्वीत करणे अवघड नाही. भारतातील लोकसंख्येत तरुणांची संख्या जास्त आहे. या तरुणांना आपल्याकडे कसे आकर्षित करायचे हे बँकांपुढे आव्हान आहे, हे आव्हान बँकांनी स्वीकारावे.

अलीकडच्या काळात बँकींग क्षेत्रात फार मोठे व्यावसायिक परिवर्तन घडून आले आहे. आधुनिक बँकींग तंत्रज्ञानामुळे आता वित्तीय व्यवसायाचे सारे परिमाणच बदलले आहे. व्यवसायातील धोके लक्षात घेऊन बँकांनी आय.टी. आधारित धोका व्यवस्थापन पध्दती अंमलात आणली आहे. यात सहकारी बँकांनी आपल्या व्यवस्थापन प्रणालीत आमुलाग्र बदल केले आहे व करीत आहे हे कौतुकास्पद आहे. दर्जात्मक बँकींग सेवा, ए.टी.एम. टेलिबँकींग, इंटरनेट बँकींग, कोअर बँकींग, मोबाईल बँकींग आदी सेवा देण्यात सहकारी बँका अग्रेसर आहेत. स्पर्धेतून एकत्रीकरणाकडे असा विचार आपल्याला करावा लागणार आहे. कोअर बँकींग पध्दतीमुळे बँकांच्या शाखांचे जाळे अधिक विस्तृत व कार्यक्षम करावे लागेल. स्पर्धात्मक व गुणात्मक सेवा देण्याचे आव्हानही सहकारी क्षेत्रातील बँकांनी स्वीकारले आहे. आगामी काळात देशाचा आर्थिक विकास ९ ते १० टक्क्यांनी होईल, यासाठी कृषीविकास किमान ४% होणे आवश्यक आहे. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी ग्रामीण अर्थव्यवस्थेत प्रचंड गुंतवणूक करावी लागेल. ही राष्ट्रीय जबाबदारी पेलण्याचे मोठे आव्हान बँकांना स्वीकारावेच लागेल.

भारतातील नागरी सहकारी बँकांची दि.३१ मार्च २०१४ रोजीची राज्यवार स्थिती

| अ.क्र. | विभागाचे नाव | बँकांची संख्या | ठेवी (रक्कम रू.कोटीत) | कर्जे (रक्कम रू. कोटीत) | शाखा | ए.टी.एम. | विस्तारित कक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पश्चिम विभाग | ७४६ | २३३३०० | १४६७०० | ६४४८ | २८८० | १३२ |
| २ | दक्षिण विभाग | ५५७ | ५३४०० | ३६५०० | २०१२ | १७८ | ६१ |
| ३ | मध्य विभाग | १३७ | ११५०० | ६२०० | ४७९ | ६१ | २३ |
| ४ | उत्तर विभाग | ७३ | १०९०० | ७००० | ३८२ | ४९ | १४ |
| ५ | पूर्व विभाग | ५९ | ५१०० | २५०० | १५८ | ७ | ५ |
| ६ | उत्तर पूर्व विभाग | १७ | १३०० | ८०० | ४७ | --- | १ |
| | एकूण | १५८९ | ३१५५०० | १९९७०० | ९५२६ | ३१७५ | २३६ |

(रक्कम रू. कोटीत)

| अ.क्र. | विभागाचे नाव | बँकांची | ठेवी | कर्जे | शाखा | ए.टी.एम. विस्तारित कक्ष | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संस्था | (रक्कम रू. कोटीत) | (रक्कम रू. कोटीत) | | | |
| १ | महाराष्ट्र | ५१२ | १९५९०० | १२२९०० | ५२७७ | २६६८ | ८५ |
| २ | गुजरात | २२८ | ३४३०० | २१८०० | १०७५ | १७९ | ४६ |
| ३ | कर्नाटक | २६५ | २६५०० | १७९०० | १०५८ | ११३ | ५३ |
| ४ | केरळ | ६० | १०२०० | ६३०० | ४१४ | २० | २ |
| ५ | आंध्रप्रदेश | १०२ | ८९०० | ६६०० | ३३६ | ३६ | ६ |
| ६ | तामिळनाडू | १२९ | ७८०० | ५६०० | १९८ | १० | --- |
| ७ | उत्तरप्रदेश | ६९ | ५७०० | ३१०० | २६१ | ४० | २० |
| ८ | राजस्थान | ३८ | ४९०० | २७०० | २१३ | २२ | ३ |
| ९ | पश्चिम बंगाल | ४४ | ३८०० | १९०० | १०६ | ५ | १ |
| १० | नवी दिल्ली | १५ | ३४०० | २९०० | ९० | १० | १ |
| ११ | उत्तराखंड | ५ | ३१०० | १८०० | ९३ | १४ | २ |
| १२ | गोवा | ६ | ३००० | २००० | ९४ | ३३ | १ |
| १३ | मध्यप्रदेश | ५१ | २२०० | ११०० | १०० | ६ | १ |
| १४ | ओडिसा | १० | ११०० | ६०० | ४० | --- | ४ |
| १५ | पंजाब | ४ | १००० | ५०० | २६ | --- | ५ |
| १६ | हरियाना | ७ | ६०० | ४०० | २० | ७ | १ |
| १७ | आसाम | ८ | ६०० | ५०० | २२ | --- | --- |
| १८ | जम्मू व काश्मिर | ४ | ५०० | २०० | २६ | --- | ५ |
| १९ | हिमाचल प्रदेश | ५ | ५०० | ३०० | १२ | ६ | ३ |
| २० | छत्तीसगड | १२ | ५०० | २०० | २५ | १ | --- |
| २१ | मणीपूर | ३ | ४०० | २०० | १० | --- | १ |
| २२ | मेघालय | ३ | २०० | १०० | ७ | --- | --- |
| २३ | बिहार | ३ | १०० | १०० | ९ | २ | --- |
| | **एकूण** | **१५८३** | **३१५५००** | **१९९७००** | **९५१२** | **३१७२** | **२४०** |

याखेरीज मिझोराम, सिक्कीम, त्रिपुरा, पॉडिचेरी व झारखंड येथे नागरी बँकांची उपस्थिती म्हणून ६ बँका आहेत.

एकूण अर्थव्यवस्था व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गाच्या विकासाच्या दृष्टीने नागरी बँकाच महत्त्वपूर्ण कार्य करीत आहेत व करु शकतात आणि सर्वांगीण विकासाचे नागरी बँक हे सर्वोत्तम साधन असल्याने राष्ट्रीयकृत व व्यापारी बँकांना कितीही लोकाभिमुख करण्याचा प्रयत्न केला तरीही नागरी सहकारी बँकांची वाढ व विकास कोणीही थोपवू शकत नाही. यशवंतराव चव्हाणांनी कृषी औद्योगिक क्रांतीची संकल्पना मांडली व ही संकल्पना साकार करण्यासाठी त्यांनी सहकार क्षेत्राला उत्तेजन दिले त्यांच्या ह्या आधुनिक विचारांमुळे सहकाराला नवसंजीवनी मिळाली. त्यांनी म्हटले होते की ''महाराष्ट्रातील सहकारी चळवळ व कर्तृत्व वैचारिक पायावर सबलतेने उभी आहे. परंतु ही जबाबदारी वाढती राहिली पाहिजे व त्यासाठी हे जबाबदारीने पेलणारे नेतृत्वही आपण निर्माण केले पाहिजे. अन्यथा, ही शक्ती नष्ट होण्याचा धोका आहे. त्याचप्रमाणे या चळवळीमार्फत हरिजन व पददलितांना दिलासा मिळणे महत्त्वाचे आहे. अशक्त घटकांपर्यंत चळवळ नेणे हे तर वास्तविक सहकारी चळवळीचे मूलभूत उद्दिष्ट आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील एक भंगलेले मन एकजिनसी करण्यासाठी आपण जागरुक राहिले पाहिजे. आर्थिक प्रगतीच्यादृष्टीने शेतीतील सुधारणा व नवे प्रयोग सत्तेच्या

विकेंद्रीकरणातील नवे नेतृत्व, सहकारी चळवळीची वाढती व्याप्ती व बदलती सामाजिक स्थिती हे महाराष्ट्रातील क्रांतीचे पर्व आहे.

जागतिकीकरणाच्या वाढत्या प्रभावामुळे बाजारातील आर्थिक उलाढालीही बदलल्या आहेत. जागतिक पातळीवरच्या शेअर बाजारानेही मोठी घौडदौड चालू ठेवली आहे. साहजिकच त्यामुळे वित्तीय बाजारात मोठी स्पर्धा सुरू आहे. या सर्व पार्श्वभूमीवर बँकांना नवा ग्राहक आपल्याकडे खेचणे, स्वत:चा बिझिनेस वाढविणे यासाठी काही आमुलाग्र बदल करावे

लागणार आहेत. या बदलांमध्ये प्रामुख्याने बँकांना कस्टमर्स रिलेशन्स म्हणजेच सीआरएम चा वापर करावा लागेल. यामुळे आपल्या सर्व ग्राहकांशी संबंधित माहिती एकत्र आणली जाईल. त्यातून त्यांच्याशी थेट संपर्क साधता येईल. त्या संबंधातून वैयक्तिक जिव्हाळ्याचे नाते निर्माण करता येईल.

केंद्र सरकारने ९७व्या घटना दुरुस्तीनुसार सहकारी चळवळीत नवी चेतना आणण्याचा प्रयत्न केला आहे. जगात मुक्त आर्थिक व्यवस्थेचे वारे वाहू लागले. जीवघेण्या स्पर्धेला तोंड देता देता सहकारी संस्थांच्या नाकी दम येऊ लागला. जे या स्पर्धेतून टिकाव धरुन सक्षमपणे आपले अस्तित्त्व टिकवू शकले. जागतिक स्पर्धेच्या युगात सहकारी चळवळीला नवचैतन्य देण्याच्या दृष्टीने गेली अनेक वर्षे निर्णयास्तव प्रलंबित राहीलेल्या ९७व्या घटनादुरुस्तीचे विधेयक १२ जानेवारी २०१२ रोजी मंजूर झाले आणि महाराष्ट्रात या विधेयकाची अंमलबजावणी १५ फेब्रुवारी २०१३ पासून झाली.

सहकार हा विषय राज्याच्या अखत्यारीत असतांनाही केंद्र सरकारने या संदर्भात घटनेमध्ये तरतूद करण्यामागे काही कारणे आहेत. देशाच्या आर्थिक विकासात सहकारी संस्थांचे योगदान महत्त्वाचे असल्याने देशातील सर्व संस्थांमध्ये सुसूत्रता असणे आवश्यक आहे. ज्या उद्देशाने सहकारी संस्था स्थापन होते. ती उद्दिष्ट्ये पुढील काळात पूर्ण होतांना दिसत नाहीत. अनेक संस्थांच्या निवडणूका वेळेवर होत नाहीत. वर्षानुवर्ष प्रशासकच कारभार पाहतात. या संस्थांमधून व्यावसायिकतेचा अभाव दिसून येत असल्याने त्यांची उत्पादकक्षमता कमी होत आहे आणि सरकारी मदतीमुळे या संस्थांमधील राजकीय हस्तक्षेप वाढला आहे. या पार्श्वभूमीवर तळागाळातील सभासदांच्या हितासाठी सहकाराच्या माध्यमातून लोककल्याणकारी राज्याची कल्पना मूर्त स्वरुपात आणण्यासाठी देशातील सर्व सहकारी संस्था या स्वायत्तता, लोकशाही नियंत्रण व व्यावसायिक व्यवस्थापन या प्रमुख तत्त्वांवर चालवाव्यात या प्रमुख उद्देशाने निर्देशक तत्त्वांचा समावेश घटनेत करण्यात आला आहे.

सुशासन म्हणजे सर्वांच्या मतांचा आदर करणारे, सर्वांचा सहभाग असलेले, कायदेकानून पालन करणारे, परिणामकारक व कार्यक्षम, प्रतिसादक्षम, समान न्यायाचे, पारदर्शी व आपली जबाबदारी वा उत्तरदायित्व समजणारे व्यवस्थापन म्हणजे सुशासन. सुशासन ही यशाची गुरुकिल्ली असून सुशासनाची फळे दीर्घकाळ टिकणारी व सर्व समाजाप्रती समान असतात.

व्यवस्थापनाने सार्वजनिक हिताच्या गोष्टी कशा हाताळाव्या तसेच पारदर्शी निर्णय प्रक्रिया व तिच्या अंमलबजावणीद्वारे साधनसंपत्ती कशी राबवावी हे दाखवणारा अचूक मार्ग म्हणजे ‘सुशासन’.

**सुशासनाची तत्त्वे :-**

१. जबाबदार व व्यावसायिक व्यवस्थापन
२. नीतीमान, स्पष्ट व पारदर्शी निर्णयप्रणाली
३. परिणामकारक देखरेख व नियंत्रण
४. धोक्याची व्याप्ती ओळखून त्यावर नियंत्रण
५. वाढीव कार्यप्रदर्शनाला प्रोत्साहन

सुशासनासाठी परिणामकारक नेतृत्वाची गरज असते. त्यासाठी ज्ञान, कौशल्य व इच्छाशक्ती असणे आवश्यक असते आणि हे सहजसाध्य आहे. प्रयत्नाने कोणीही ह्या गोष्टी साध्य करू शकतो. सहकार क्षेत्रासाठी सुशासन चिरंतन विकासाची प्रणाली आहे त्याचा सर्वांनी अंगीकार करावा व सहकार क्षेत्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत.

*(लेखक **विश्वास ज. ठाकूर** हे नाशिक येथिल विश्वास को-ऑप. बँक लि.चे संस्थापक, अध्यक्ष असून विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिटयुट नाशिकच्या सल्लागार पदावर कार्यरत आहे. याव्यतिरिक्त अनेक सहकार संस्था विविध मंडळांच्या कार्यकारिणी पदावर असून महाराष्ट्राच्या समाज विकासात त्यांचा महत्वाचा वाटा आहे.)*

***संपर्कासाठी ई -मेल***

vishwasthakur@gmail.com

## आपल्याला माहित आहे का ?

### लेप्टोस्पायरोसिस प्लेग पेक्षाही घातक

समाजामध्ये विविध आजारांचे प्रमाण पर्यावरणीय बद्दल, तापमान, हवामान, स्वच्छता या नुसार कमी जास्त होत असतात एखाद्या रोगाची साथ आली की, तत्काळ संबंधित महानगरपालिकांतर्फे अधिनस्थ आरोग्य, स्वच्छता, प्रशासकीय विभागांना सुचना देण्यात येऊन रोग संक्रमणावर नियंत्रण ठेवण्यात येते. प्लेग या साथीच्या रोगाने १९४० ते ६० या काळात धुमाकुळ घातला त्यानंतर पोलिओ या रोगाने जवळपास देशातुन समुळ उच्चाटनांसाठी ५० वर्ष घेतली त्यानंतर मलेरिया, डेंगुने उच्छाद मांडला आणि आता जोडीस जुलैच्या पहिल्या सात दिवसांत लोक्टोस्पायरोसिस हा रोग मुंबईत व्यापक बनु पहात आहे. जुलैच्या पहिल्या सात दिवसात या रोगांचे २१ रुग्ण आढळले आहे. यावर वेळीच नियंत्रण गरजेचे आहे.

**काय आहे लेप्टोस्पायरोसिस ?**

पूर, साचलेले पाणि किंवा ओल्या जमिनी खालील उदरांची मरण्याची संख्या जास्त असते त्यामुळे साधारणत: पावसाळ्यात लेप्टो रुग्णांची संख्या वाढतना दिसते. लेक्टोस्पायरोसिस हा प्राण्यांच्या मुत्राद्वारे संक्रमित होतो. सरपटणारे प्राणि, पक्षी यांच्यामध्ये हा रोग आढळुन आला आहे. सस्तन प्राणिच लेप्टोस्पायरोसिसचे विषाणु मानव आणि प्राण्यांमध्ये पसरवु शकतात. कुत्रे उंदिर अशा लेप्टोच्या संसर्ग झालेल्या प्राण्यांची विष्ठा मिसळेल्या पाण्यातुन चालताना जखम झाली असेल तर त्या जखमेतुन ते लेप्टोस्पायरोसिसचे विषाणू शरिरात प्रवेश करतात. या आजाराची लक्षणे दिसण्यास ३ ते २१ दिवसांचा कालावधी लागतो.

अचानक थंडी वाजुन ताप येणे, डोकेदुखी, सांधे दुखी, पोटदुखी, डोळे लाल होणे, आणि काही वेळा त्वचेवर लाली, खाज येणे ही रुग्णांची लक्षणे आहेत. साधारण ३ ते २९ दिवसांच्या या कालावधीतील पहिला टप्पा ३ ते सात दिवसांचा असतो तर दुसऱ्या टप्यात लेप्टोस्पायरोसिस हा मॅनेंनजेटीस (मेंदुपर्यंत) पर्यंत पोहचु शकतो. या रोगाची लागण होण्याची शक्यता खाटिक, शेतकरी, टाकाऊ पदार्थ गोळा करणारे कामगार आणि इमारत बांधकाम कामगार यांना जास्त आसते.

यासाठी किडनी टेस्ट, रक्त तपासणी करणे आवश्यक आहे, पेनिसिलीन-जी, ॲम्पीसिलीन, ॲमोक्युनीसिलिन आणि डॉक्सीसिलाईन ही ॲन्टीबॉयोटीक्स डॉक्टरांच्या सल्यानुसार घ्यावीत तसेच ग्लुकोज आणि मीठ याचे मिश्रण रुग्णांना देणे.

## आपल्याला माहित आहे का ?

### जागतिक पातळीवरील उत्कृष्ठ नावलौकीक असलेल्या देशामंध्ये कॅनडा प्रथम

रेप्युटेशन इन्सिट्युट २०१५ च्या संशोधन आणि सल्लागार संस्थेने केलेल्या सर्वेक्षणानुसार, आर्थिक, पर्यावरण आणि प्रशास-कीय बाबींमध्ये अग्रेसर असलेल्या जागतिक पातळीवरील ५५ देशांच्या स्पर्धेत प्रथम क्रमांकावर आहे.

पहिल्या पाच क्रमाकांतर असलेल्या देशात नॉर्वे, सिडन, स्वित्झर्लंड, ऑस्ट्रेलिया हे देश असुन भारताचे शेजारी आणि स्पर्धक राष्ट्रे चीन आणि पाकिस्तान हे अनुक्रमे ४६ व ५३ व्या क्रमांकावर आहे. दरवर्षी घेण्यात येणाऱ्या सर्वेक्षणात भारताला यावर्षी उत्कृष्ठ नावलौकिकेतील मतदान ७.४ टक्क्यांनी वाढले आहे. उत्कृष्ठ ख्याती नावलौकीक असेलेले प्रथम १० व शेवटचे १० देश

| प्रथम १० देश | | शेवटचे १० देश | |
|---|---|---|---|
| १) | कॅनडा | ४६) | चीन |
| २) | नॉर्वे | ४७) | उत्काईन |
| ३) | स्वीडन | ४८) | सौदी अरेबिया |
| ४) | स्वित्झरलँन्ड | ४९) | अल्जेरिया |
| ५) | ऑस्ट्रेलिया | ५०) | कझाकस्थान |
| ६) | फिनलँन्ड | ५१) | नायजेरिया |
| ७) | न्युझीलँन्ड | ५२) | रशिया |
| ८) | डेनपार्क | ५३) | पाकिस्तान |
| ९) | नेदरलँन्ड | ५४) | इरान |
| १०) | बेल्जियम | ५५) | इराक |

टाईम्स ऑफ इंडियाच्या सौजन्याने

## लेखकांना आवाहन

योजना मासिकासाठी लेख पाठवितांना लेखकांनी खाली नमूद केलेल्या फॉन्ट पैकी कोणत्याही एका फॉन्ट मध्येच आपले लेख पाठवावेत.

KRUTI DEV or APS or Mangal or DVTT or SHIVAJI or SHREE LIPI, हे नम्र आवाहन.

# INSTITUTE OF CIVIL SERVICES

## स्पर्धा परीक्षांच्या दर्जेदार मराठी मासिकांचा मानबिंदू




राजपथ अॅकॅडमी
MPSC★UPSC
Login to Excellence & Success

प्रा. मीता चौधरी
(संस्थापक-संचालिका, राजपथ अॅकॅडमी, पुणे)

### 'राजपथ टाइम्स'ची वैशिष्ट्ये

- MPSC / UPSC सह सर्व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त मार्गदर्शक
- ताज्या घडामोडींच्या अभ्यासपूर्ण, विस्तृत माहितीचे लेख
- आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, प्रादेशिक, घडामोडींचा परामर्श
- राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, विज्ञान, पर्यावरण सह चौफेर, अद्यावत मुद्द्यांचा समावेश.
- आगामी MPSC / UPSC परीक्षांचे मार्गदर्शन व सराव.
- अधिकाऱ्यांची प्रेरणादायी यशोगाथा.
- आकर्षक, सुस्पष्ट व सुयोग्य मांडणी.

## MPSC - राज्यसेवा परीक्षा-२०१४ मधील यशस्वी विद्यार्थी



विक्रम बांदल उपजिल्हाधिकारी (पुणे) | सुनील जायभये जिल्हा पोलीस उपअधीक्षक (अमरावती) | अर्चना मोरे उपजिल्हाधिकारी (पुणे) | शशिकांत भोसले जिल्हा पोलीस उपअधीक्षक (परभणी) | तानाजी बराटे जिल्हा पोलीस उपअधीक्षक | योगेश चंद्रे तहसिलदार (नाशिक) | किशोर मराठे गटविकास अधिकारी (बीड) | रोहित काटकर गटविकास अधिकारी (कोल्हापूर) | अंकुश जाधव सहाय्यक गटविकास अधिकारी (मुंबई) | प्रशांत जाधवर नायब तहसिलदार (बीड) | किरण जावळ्याड नायब तहसिलदार (औरंगाबाद) | स्नेहल ढोके नायब तहसिलदार | अंगद आसटकर नायब तहसिलदार | तुषार बोरकर नायब तहसिलदार (पुणे)

| MPSC राज्यसेवा परीक्षा | PSI/STI/ASST | UPSC बॅच |
|---|---|---|
| • एकत्रित बॅच - पूर्व +मुख्य + मुलाखत<br>• कालावधी - एक वर्ष<br>• विषय : GS, CSAT, मराठी, इंग्रजी , सामान्य अध्ययन पेपर १ ते ४<br>• बॅचचे माध्यम - मराठी तसेच इंग्रजी माध्यमाची बॅच उपलब्ध.<br>• बॅचेस सुरू : २५ ऑगस्ट, १० सप्टेंबर | • एकत्रित बॅच - पूर्व + मुख्य + शारीरिक चाचणी + मुलाखत<br>• कालावधी - एक वर्ष<br>• विषय : अभ्यासक्रमानुसार मराठी, इंग्रजी, सामान्य अध्ययन<br>• बॅचचे माध्यम - मराठी<br>• बॅचेस सुरू : २५ ऑगस्ट, १० सप्टेंबर | • एकत्रित बॅच- पूर्व +मुख्य + मुलाखत<br>• कालावधी - ११ महिने<br>• विषय - CSAT, सामान्य अध्ययन, निबंधलेखन<br>• वैकल्पिक विषय- भूगोल, राज्यशास्त्र, इतिहास<br>• माध्यम - मराठी व इंग्रजी<br>• बॅचेस सुरू: २५ ऑगस्ट, १० सप्टेंबर |

* नोकरी व कॉलेज करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वीकएण्ड बॅचेस उपलब्ध

राज्यसेवा मुख्य परीक्षा टेस्ट सिरीज - सामान्य अध्ययन पेपर क्र.१,२,३,४
मराठी व इंग्रजी पेपरचे मूल्यांकन करण्यात येईल.

राजपथ अॅकॅडमी
MPSC★UPSC
Login to Excellence & Success

### राजपथ अॅकॅडमी

मुख्य कार्यालय :
२६, आप्पा बळवंत चौक,
अनमोल पुस्तकालयासमोर, पुणे.

शाखा :
लोकमान्य टिळकभवन, बी-विंग दुसरा मजला,
५६८ नारायण पेठ, केसरीवाड्याजवळ, पुणे.

फोन नं. :
०२०-३२४२ २२२१, ८००७९०९१६०
Email: info@rajpathacademy.com

www.rajpathacademy.com 90287 56551 follow us on f - rajpath academy

RNI No. MAHMAR/2009/32156
Reg No. G/NMD/137/2013-15
Published Date : 12th August, 2015
Date of Posting : 12th August,, 2015




Editor - **Bhavana Gokhale**
Printed and Published by **Dr. (Ms) Sadhana Rout,** Additional Director General (I/C), on behalf of Publication Division and Printed at **Onlooker Press**, 16, Sassoon Dock, Mumbai - 400 005. Phone : 22183544/2939
Published at - B-701, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400 614.